पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक - ६

सभावृत्तांत

दिनांक :- २०.७.२०१२ | वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै-२०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.७.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.जावेद रमजान शेख
३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३४. मा.नंदा विकास ताकवणे
३५. मा.नेटके सुमन राजेंद्र
३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३७. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३८. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
४०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४१. मा.लोंढे गणेश नारायण
४२. मा.शमीम पठाण
४३. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४४. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४५. मा.अपर्णा निलेश डोके
४६. मा.अनंत सुभाष को-हाळे
४७. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४८. मा.जयश्री वसंत गावडे
४९. मा.प्रसाद शेट्टी
५०. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५१. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५२. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५३. मा.शेख अस्लम शैकत
५४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५६. मा.वाबळे संजय मल्हारराव
५७. मा.मडिगेरी वर्षा विलास
५८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५९. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६०. मा.सुपे आशा रविंद्र
६१. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
६२. मा.अजित दामोदर गव्हाणे
६३. मा.गोफणे अनुराधा देविदास
६४. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६५. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६६. मा.फुगे सीमा दत्तात्रय
६७. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६८. मा.लोंढे शुभांगी संतोष
६९. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
७०. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७१. मा.सावळे सिमा रविंद्र
७२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७३. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७४. मा.पालांडे सुजाता सुनिल
७५. मा.बहल योगेश मंगलसेन
७६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७७. मा.कदम सदगुरु महादेव
७८. मा.गिता सुशील मंचरकर
७९. मा.कैलास महादेव कदम
८०. मा.छाया जगन्नाथ साबळे
८१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
८२. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
८३. मा.आसवाणी सविता धनराज
८४. मा.वाघेरे सुनिता राजेश
८५. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
८६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८९. मा.काळे विमल रमेश
९०. मा.पाडाळे निता विलास
९१. मा.विनोद जयवंत नढे
९२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
९३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९५. मा.बारणे निलेश हिरामण
९६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९७. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९८. मा.बारणे माया संतोष
९९. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१००.मा.यमुनाताई रमणनाना पवार
१०१.मा.कलाटे स्वाती मयुर
१०२.मा.नांदगुडे विलास एकनाथ
१०३.मा.चौंधे आरती सुरेश

१०४.मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०५.मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०६.मा.जवळकर वैशाली राहुल
१०७.मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०८. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०९.मा.शितोळे शैलजा बाबुराव
११०.मा.जगताप नवनाथ दत्तु
१११.मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
११२.मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
११३.मा.जम सोनाली पोपट
११४.मा.प्रशांत शितोळे
११५.मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
११६.मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११७.मा.गायकवाड संध्या सुरदास
११८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११९.मा.शेंडगे आशा सुखदेव
१२०.मा.मोटे किरण बाळासाहेब
१२१.मा.संजय केशवराव काटे
१२२.मा.विमलताई सुरेश जगताप
१२३.मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१२४.मा.बोऱ्हाडे अरुण तुकाराम
१२५.मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त, मा.कदम-अति.आयुक्त, मा.सावंत-सह. आयुक्त, मा.मुंढे,मा.पवार,मा.कुलकर्णी, मा.गावडे-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्य लेखा परिक्षक,मा.चाकणकर - प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.काची-उपशहर अभियंता, मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पाटील, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.लडकत, मा.पठाण मा.चौधरी,मा.पिरजादे-कार्य.अभियंता,मा.माछरे-विशेष अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, भा.द. खेर-जेष्ठ पत्रकार व साहित्यिक, प्रितमकुमार शेगावकर-आमदार,फिदा कुरेशी-कबड्डी विश्वातील आदर्श व्यक्तीमत्व, कबड्डीपटू, संघटक आणि छत्रपती शिवाजी पदक विजेते, दारासिंग-रुस्तम-ए-हिंद व जेष्ठ अभिनेते,रणरागिणी मृणाल गोरे-जेष्ठ समाजवादी नेत्या, प्रा.बाळ आपटे-जेष्ठ कायदेतज्ञ,वकील, शिक्षणतज्ञ व राजकीय धुरिण, राजेश

खन्ना-जेष्ठ सिनेअभिनेते आणि मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीतील मृत व्यक्ती या मान्यवरांना श्रद्धांजली वाहून ही सभा अर्धा तासासाठी तहकूब करावी अशी विनंती करतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.महापौर :- उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दि.२०/७/२०१२ रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -६
सभावृत्तांत
(दि.२०.७.२०१२ ची दुपारी २.००.वा. ची तहकुब सभा)

दिनांक :- २०.७.२०१२ वेळ:-दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दिनांक २०.७.२०१२ ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.२०.७.२०१२ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार
२९. मा.जावेद रमजान शेख
३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३२. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३३. मा.नंदा विकास ताकवणे
३४. मा.नेटके सुमन राजेंद्र
३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३९. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४०. मा.लोंढे गणेश नारायण
४१. मा.शमीम पठाण
४२. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४४. मा.अपर्णा निलेश डोके
४५. मा.अनंत सुभाष को-हाळे
४६. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४७. मा.जयश्री वसंत गावडे
४८. मा.प्रसाद शेट्टी
४९. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५१. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५२. मा.शेख अस्लम शैकत
५३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५५. मा.वाबळे संजय मल्हारराव
५६. मा.मडिगेरी वर्षा विलास
५७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५८. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५९. मा.सुपे आशा रविंद्र
६०. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
६१. मा.अजित दामोदर गव्हाणे
६२. मा.गोफणे अनुराधा देविदास
६३. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६४. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६५. मा.फुगे सीमा दत्तात्रय

६६. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६७. मा.लोंढे शुभांगी संतोष
६८. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६९. मा.ननवरे जितेंद्र बाबा
७०. मा.सावळे सिमा रविंद्र
७१. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७२. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७३. मा.पालांडे सुजाता सुनिल
७४. मा.बहल योगेश मंगलसेन
७५. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७६. मा.कदम सदगुरु महादेव
७७. मा.गिता सुशील मंचरकर
७८. मा.कैलास महादेव कदम
७९. मा.छाया जगन्नाथ साबळे
८०. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
८१. मा.आसवाणी सविता धनराज
८२. मा.वाघेरे सुनिता राजेश
८३. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
८४. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
८५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८६. मा.काळे विमल रमेश
८७. मा.पाडाळे निता विलास
८८. मा.विनोद जयवंत नढे
८९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
९०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
९१. मा.विमलताई सुरेश जगताप
९२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
९३. मा.बारणे निलेश हिरामण
९४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९६. मा.बारणे माया संतोष
९७. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९८. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९९. मा.कलाटे स्वाती मयुर
१००. मा.नांदगुडे विलास एकनाथ
१०१. मा.चौंधे आरती सुरेश
१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल
१०५. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०६. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०७. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०८. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
११०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१११. मा.जम सोनाली पोपट
११२. मा.प्रशांत शितोळे
११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११५. मा.शेंडगे आशा सुखदेव
११६. मा.मोटे किरण बाळासाहेब
११७. मा.संजय केशवराव काटे
११८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११९. मा.बोऱ्हाडे अरुण तुकाराम
१२०. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त,मा.मुंढे, मा.पवार,मा.कुलकर्णी,मा.गावडे-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.काची-उपशहर अभियंता,मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भदाणे-उपसंचालक(नगररचना),मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.पाटील, मा.शरद जाधव,मा.साळवी, मा.लडकत,मा.पठाण,मा.चौधरी,मा.पिरजादे-कार्य.अभियंता,मा.माछरे-विशेष अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(सौ.अनिता फरांदे, प्रथम महिला महापौर, यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रबंध सादर करुन डॉक्टरेट ही पदवी मिळविल्याबद्दल आणि अंकिता राजेंद्र मोराडकर या विद्यार्थीनीने दहावीच्या परीक्षेत ९७% मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा मा.महापौर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.)

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, पावसाळी अधिवेशन चालू आहे या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक ठिकाणी अडचणी आहेत. आपल्या शहरावर सुध्दा मोठी अडचण अनुभवतो. त्या अडचणीला कधी ना कधी तरी सर्वसामान्य नागरीकांना दिलासा मिळण्यासाठी आपल्या येथील तीन्ही आमदार विधी मंडळाबाहेर उपोषणाला बसलेले आहेत, धरणे आंदोलन करतात. अनधिकृत बांधकामाच्या कारवाई प्रश्नी आपल्या नागरीकांना दिलासा मिळावा व आपल्या नागरीकांना अडचण होणार नाही असा निर्णय व्हावा यासाठी त्यांना पाठिंबा म्हणून ही सभा तहकूब करावी अशी मी विनंती करतो.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- या विषयावर चर्चा होऊ द्या.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, पाठिंबा दर्शवण्यासाठी तहकूबी मांडत आहे. अतिशय महत्वपूर्ण विषय आहे. पक्षीय माध्यमातून आंदोलन करत आहे. या ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी निवडणूकीपूर्वी आणि सर्व संबंधित मंडळींनी यासंदर्भात या विषयाच्या माध्यमातून चर्चा सुरु केली. संपूर्ण कायदा बदलावा लागणार आहे. त्यासाठी विशिष्ट कालावधी लागतो आहे. संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होऊन महिन्याभरात पाऊले उचलण्यासाठी ठोस आश्वासने देऊन केवळ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विषयी नसून संपूर्ण राज्यातील मनपाचा निर्णय आहे. म्हणून या ठिकाणी त्याचे अभिनंदन करतो. महापौर, सर्व पक्षिय समन्वयिक समिती माध्यमातून हे प्रश्न विशिष्ट पक्षाचे किंवा नगरसेवकांचे नसून शहराचे विषय आहेत. कोणत्याही पक्षाला वाटणार नाही माझ्या वॉर्डात कारवाई व्हावी. हा विशिष्ट नगरसेवकांचा विषय नसून संपूर्ण शहराचा विषय आहे. लोकशाही माध्यमातून आंदोलन करणार असून तो ज्यांचा त्यांचा विषय आहे. ठोस निर्णय होण्याच्या दृष्टीकोणातून नेमके विषय कोणते आहेत. मार्च पूर्वीच्या बांधकामांची यादी जाहीर होणार आहे. हाय कोर्टाच्या आदेशात सर्व गोष्टी माहीत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा प्रस्ताव अजून वेगळा आहे. सांगली-कूपवाड मनपाला १२४, नागपूर मनपाला ११२ वर्षे झाली. आपली महापालिका ग्रामपंचायत होती, त्यानंतर नगरपालिका व नंतर महापालिका झाली. ही संपूर्ण प्रक्रिया केवळ १२ वर्षांच्या कालखंडात झालेली आहे. एकिकडे चर्चा करत असताना ४५० बांधकामांचे फोटो काढले. आयुक्त ऑर्डर काढतील, आयुक्तांना जबाबदार धरले जाईल. ३० वर्षांपूर्वी रस्टन कॉलनीचे बांधकाम झाले. ३५ वर्षांपूर्वी लेआऊट सँक्शन झालेले आहे. ४०५ प्रमाणे कारवाई करणार असाल तर मार्चपूर्वीचे कसे धरणार. ३५ वर्षांपूर्वीच्या बांधकामावर दुरुस्ती केली जाते. या दुरुस्तीच्या नावाखाली फोटो काढला असेल तर ते कोणत्याच कायद्यात बसत नाही. ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. अटी शिथिल केल्या पाहीजेत. बिल्डींग परमिशनची प्रक्रिया बघूनच ती मिळवण्याची टाळाटाळ होते. आयुक्तांनी हे घोषित केले पाहीजे. ग्रामपंचायतीच्या पदसिद्ध नियमांत दुरुस्ती करतो, आमच्यासारख्या नगरसेवकांना भेटा, आम्ही सांगतो दुरुस्ती करा. दुरुस्तीची परमिशन घेता येत नाही. ते बेकायदेशीर असे म्हणता येत नाही. केवळ फोटो काढला, पंचनामा करतात. इतरांना वाचवण्यासाठी सगळ्यांना दोषी धरु नका. पत्र्या, मातीची बांधकामे होत आहेत. ती पडझड झालेली असेल तर त्याची वर्गवारी करा. आपण इथे उपोषणाला बसलो आहोत. आपण सुद्धा या ठिकाणी पहा, बसून या. राजकारणाची कंपनी करायची नाही. लोकांचा आक्रोश वाढणार आहे. ६०% आज येथे आहे. वर्गवारी कशी करणार. सगळ्या नगरसेवकांना नम्र आवाहन करतो. पारदर्शकता ठेवून, सखोल अभ्यास करुन स्वतःला वाचवण्यासाठी आयुक्तांनी यांना जबाबदार धरुन फटाफट आदेश काढणार हे अजिबात चालणार नाही. मी बोलतो तेच फायनल असे अजिबात इथे चालणार नाही. ही क वर्ग महापालिका आहे. आयुक्तांनी या सर्व गोष्टी व्यवस्थित हाताळल्या पाहीजेत. भावनिक विषय असल्यामुळे सर्वांना डोळ्यासमोर ठेवून विषय हाताळा. सर्वांनी एकत्र येऊन, नगरसेवकांनी येऊन आंदोलनाच्या दृष्टीकोनातून उपोषण करावे असे नम्र आवाहन करतो.

(त्यानंतर मा.आयुक्तांनी सभागृहासमोर निवेदन प्रकट केले.)

मा.आयुक्त :- सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह, सन्मा.सदस्य, मा.भाऊसाहेब भोईर यांनी बांधकामाची वर्गवारी करावी असा मुद्दा सभागृहात मांडला आहे. सभागृहासमोर निवेदन करु इच्छितो. बहुतांशी जणांना माहित आहे मारुती लालजी वंजारी व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन अशी याचिका २०११ मध्ये दाखल झाली होती. कायद्याच्या मर्यादेत अंमलबजावणी करुन संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन शासनाला सहा महिन्यांची मुदत दिलेली आहे. ही मुदत ३ ऑगस्टपर्यंत अस्तित्वात होती. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महापालिका सभेने १८ मार्च २०११ला उल्हासनगरच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्याबाबत ठराव केला होता. हा ठराव शासनाकडे पाठविला होता. ११ मे २०११ रोजी शासनाला विनंती केली होती, सर्वसाधारण सभेने ठराव केला होता.त्याअनुषंगाने शासनाने आदेश जारी करावेत. ११ मे २०११ ला त्या अनुषंगाने आपण पत्र पाठविले होते. त्याला शासनाने २१ मे २०११ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे. उच्च न्यायालयाने जनहित याचिकेत ३ एप्रिल २०११ रोजी दिलेल्या आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्यात यावे. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करावे असे २१ मे २०११ ला पत्र पाठवले आहे. १ वर्ष २ महिने झाले आहेत. ३ ऑगस्ट २०११ला पुन्हा केस हिअरींगसाठी आलेली होती. २ ऑगस्ट २०११ रोजी आपल्या मनपाचे तत्कालिन आयुक्तांनी बांधकामाची वर्गवारी केलेली आहे. अधिकृत किंवा अनधिकृत, बांधकाम परवानगी,नदीपूररेषेतील, रेड झोनमधील, विनाअनुषेशीय बांधकाम यांनी अर्ज द्यावा. अटी-शर्तींची पूर्तता होत असल्यास नियमित होऊ शकते. बेकायदेशीर अवैध विकास योजना, आरक्षणातील विनापरवाना बांधकामे सदरची बांधकामे कोणत्याही परिस्थितीत नियमानुकूल करता येणार नाही. महापालिकेने वर्गवारी केलेली आहे. शासनाला विनंती केलेली आहे. म्हटले आहे, अनियमित बांधकामे नियमित करण्याबाबतीत प्रस्तावित नियमावली अनुदर्शीय झोनमधील नियमात मर्यादेत बसू शकतील अशी बांधकामे नियमित करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ मार्च २०११ या कालावधीतील १) आरक्षणातील बांधकाम, २) रेड झोनमधील बांधकाम, ३) १.४ चटई क्षेत्र निर्देशांक, ४) बाल्कनी, पॅसेज इतर चटई क्षेत्रातून वगळण्यात येतील. असा अधिकृत किंवा अनधिकृत बांधकामचा मनपाने प्रस्ताव पाठवला आहे. १ जानेवारी २०११ ते ३१ जानेवारी २०११ ही मुदत मागितली होती. प्रस्ताव शासनाकडे २ ऑगस्ट २०११ ला केला आहे. शासनाकडून त्याला मंजूरी झालेली नाही. १९.११.२०११ रोजी बैठक संपन्न झाली होती. त्यावेळी उपमुख्यमंत्री व पालकमंत्री श्री.अजित पवार, सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटिल,तीन सन्मा.आमदार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर, उपमहापौर, तत्कालिन आयुक्त, विभागीय आयुक्त हे सर्व अधिकारी देखील या बैठकीला उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड मनपाच्या बांधकामांबाबतीत निर्णय झाला आहे.

१) कायद्याअंतर्गत नियमानुकूल होण्यास पात्र,

२) नवीन अंतिम मुदतीच्या ठरावाप्रमाणे शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.

३) नागरी भागात विकास नियंत्रण नियमावलीत बदल न करता स्वतंत्र कायदा करून २.५ चटई निर्देशांकात समापित करण्याची शक्यता शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावी. अनधिकृत बांधकामे कृतिने नियमित करण्यासाठी अधिमूल्य नियमित जुन्या पद्धतीचे बांधकाम नियमित करता येणार नाही याबाबतचा प्रस्ताव त्यात येणार नाही. यापुढे कोणतीही अनधिकृत बांधकामे होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. या बैठकीच्या कार्यवृत्तांताचा सारांश तुमच्यापुढे मांडला. शासनाने १३ मार्च २०१२ रोजी मुंबई प्रा.म.न.पा. व नगररचना अधिनियमात बदल करुन अनधिकृत बांधकाम कोणी करत असेल तर त्यांचेवर कारवाई होऊ शकते. बांधकामांकडे दुर्लक्ष करतील त्यांचेवर

त्याचवेळी कारवाई करता येऊ शकते. ही मु.प्रा.म.न.पा. अधिनियमात तरतूद केलेली आहे. गेल्या बैठकीत हा मुद्दा सांगितला होता. दरम्यान काही नगरसेवकांनी सांगितले आहे. उच्च न्यायालयाचे निर्देश अतिशय स्पष्ट आहेत. ६ महिन्यांची मुदत दिलेली आहे. ३१ मार्च पर्यंत दिलेली आहे. ही मुदत संपलेली आहे. शासनाकडे दोन्ही प्रस्ताव पाठविले होते. ते गेल्यावेळी ११ मे २०११ ला पाठविले होते. १० दिवसांत शासनाने स्पष्ट कळविले आहे. निर्देशांकाचे अनुपालन करण्यात यावे. वर्गवारी करुन प्रस्ताव पाठविला आहे. मुख्यमंत्री महोदय बैठकीला आले होते. अनुदर्शीय झोनमध्ये असलेले नियमानुकूल करता येणार नाही. बैठकीत अंतिम निर्णय झाला होता, नाविकास क्षेत्र, प्रस्तावित रस्ता क्षेत्र, पूररेषेतील क्षेत्रातील बांधकामे कोणत्याही परिस्थितीत नियमानुकूल होऊ शकत नाहीत. याबाबतीत कोणीही सहमतीचा दृष्टीकोण देऊ शकत नाही. बैठकीत चर्चा झालेली आहे. ३१ मार्च २०११ ही आपण स्वतःला मुदत घालून घेतली आहे. १ जानेवारी ते ३१ मार्च. तरीसुद्धा आपण १ वर्ष थांबलो होतो. आपले सगळ्या बाजूंनी प्रयत्न चालू होते. आपला प्रस्ताव त्यादरम्यान गेला होता. त्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली असल्यामुळे या वर्षीची बांधकामे नियमानुकूल होत असली तरी विरुद्ध गटांकडून निर्देश दिलेला आहे. २०१२ पर्यंत नियम शासनाने मंजूर केला तर ही बांधकामे नियमानुकूल करता येतील. ६०% शहर अनधिकृत आहे. १०-२० वर्षांतील १,७२,००० बांधकामे अनधिकृत होऊ शकतात. अजून प्रशासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. शासन स्तरावर डेव्हलपमेंट चालू आहे. आग्रही भूमिका लक्षात घेता पहिल्या टप्प्यात म्हटले आहे. १ एप्रिल नंतरच्या बांधकामाला आत्ता कोणतेही संरक्षण नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत झालेली चर्चा, उच्च न्यायालयात स्टॅण्ड, अनधिकृत बांधकामे ज्यात प्रशासन कारवाई करते नागरिकांच्या रोषाला सामोरे जाते. जुन्या बांधकामांची माहिती शासनाकडे देवून त्यांना विनंती केली आहे. लोकप्रतिनिधी सुद्धा प्रयत्न करीत आहेत. त्याचा पुर्नउच्चार करीत आहेत. १ एप्रिल २०१२ नंतर आज रोजी बांधकामे चालू असतील, आत्ता प्रोसिडींगमध्ये प्रोटेक्शन नाही. जुनी बांधकामे बांधण्याचा ठराव ३१ मार्च २०११ नंतरचा आहे. आत्ता एक बैठक झालेली आहे. ३१ मार्च २०१२ पर्यंत तूर्त कारवाई करु नये असे म्हटले आहे. त्यानंतरच्या बांधकामांवर आपल्याला कारवाई करावी लागेल.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, आत्ता आपण केलेल्या कारवाईची लिखित कारवाई केली. नवीन नोंदणी झाली, ते कशावरुन म्हणावे. घरे नोंदणी याचा कालखंड कोणता? आत्ता सांगितले, कायद्यानुसार काय, प्रत्येकाला कायद्याच्या चौकटीतून जावे लागते. यातून पारदर्शकता राहते. नागरीक भयभीत झालेले आहेत. माझ्यासाठी म्हणत नाही. प्रस्तावित ६१ मी. रोड केला. या प्रक्रिया पाहतो. ग्रामपंचायतीची नगरपालिका व नगरपालिकेची महानगरपालिका हा या महापालिकेचा कालखंड केवळ १२ वर्षांचा आहे. कायद्याची कोणतीही माहिती नसल्यामुळे सरपंच सगळ्या बाबी करत होते. नगरसेवकांना फोन करुन सांगतात. एखादा कार्यकर्ता जुन्या बांधकामाच्या दुरुस्तीसाठी अर्ज करीत नाही, ही त्याची चूक होते. तुमचे अधिकारातील कोण आहे,उगाच वाटते यांच्या विरोधात काम केले असेल म्हणून मनपाचे लोक पाठवले का काय अशी चर्चा लोकांमध्ये आहे. रस्त्यात आहे उत्तम ले-आऊट आहे. नोंदणीची संपूर्ण कागदपत्रे जमा करा. त्याचा पंचनामा करा. नंतर कारवाई करा. धोरण कायदेशीर आहे. कोर्टाच्या आदेशावेळी तुम्हाला आम्हाला काही करता येणार नाही. चुकीचा पर्याय सुचतो. आत्महत्या करायची प्रथा निर्माण करु नका. घराच्या दुरुस्तीसाठी अटी शिथिल करा. एन.ए. १८५७चा आणायला सांगतील तो कुठून आणणार. ते आम्हाला हाताशी धरुन

घरे बांधणार व पूर्ण करणार. या सर्व पार्श्वभूमीवर तुम्ही त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता संपूर्ण इतिहास पहा. वर्गवारी करा. नवीन बांधकामांचे सुद्धा संरक्षण होईल. ते होईल या माध्यमातून कोणाचाही बळी जाऊ नये असे नम्र आवाहन करतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आयुक्तांनी जो खुलासा केला, तारीख सांगितली यात बरेचसे जुने नगरसेवक यांना ही गोष्ट अपेक्षित होती. सर्वांनी एकत्र मिळून शासनाला ठराव पाठवला होता. उल्हासनगरच्या धर्तीवर करण्यात यावे. मी स्वतः महापौर म्हणून मुख्यमंत्र्यांबरोबर या बैठकीस हजर होतो. नियम करण्याचा प्रयत्न करतोय. सर्वप्रथम ३ आमदारांनी हा प्रश्न नीतीने घेऊन वास्तविक पाहता राज्यशासनात काँग्रेस व राष्ट्रवाही काँग्रेसची सत्ता असली तरी यात कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता सर्वसामान्य गोरगरीबांची कष्टकऱ्यांची घरे आहेत. घोटून-घोटून डेट सांगितल्या. सर्वांना माहित आहे. दि.३१/३/२०१२ ही तारीख आपण सांगताय. आपण चार्ज घेऊन दीड महिना झ ाला असेल. साडेतीन महिन्यांत नंतरच्या काळात एखाद्याने लपवले असेल, ॲडीशनल वाढवले असेल, जुन्या बांधकामाचे काम असेल अशी वर्गवारी करा. आपले अधिकारी फोटो काढत आहेत, ही वेळ येऊ देऊ नका. ईललिगल बांधकामे होताना दिसत आहेत. कॉलम पडतोय ताबडतोब पाडा, असा स्वतः तुम्हाला अधिकार दिलेला आहे. तुम्हालासुद्धा न्यायालयाचा आदेश होता. कायद्याच्या चौकटीत आहे. नवीन बांधकामांना अनधिकृत करता येणार नाही. सहा महिन्यांपूर्वी चालू असलेले काम आपण आत्ता चार्ज घेतल्यानंतर ते पाडणार हा चुकीचा निर्णय झालेला आहे. जिने प्रॉपरली झालेले आहेत. फर्निचर लागले आहे. फ्लोअरिंग होणार आहे. याला वेळ लागतो. आमचा एकच नियम आहे, नवीन बांधकामाला नदीपात्रातील, रस्त्यावरचे काम १००% पाडतात हे ठरावात म्हटले आहे. कोणालाही प्रोत्साहन देत नाही. गोरगरीबही नसतील. केलेले बांधकामात पूर्वीच्या अटी त्रूटी होत्या. त्या शासनाला दरवेळी सांगून कोणताही बदल केलेला नाही. अनेक त्रूटी आहेत. त्याची वर्गवारी सांगितली आहे. गोरगरीब, कष्टकऱ्यांच्या नगरीचे लोक भयभीत झाले आहेत. प्रत्येक क्षेत्रात हा प्रॉब्लेम आहे. रेड लाईन, रेड झोन शहरात विकासाची कामे होणार का फक्त ॲक्शन, ॲक्शन होणार. आमची विनंती आहे, नवीन कामे थांबवा, कॉलम केलेला आहे. वीटकाम राहीले आहे ते पाडा. बेकायदा कामे पाडा. ते करत असताना शासनाकडे आमचे म्हणणे मांडावे. शासन आपल्या बाजूला असेल तर त्या ठिकाणचे सी.ओ. किंवा आयुक्तांना जबाबदार धरले जाईल. झोन दाखला घेतल्याशिवाय प्लॉटची दुसऱ्यांदा विक्री होऊ नये. मनपाचे आरक्षणात खरेदीखत होते. चऱ्होली इथे अजून आपला रोड नाही. रिझर्वेशन माहिती असो किंवा नसू दे, शेतकरी गुंठेवारी करतो. घेऊन टाकतो. ते करत माणसे २० हेक्टर, २५ हेक्टर मध्ये एक दीड लाखाचा गुंठा घेऊन घरे बांधतात. आपण पाहतो जिथे रोड आहे, रिझर्वेशन आहे अशा जागा २ऱ्यांदा घेतात. हे प्रथम थांबवले पाहीजे. ज्या-ज्या ठिकाणी महापालिकेचे रस्ते आहेत, आरक्षणे आहे, अशा जागा ताबडतोब आपल्या ताब्यात घेण्याची कारवाई करा. पाटिल यांनी TDR मोबदल्यात जागा ताब्यात घ्यावयाची नाही. शासनाला विनंती केली आहे, पहिले रिझर्वेशन ताब्यात घ्या, त्यानंतर लोकांना डिक्लरेशन मंजूर करा. ताब्यात घ्यावयाचे नसेल तर सर्वे नंबर डिक्लेअर करा. आक्षेप साईटवर उपलब्ध करा, घरे बांधली जातात. नसेल तर कोणत्याही पक्षाच्या नगरसेवकांना संरक्षण द्यावे लागते. काळेवाडीची दीड हजार घरे रस्त्यात जातात. १०/१५ वर्षांपूर्वी बांधलेल्या घरांचा हा विषय लांबवावा तेवढा कमी आहे. चार्ज घेतल्यानंतर निर्णय घ्यावा. या लोकांनी नगरसेवकांना सपोर्ट केलेला आहे. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. तुम्हाला सपोर्ट करायला तयार आहे. नेमक काल सुरु केले का पूर्वी सुरु केले. याच्यापुढे

बांधकाम होणार नाही म्हणून आम्हाला सहकार्य करावे अशी विनंती करतो. संपूर्ण सभागृहाला विनंती करु इच्छितो की, सर्वांच्या जिव्हाळ्याचा, कार्यकर्त्यांचा प्रश्न असल्यामुळे मुख्यमंत्री महोदय निर्णय घेणार आहेत. फॉलो-अप करतोय. हा प्रश्न केवळ पिंपरी- चिंचवड शहरापुरता नसून राज्यासाठी दुसरा कायदा असे करता येणार नाही. अशी परिस्थिती ठाणे, पुणे इथे सुद्धा आहेत. निर्णय घेत असताना आड येणारे कोण? ४ FSI ची मागणी केलेली आहे. हा निर्णय होईपर्यंत आपल्याला सुद्धा कायद्याची अडचण आहे. हा मुद्दा लक्षात घेता मुख्यमंत्र्यांचे स्टेटमेंट आहे. सी.ओ. व आयुक्तांवर कारवाई केली जाईल. महिन्याभरात निर्णय घेणार आहोत. दुसरीकडे ४५० लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत. अशा परिस्थितीत  लक्षात घेता  ३ आमदारांनी विधान भवनासमोर धरणे धरले आहे. म्हणून आजची सभा तहकूब करावी. प्रशासनाचा निषेध करुन राज्य शासन, मुख्यमंत्री यांनी लवकर मार्ग काढावा. तोडगा काढावा, तोपर्यंत जेवढे संरक्षण देता येईल तेवढे द्यावे. तोपर्यंत सभा तहकूब करावी अशी विनंती करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, अनधिकृत बांधकामाचा प्रश्न खरेतर आजचा नाही. आमदार उपोषणाला बसले असतील तरीदेखील तीन महिन्यांपासून महापालिका असेल, प्राधिकरण असेल अनधिकृत बांधकामांसंदर्भात कठोर कारवाई करतोय. आपण आत्ता जागे झालो. असे वाटते निविदा झाल्याझाल्या मनपाने जवळपास ९३ हजार नोटीसा काढल्या. बरेचशी नाटके झाली. प्राधिकरणाने कारवाई केली. २०५ पैकी १४५ कामांवर मनपाने कारवाई केली आहे. खरेतर हा जीवघेणा प्रश्न प्रामुख्याने सर्वसामान्य नागरिकांना सतावतो आहे. यात प्रत्येक मनुष्य भरडला गेलेला नाही. आर्थिक प्रबळ असलेला भरडला जात नाही, तर सर्वसामान्य गरीब मनुष्य यात जातो. ३१ मार्च २०१२ पर्यंत झालेली बांधकामे कायद्यानुसार नियमित होत असली तर ती नियमित करा. माझा प्रश्न याअनुषंगाने आहे. १ एप्रिल २०१२ नंतरची जी बांधकामे चालू आहेत, आजदेखील शहरात मोठ्या प्रमाणावर चालू आहेत, ती थांबवली का नाही. त्यांना समज का दिली नाही. तुम्ही चुक करता, कामात निष्क्रियता दाखवता. सगळ्या गोष्टींचा सर्वसामान्य माणसाला त्रास होतो. हे जरी थांबवले असते तरी आत्ता केलेल्या बांधकामांवर उद्या कारवाई होणार आहे. १ एप्रिल २०१२ नंतरची बांधकामे पाडणार आहेत. न्यायालयाचा आदेश असताना आज रोजी बांधकामे चालू होती. ती थांबवण्यासाठी कोणी काळजी घेत नाही. गरीब माणसाचे नुकसान होणार आहे. ते रस्त्यावर येणार आहेत. ते घर बांधू शकत नाहीत. जागा पण घेऊ शकत नाहीत. घरे पाडण्यात कोणाला आनंद मिळत असेल. माझे त्यांना जाहीर आवाहन आहे, त्यांनी घरे पाडावीत, पाडण्यासाठी सगळी यंत्रसामुग्री मी देतो. त्यांचे दुःख त्यावेळी कळेल. खरेतर महापालिकेचे अनेक गोष्टींत चुकलेले आहे. २६० रिझर्वेशनमध्ये डी.पी.त २५,००० बांधकामे झाली. हे एका दिवसांत झाले का. १९९५मध्ये डी.पी. प्रसिद्ध झाला नाही. २६० रिझर्वेशनमध्ये जवळपास २५,००० बांधकामे एका दिवसात झाली का. प्रशासन झोपले होते का? आपली चूक सर्वसामान्य माणसाला भोगावी लागणार आहे. सर्वसामान्य मनुष्यातील किती जणांना डी.पी.चे रिझर्वेशनबद्दल माहिती आहे. या ठिकाणातून रस्ता जातो. तुमचा पैसा जवळचा नाही. नगररचना खात्याचा पसारा किती. नगररचना विभागात झोन दाखला मागितला तर आवश्यक फी भरुन पत्र लिहीतो. आत्ता या फाईलमध्ये ते पत्र नाही असे सांगून मग परत ती फाईल फिरवतात. इथे हातोहात झोन दाखला मिळत नाही. इथे अनेक बांधकाम व्यावसायिकांना झोन दाखला लगेच मिळतो. सर्वसामान्यांना हातोहात मिळत नाही.  जागेची मोजणी करावी लागते. १९३५ नंतर वळून मोजणी झालेली नाही. राज्यात मुळशी इथे पहिलीच मोजणी सुरु केलेली होती. ७/१२ उताऱ्यावर

पाच पन्नास नावे असतात. हेक्टरवाईज क्षेत्र असते. त्यासाठी संपूर्ण मोजणी करावी लागते. त्यासाठी चार/पाच लाख फी पुरवावी लागते. कोट्यावधींच्या रकमेसाठी लाखो रुपये द्यावे लागतात. वचक ठेवावा लागतो. सर्वसामान्य मनुष्य परमिशन कशी काय घेणार. याचा पाठपुरावा कोणी केला. सर्वसामान्य मनुष्य अनधिकृत बांधकाम करतो, त्याची व्यथा समजून घेतली पाहीजे. त्यांना दोषी ठरवतो. परंतू त्याच्या पाठीमागे कोण हे मात्र कोणी पाहत नाही. प्रामुख्याने शासनापासून सुरुवात होते. सगळी प्रक्रिया होत असताना एन.ए.ची ऑर्डरचा रेट रु.४१५/-प्रति स्क्वे.फूट होता. शासनाने या महापालिकेचा डी.पी. मंजूर केला आहे. यलो झोन दाखविला परंतू तो मंजूर झालेला नाही. सर्वसामान्य मनुष्याला वेठीस धरुन बांधकामे पाडण्याची प्रक्रिया सासत्याने चालू आहे. दि. १३ रोजी प्रामुख्याने मु.ंप्रा. अधिनियम ४९ चे कलम ५१६ ब मध्ये दुरुस्ती झालेली आहे. कागदपत्रे करुन अनधिकृत बांधकामे का करतील. याला कोणी पाठिंबा दिला. कायद्याचे मूळ हे अटीत असावे. कायदा होत असताना कोणी ठप्पा काढायचा, कायदा झाल्यानंतर आपण ओरडायचे ही मात्र विरोधाची बाब आहे. कायदा होत असताना ओरड केली असती तरी सर्वसामान्य माणसाला ते भोगावे लागते आहे, ते भोगावे लागले नसते. मिळकतींच्या नोंदी बंद केल्या. करसंकलनमध्ये आपण कायदेशीर अटी शर्तीची प्रक्रिया बंद केली. या शहरात आजदेखील ४०/५० हजार बांधकामे आहेत. उद्या हे पाडले गेले तर राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होणार आहे. यात प्रशासन जबाबदार आहे. लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही जबाबदारी घेणार नाही. ही सगळी बांधकामे होत असताना आपण कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही, थांबवले नाही. शहरात बांधकामे होत असताना आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. कायद्याचा धाक दाखवून सगळे फोटो जमा करायला लावा. ज्यांचे नुकसान होणार नाही त्यांच्याकडे गांभीर्याने पहा. ज्यांचे नुकसान १५ दिवसांनंतर होणार असेल, आज रोजी त्यांना सावध करा, त्यांचे बांधकाम पाडणार आहेत ते बांधू नका. कर्ज काढले असेल. जेवढी रिझर्वेशनमध्ये बांधकामे झाली असतील, भविष्यात तसे होऊ नये हा उद्देश आहे. सर्वसामान्य मनुष्याला माहिती होऊ द्या. कुठून कुठे रस्ता जातो ते माहिती होऊ द्या. पूरनियंत्रणरेषा निळी का लाल हे या सर्वसामान्य रहात असणाऱ्यांना माहित नसते. अधिकाऱ्यांना माहित नसते. पर्याय नसतो, त्यांनी ते कधी पाहिले नाही. या शहरात राहणारे गरीब, कामगार वर्गाची संख्या मोठी आहे. आरक्षण टाकत असाल तर त्यांना सावध करा. राज्य शासनाने भूमिका घेतली आहे, केंद्राने निर्देश दिलेले आहेत. अनधिकृत बांधकामे रोखण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी प्रश्नाला उत्तर देताना सांगितले आहे. आम्ही सुद्धा जबाबदारीने जेवढे लोक येतात त्यांना सांगतो. अनधिकृत बांधकामे करु नका. आपण सुद्धा त्यांना शहाणे करायचे काम करा. ही बांधकामे झाली त्याठिकाणी नागरिक रहात होते, वस्त्या होत्या. त्यांना बेघर करायचे काम करु नका. सभागृहाच्या वतीने विनंती करा. जी सर्वसामान्य माणसे पूर्ण झालेल्या बांधकामात रहात आहेत, त्यांना बेघर करु नका. जागेवरच कुठेतरी बांधून देऊ नका.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी अनधिकृत बांधकामा संदर्भात विषय सुरु आहे. निश्चितपणे शहरातील जनता या मुळ प्रश्नाच्या गाभ्या पासून अनभिज्ञ आहे. आपण उच्च न्यायालयाचा आदेश वाचून दाखविला. २९ नोव्हेंबर २०११ रोजी झालेल्या बैठकीचा सभावृत्तांत सांगीतला. त्यावरुन असे दिसून येते की, त्या मिटिंगला उपस्थित असलेली सर्व मंडळी आजच्या परिस्थितीला जबाबदार आहेत. त्यावेळेला जो ठराव झाला त्या गोष्टीला मान्यता दिलेली आहे. ३१ मार्च १२ नंतरच्या बांधकामावर कारवाई होईल. बीपीएमसी ॲक्टमध्ये बदल झाला हे विधी मंडळात बदल होतात. त्यामध्ये अधिका-यांच्या माना अडकलेल्या असतात अशावेळेला आदर्श सारखे

घोटाळे बाहेर येतात. याठिकाणी अशा माना आडकल्या म्हणून हे अनधिकृत बांधकामे बाहेर आलेली आहेत. आमदारांनी त्यावेळेला विधी मंडळामध्ये का आडवले नाही. आमच्या शहरात आज सुध्दा बांधकाम सुरु आहेत. १ ऑगष्ट पर्यंत ही मुदतवाढ पाहिजे. आजच्या परिस्थितीमध्ये आयुक्त साहेब तुम्ही आणि गरीब जनता अडकलेली आहे. महापौर साहेब, आपण त्या दिवशी आयुक्तांकडे जाऊन मिटिंग घेतली त्याच्यानंतर बांधकाम पाडण्यासाठी थांबलेले आहे. आपल्या हातात, आपल्या घरामध्ये फार मोठी सत्ता आहे. आज ब्रेकिंग न्युज चालली आहे. आमदारानी सांगीतले हे काम झाले नाहीतर सत्तारुढ पक्षाचा पाठिंबा काढून घेऊ. अनेक येतात जातात नंतर कुठलीही कारवाई होत नाही. आज ही परिस्थिती एका कडेला घेवून गेलेली आहे. यामध्ये जिओ या मरो अशी परिस्थिती झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये आयुक्त साहेब आपण म्हणता आठ दिवसात सुध्दा कारवाई होऊ शकते. या शहरात खासदार हे सुध्दा लोकांच्या मतातून निवडून आलेले आहेत त्याना कुठल्याही मिटिंगला मुख्यमंत्र्यांकडे बोलाविले नाही. जे आज मांडले ते त्यांच्या समोर मांडले असतेतर ही वेळ आली नसती. जाळायचे आम्हीच आणि श्रेयासाठी धडपड करायची आम्हीच, याचा मी निषेध करते. सभागृहात हा विषय चर्चेला आला ही जबाबदारी सगळयांची आहे. आमची अशी मागणी आहे १ ऑगष्ट पर्यंतचे जेवढे बांधकाम आहे ते सर्व बांधकाम याठिकाणी नियमित करुन घेण्यासाठी हा ठराव शासनाकडे पाठवावा अशी मी विनंती करते.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, आज याठिकाणी अनधिकृत बांधकाम संदर्भात प्रशांत शितोळे यांनी याठिकाणी मुद्या मांडलेला आहे. पिंपरी चिंचवड शहराचे तीन्ही आमदार मुंबईमध्ये या अनधिकृत बांधकामा विरुध्द धरणे अंदोलन करतात. त्यांना पाठिंबा देण्यासाठी सभागृहाने तहकूबी देवून त्यांना पाठिंबा द्यावा अशी सूचना प्रशांत शितोळे यांनी केलेली होती. १२८ नगरसेवकांचा हा प्रश्न आहे. त्यांच्या वॉर्डामध्ये अनधिकृत बांधकाम झालेले आहेत हे वारंवार चालत आलेले आहे. याच्यामध्ये सगळयांची जबाबदारी आहे. गेली अनेक वर्षे सगळयांच्या वॉर्डामध्ये अनधिकृत बांधकाम चाललेले आहेत. भाऊसाहेब भोईर यांनी मांडलेले आहे. आपण नवीन आलेला आहात. या पिंपरी चिंचवड शहराची जी वाटचाल झालेली आहे ती ग्रामपचांयत, नगरपालिका आणि महापालिका अशी झालेली आहे. अतीशय कमी कालावधीमध्ये ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका असे रुपांतर झ ालेले आहे. याठिकाणी मोठयाप्रमाणावर कामगार आलेले आहेत. रस्टन कॉलनी कधी झालेली आहे. यूएलसी कायदा येण्याच्या अगोदर ती झालेली आहे. भोसरीमध्ये सुध्दा सेन्च्यूरी एन्का कॉलनी झालेली आहे. यूएलसी कायदा आला तो गोरगरीबांना स्वस्तामध्ये घर मिळावे म्हणून आलेला होता. परंतु त्याची अंमलबजावणी व्यवस्थीत झालेली नाही. येथील शेतक-यांनी यूएलसी कायद्याच्या भीतीने जमिनी विकल्या आणि कामगारांनी एक, अर्धा गुंठा जागा घेवून हे घर झालेली आहेत. या पध्दतीने पिंपरी चिंचवड शहर वाढलेले आहे. कामगारानी स्वतच्या कष्टाच्या पैशातून घर बांधले आहे. यामध्ये सर्वच पक्षाचे लोक जबाबदार आहेत. राजकीय विषय कुठल्याही पक्षानी करु नये. यामध्ये सगळयांनी एकत्रित येवून भांडले पाहिजे. या विषया संदर्भात सर्वपक्षीय लोकांनी एकत्रित येवून हे केले पाहिजे. आमचे आमदार सुध्दा त्याठिकाणी अंदोलन करतात. ३१ मार्च १२ ही डेडलाईन ठरलेली आहे हा विषय मुळात नोव्हेंबर महिन्यात झालेला आहे त्यावेळेला असे ठरले की मार्च १२ पर्यंत होणा-या बांधकामावर कारवाई करु नये. त्यानंतर बांधकाम झालेतर त्याच्यावर कारवाई करावी असे झालेले आहे. आमची अशी विनंती आहे की योगेश बहल यांनी सांगीतल्याप्रमाणे आता ग्राऊंड लेव्हलला बांधकाम असेलतर त्यांच्यावर कारवाई करावी व ते थांबवावे परंतु काही बांधकाम

स्लॅबला, प्लॅस्टरला आले आहेत त्यांच्यावर कारवाई करु नये. येथून पुढच्या काळात आपल्या शहरात अनधिकृत बांधकाम होऊ नये यासाठी आम्ही सुध्दा लोकांना तशा सूचना करु. भविष्य काळात असे बांधकाम केलेतर कोणीच आपल्याला सहकार्य करणार नाही. गोरगरीब लोकांनी कर्ज काढून मोठया प्रमाणात घर बांधले त्यांचे असे नुकसान व्हावे अशी प्रशासनाची सुध्दा भूमिका नाही व आपण सुध्दा यामध्ये अशी सकारात्मक भूमिका घ्यावी. आता पंचनामा म्हणून फोटो काढण्याचे काम चालू आहे ते थांबवावे. लोकांनी अधिकृत घर बांधण्यासाठी काही नियमात बदल करावे लागेल. त्यांच्या समोर अनेक अडचणी आहेत. भविष्यकाळात नियमामध्ये बदल करुन सर्वसामान्य लोकांना अधिकृत घर कशी बांधता येतील यासाठी प्रशासनाने सुध्दा शासन लेव्हलला प्रयत्न करावेत. तसेच हे चांगले निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करु. जोपर्यंत मिटिंग होत नाही तोपर्यंत या विषयावर कारवाई करु नये व सगळयांचे मत तेच आहे. आता विषय मांडला हा विषय तहकूब करुन नागरीकांच्या हिताच्या दृष्टिने तीन आमदारांना पाठिंबा जाहिर करण्याच्या दृष्टिने ही सभा तहकूब करावी.

मा.आश्विनी मराठे :- मा.महापौर साहेब, तीन्ही आमदारानी पिंपरी चिंचवडच्या नागरीकांसाठी धरणे अंदोलन धरलेले आहेत त्यासाठी आमचा निश्चित पाठिंबा आहे. माझी विनंती राहणार आहे की यापुढील जे अनधिकृत बांधकाम आहे त्यासाठी महापालिकेनी काळजी घ्यावी. आज जे प्रश्न उपस्थित झालेले आहेत ते यापुढे होऊ नयेत. नागरीक अत्यंत भयभीत झालेले आहेत, हे भविष्यामध्ये व्हायला नाही पाहिजे. जो शासन निर्णय होईल तो नागरीकांच्या हिताचा व्हावा, नागरीकांच्या हितासारखा निर्णय व्हावा.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, याठिकाणी भाऊसाहेबांनी, आप्पानी, सुलभाताईनी विषय मांडलेला आहे. आजच्या तहकूबीच्या अनुषंगाने सुचना आहे की, प्लॉटची मोजणी होत नाही, वहिवाट मोजणी बंद केलेली आहे. डीपी मध्ये असताना पुन्हा एन.अे. ऑर्डर कशाला पाहिजे. झोन दाखला मिळत नाही त्यासाठी लोकांना फिरावे लागते. एका बाजुला या शहरातील करदाते आपला लाखो रुपये कर भरतात आणि रज्याच्या बाहेरुन जे लोक आले ते झोपडपट्टी किंवा नदीच्या जवळ झोपडपट्टी घालतात त्या लोकांसाठी राज्यशासन, महापालिका कोटयावधी रुपये खर्च करुन घर देते परंतु जे गोरगरीब लोक कष्ट करुन घर बांधतात त्यांना बेघर करु नका. ज्यांचे काम पुर्ण झालेले आहे, शेवटच्या स्टेजला आहे त्यांच्या नोंदी करुन घ्याव्यात. टॅक्सच्या माध्यमातून आपण मोठमोठे प्रकल्प राबवितो. झोपडपट्टीमधील लोकांना पक्की घर देतो. स्वतःच्या पैशातून घेतलेल्या जागा, स्वतःच्या पैशातून बांधत असतात. घर विनापरवाना असते ती जागा स्वतःची आहे, विनापरवाना आहे स्वतःच्या कष्टाने घेतलेली अशा माणसाला असे न करता नवीन होणा-या कामाला थांबवावे परंतु झालेल्या कामाला पाडू नका. गरीब लोकांच्या डोक्यावरील छत्र जाणार नाही म्हणून तीन्ही आमदारांच्या मागणीवर मा.मुख्यमंत्र्यांनी, राज्यशासनानी त्वरीत निर्णय घ्यावा त्यासाठी ही सभा तहकूब करावी.

मा.आयुक्त :- मा.महापौर साहेब, याठिकाणी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्याची माहिती सभागृहासमोर ठेवणे आवश्यक आहे. नवीन बांधकाम करण्यामध्ये अडचणी येतात असे म्हणलेले आहे. नागरीकांना रिझर्व्हेशन कुठे आहेत याची माहिती नाही, घरबांधणी प्रक्रिया सुलभ करावी इ. मुद्दे मांडलेले आहेत या मुद्यांचा निश्चित प्रशासन विचार करेल. दुसरा खरेदीखताचा मुद्या उपस्थित

केला. तसेच ज्या सोई सुविधा देण्यात येतात त्या थांबविणे आवश्यक आहे. कारण एका बाजुला अनधिकृत बांधकामाची चर्चा करतो आणि दुस-या बाजुला पाणी दिलेले आहे, ड्रेनेज लाईन दिलेली आहे हे थांबविण्याबाबतचा विषय पुढच्या जी.बी.ला येईल. आतापर्यंत झालेल्या बांधकामाला केवळ प्रशासन जबाबदार आहे असे सांगीतले, लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही जबाबदारी स्विकारणार नाहीत असे म्हणलेले आहे. गेल्या वर्षापासून याबाबतची चर्चा या सभागृहात चालू आहे. ३ फेब्रूवारीला मा.न्यायालयाने आदेश दिलेले होते व १८ फेब्रूवारीला जी.बी.ला विषय आला. गेल्या दिड वर्षापासून हा विषय चर्चेला येतो, असे असताना आज हा विषय नवीन आला असे म्हणणे योग्य होणार नाही. मार्च १२ ला उच्च न्यायालयामध्ये म्हणणे सादर केले त्यावेळेला ६६ हजार नोटिसा दिल्याची माहिती उच्च न्यायालयाला सादर केलेली आहे. २६० रिझर्व्हेशनमध्ये २५ हजार बांधकाम असा मुद्दा उपस्थित केला. २ ऑगष्ट ११ मध्ये शासनाला विनंती केलेली आहे त्यामध्ये असे म्हणलेले आहे की रिझर्व्हेशनमधील बांधकामाला संरक्षण देता येणार नाही. याठिकाणी सगळयांची भूमिका अशी आहे की कारवाई थांबवावी परंतु प्रशासन हे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी असते, कायदा विधी मंडळ तयार करते, धोरण मंत्री मंडळ राबविते त्याच्यामध्ये फेरफार करायचा असेलतर न्यायालय करते. आम्ही नौकरशाह म्हणून कायदयामध्ये जे आहे त्याप्रमाणे अंमलबजावणी करतो. शासनाकडून धोरणात्मक बदल झाल्याशिवाय जुन्या बांधकामाला संरक्षण देण्याबाबत विचार करता येणार नाही, मुदत वाढविता येणार नाही. विधी मंडळ, मंत्रीमंडळ या सर्वानी सांगीतलेले आहे कारवाई करा. १ एप्रिल १२ पासूनच्या बांधकामावर कारवाई करणे भाग पडते असे मी सांगेल.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, विधी मंडळात ठराव झालेला असलातरी या सगळया गोष्टी नंतर, माणुस काम करतो तोच चुकतो, जो काम करत नाही तो चुकत नाही. विधी मंडळात चुकिचे झाले असलेतरी ती दुरुस्ती करण्यासाठी तीन आमदार धरणे अंदोलन करत आहेत. आपल्या अधिका-यांना हे अगोदर दिसले नाही का त्यांच्यावर कारवाई करा नंतर गोरगरीबांचे घर पाडा. आज आम्हांला प्रशासनाचा निषेध करायचा नव्हता. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी हे एका रथाचे दोन चाक आहेत. दोन्ही चाक बरोबर चाललीतर व्यवस्थीत कारभार चालतो परंतु अशा पध्दतीने कारभार चालणार असेलतर प्रशासनाचा निषेध करावा लागेल. आता प्रशासनाचा निषेध करुन ही सभा तहकूब करावी.

मा.महापौर :- पिंपरी चिंचवडचे तीन्ही आमदार अनधिकृत बांधकामाबाबत विधानभवन येथे उपोषणाला बसले असल्यामुळे त्यांना पाठिंबा म्हणून शुक्रवार दिनांक ३.८.२०१२ रोजी दुपारी २.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)<br>
महापौर<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -६
सभावृत्तांत
(२०.७.२०१२ दुपारी २.०० व २.३० ची तहकुब सभा)

दिनांक :- ३.८.२०१२ वेळ:-दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.७.२०१२ (दु.२.३०) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.३.८.२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार
२७. मा.जावेद रमजान शेख
२८. मा.चारुशिला प्रभाकर कुटे
२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण
३८. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.पवार मनीषा काळूराम
४३. मा.प्रसाद शेट्टी
४४. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४७. मा.शेख अस्लम शैकत
४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५१. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५२. मा.सुपे आशा रविंद्र
५३. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
५४. मा.अजित दामोदर गव्हाणे
५५. मा.गोफणे अनुराधा देविदास
५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५७. मा.महेशदादा किसन लांडगे
५८. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५९. मा.लोंढे शुभांगी संतोष
६०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६२. मा.सावळे सिमा रविंद्र
६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६६. मा.बहल योगेश मंगलसेन
६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६८. मा.कदम सदगुरु महादेव
६९. मा.गिता सुशील मंचरकर
७०. मा.कैलास महादेव कदम
७१. मा.छाया जगन्नाथ साबळे
७२. मा.वाघेरे सुनिता राजेश
७३. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७४. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७६. मा.काळे विमल रमेश
७७. मा.पाडाळे निता विलास
७८. मा.विनोद जयवंत नढे
७९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८१. मा.विमलताई सुरेश जगताप
८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८३. मा.बारणे निलेश हिरामण
८४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८५. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८६. मा.बारणे माया संतोष
८७. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८८. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८९. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९०. मा.कलाटे स्वाती मयुर
९१. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९२. मा.चौंधे आरती सुरेश
९३. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९४. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९५. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९६. मा.जवळकर वैशाली राहुल
९७. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९८. मा.जगताप राजेंद्र गणपत
९९. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१००. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०१. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०२. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०३. मा.प्रशांत शितोळे
१०४. मा.काटे रोहित अप्पा सुदाम
१०५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०६. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०७. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०८. मा.संजय केशवराव काटे
१०९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११०. मा.पाटील सुजित वसंत
१११. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त, मा.मुंढे,मा.पवार,मा.कुलकर्णी,मा.गावडे,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर -प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.काची -उपशहर अभियंता, मा.दुधेकर,मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.पाटील,मा.जाधव,मा.लडकत, मा.पठाण,मा.दांगट-कार्य.अभियंता,मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी व मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सदस्य, प्रथमतः बुधवारी पुण्यात बॉम्बस्फोट झाला, बॉम्बस्फोट करणा-या प्रवृत्तीचा जाहिर निषेध झाला पाहिजे. तसेच पिंपरी चिंचवड शहरात सुरक्षाविषयी उपाययोजना काय आहेत. आपल्या पिंपरी चिंचवड मधील जवळपास १८ लाखाच्या पुढे असलेली लोकसंख्या आहे यांच्या विषयी सुरक्षेच्या बाबतीत उपाययोजना कुठल्या केलेल्या आहेत याची माहिती दिली पाहिजे. आपतकालीन व्यवस्था किती कार्यरत आहे या विषयी माहिती दिली पाहिजे. आता पावसाळयाचे दिवस चालू आहेत, या दिवसामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील परिस्थिती बाबत वर्तमानपत्रामधुन बातम्या वाचण्यासाठी मिळतात. पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात घबराटीचे वातावरण आहे. तसेच पुण्यामध्ये बॉम्बस्फोट घडलेला आहे अशा दोन्ही मध्यमातून पिंपरी चिंचवड शहरात पिंपरी कॅंप, भोसरी, रावेत बंधारा, एसटी स्टॅण्ड व गर्दीच्या ठिकाणी उपाययोजना केलेल्या दिसत नाहीत. तरी याबाबतीत काय उपाययोजना केलेल्या आहेत. अनधिकृत बांधकामा संदर्भात लोकांमध्ये घबराट निर्माण झालेली आहे त्यासंदर्भात आणि या बॉम्बस्फोटाच्या बाबतीत सुरक्षाव्यवस्था व यावर उपाययोजना काय आहे याची माहिती द्यावी अशी विनंती करतो.

मा.राहुल भोसले :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या चळवळीतील सहकारी व आझाद हिंद सेनेच्या महिला आघाडीच्या पहिल्या प्रमुख पद्मविभूषण- कॅप्टन लक्ष्मी सहगल, नॉव्हेल ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संचालक- गणपत गोरखे, ज्येष्ठ निर्माता दिग्दर्शक- बी.आर.इशारा, ज्येष्ठ संगीतकार-बाळ पळसुले यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.अतुल शितोळे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचे मित्र कैलास कदम यांनी हा विषय सभागृहासमोर मांडलेला आहे तो अतीशय गंभीर आहे. पुणे नगरीमध्ये चार ठिकाणी छोटे छोटे बॉम्बस्फोट झाले त्यामुळे पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये सर्वसामान्य माणसाला किती भितीच्या वातावरणामध्ये रहावे लागते याचा अंदाज आलेला आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर हे भारताच्या अग्रगण्य शहरातील शहर आहे. या शहराचा विकास खुप चांगल्या पध्दतीने झालेला आहे परंतु अशाप्रकारच्या दुर्घटना घडल्यानंतर शहरामध्ये राहणा-या नागरीकांना या शहराची भिती वाटू लागते किंवा आमच्या सारख्याना असे वाटते की यांचे प्रतिनिधीत्व करतो त्यामुळे आपल्याकडून असलेली सुरक्षा कमी पडते की काय म्हणून वेगळे चित्र डोळयासमोर उभे रहाते. पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड शहर हे दोन नावाचे शहर असलेतरी बाहेर गेल्यानंतर आम्ही पुण्याचे आहोत असेच सांगतो. याठिकाणी चांगले चांगले उदयोगधंदे, कंपन्या, कारखाने आहेत. अशी परिस्थिती आपल्या शहरात झालीतर त्यासाठी सुरक्षीततेच्या उपाययोजना काय आहेत असा प्रश्न पडतो. आपल्याकडे अशाप्रकारची सुरक्षा व्यवस्था असावी याबाबतीत मागे सुध्दा सविस्तर चर्चा झालेली होती. यापुर्वी सुध्दा विवीध ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे किंवा खाजगी क्षेत्रात काही लोकांना ते लावण्यासाठी बंधनकारक करणे, वेगवेगळया प्रकारची यंत्रणा बसविणे याबाबत पोलीस आयुक्तांनी सांगीतलेले होते ती यंत्रणा कार्यान्वीत झालेली दिसून येत नाही. आपण सिग्नलवर कॅमेरे लावलेले आहेत. ती सुरक्षा आहे असे वाटत नाही परंतु ते किती तास चालू आहेत हे त्यांनाच माहित आहे. आपण खर्च केलेला आहे व ऑपरेटिंग सिस्टीम पोलीसांकडे दिलेली आहे ते ऑपरेट करत आहेत. आपण यंत्रणा खरेदी करुन लावून देतो ती सुध्दा सक्षम आहे असे मानता येत नाही. ज्याठिकाणी वर्दळ आहे, महापालिकेच्या इमारती, कार्यालय, शाळा, शैक्षणिक संकुल अशाठिकाणी हे उपाय केले पाहिजेत. परवाना मागण्यासाठी जे येतात त्यांना कम्पलसरी करावे की चारही बाजूने सीसीटिव्ही कॅमेरे लावले पाहिजेत, अशी अशी सुरक्षा करावी लागेल असे सांगीतले पाहिजेत. वेगवेगळे सुरक्षाचे उपाय केले पाहिजेत. आपली महापालिका वेगळया धुंदीत आहे. आता आपण सर्व बांधकाम पाडण्याच्या तयारीत आहेत. जो तो अधिकारी हातातील काम सोडून कॅमेरा घेवून फिरतो, हातात नोटिसा घेवून फिरतो. शहरामध्ये मलेरिया, स्वाईन फ्ल्यू यावर नियंत्रण केलेले आहे का. आयुक्त साहेब तुम्ही आल्यापासून हा विषय गंभीर असलातरी तो एकच विषय आपल्या डोळया समोर आहे. कायदेशिर कारवाईला सामोरे जात असताना इतर गोष्टीकडे तुमचे दुर्लक्ष व्हायला नाही पाहिजे. ब-याचशा गोष्टी आम्हांला नांदेडवरुन

शिकून यावे लागते, आमचे अधिकारी नांदेडला पळतात, नांदेड महापालिका आमच्या नंतरची आहे. आमच्याकडून आदर्श घ्यावा अशी महापालिका आम्ही तयार केलेली आहे. भारतामध्ये बेस्ट सिटीचा पुरस्कार योगेश बहल महापौर असताना या शहराला मिळालेला आहे. आमच्या शहराला सध्या दुस-या शहराकडून काही घेण्याची गरज आहे असे वाटत नाही, याचा अर्थ तुम्ही तसे करु नका असे म्हणत नाही, जरुर करा. शासनाचे आदेश मान्य आहेत, विधी मंडळाने केलेले कायदे मान्य आहेत, न्यायसंस्थेनी दिलेले निर्णय हे सर्व आम्हांला मान्य आहेत परंतु हे करत असताना आपण या शहरातील इतर कामे करण्यासाठी सुध्दा बांधील आहात. केवळ बांधकाम अनधिकृत दिसते म्हणून १०० कामापैकी ८० कामे सोडून देणार हे सुध्दा पटणार नाही. परवाच आमच्या परिसरात तीन दिवसापुर्वी मिलिंद दिक्षीत नावाचा रुग्ण स्वाईन फ्ल्यूने दगावला. स्वाईन फ्ल्यूची तीव्रता कमी झालेली असलीतरी त्याच्याबाबतीत कोणी दखल घेतली का. पवनानदीच्या तेथे हायसिंथ वाढलेले आहे तीकडे लक्ष नाही. या शहरातील समस्या कशा कमी होतील या पध्दतीची कामे आपल्याकडून अपेक्षीत आहेत. आपण त्या पध्दतीचे काम करता त्याला यश आलेले दिसत नाही. या शहरात अनेक प्रलंबीत प्रकल्प आहेत ते सोडून ज्या गोष्टीमुळे सर्वाना त्रास होतो, तुम्हांलाही त्रास होतो परंतु याही गोष्टी करणे क्रमप्राप्त आहे. आपण शहरातील इतर कामाकडे लक्ष द्यावे, कर्मचारी वर्गाकडे, अधिकारी वर्गाकडे लक्ष द्यावे व आम्ही सांगीतलेले काम प्रायोरिटीने करावेत. एखादया कामात विनाकारण खो घालण्याचे काम अधिकारी करतात हेही अधिकारी व्यवस्थित, सुरळीत करत नाहीत, आम्ही चुकिचे काम सांगत नाहीत. हे काम होत नसतीलतर त्यामध्ये पर्याय सांगीतला पाहिजे. आम्ही याठिकाणी प्रतिनिधी म्हणून निवडून आलेलो आहोत आम्ही याठिकाणी पर्याय म्हणून विचारतो परंतु जसा राजा तशी प्रजा, असे चालले आहे. आयुक्त साहेब कारवाई करतील म्हणून प्रत्येक अधिकारी, कर्मचारी तो कुठल्याही स्वरुपाचे काम करत असताना घाबरतो. आमच्या शहरात पहिलेच आयुक्त तुम्ही नाहीत. शर्मा साहेबानी सुध्दा फार चांगले काम केलेले आहे, महापालिकेला चांगल्या अवस्थेमध्ये आणुन ठेवलेले आहे. पहिल्या आयएएस केडरच्या अधिका-यांनी घेतलेले निर्णय तुम्ही बदलता परंतु त्यांनी घेतलेले निर्णय चुकिचे आहेत हे तुम्ही सिध्द करुन दाखवा. मागच्या अधिका-यांनी सुध्दा चांगले काम केलेले आहे. बंड साहेब असतील, शर्मा साहेब असतील यांनी चांगले काम केलेले आहे. काम करतो तो चुकतो. आपल्याकडून होणारे काम चांगल्या पध्दतीने व्हावे, आमच्या अधिका-यांना फ्रि माईंडमध्ये काम करता यावे. आमच्या कुठल्याही नागरीकांनी सांगीतलेले काम कायद्याच्या चौकटित कशी बसतील यासाठी पर्याय सांगण्याची डेअरींग त्यांच्यामध्ये झाली पाहिजे. समोरच्याचे काम सांगितले तर ते सांगतात माझ्या कडून हे काम होणार नाही, आयुक्तांकडून करुन आणावे. आम्ही प्रत्येक काम तुमच्या समोर आणु शकत नाहीत. हे होत असताना आपल्या महापालिकेचा चांगला कारभार असावा. मी दहा वर्षापासून सदस्य आहे. कॉंग्रेस, राष्ट्रवादी पक्ष मिळून त्यावेळेला सुध्दा चांगल्या पध्दतीने विकास झाला. २००७ ला आमची सत्ता असलीतरी इतर पक्षाचा दुजाभाव न करता सर्वांचे काम झाले पाहिजे, सर्वाना समान वागणुक मिळाली पाहिजे अशी आमच्या पक्षाच्या पदाधिका-यांची काम करण्याची पध्दत होती व आज सुध्दा तीच आहे. प्रशासकीय कामामुळे आमच्यामध्ये वाद होत असलेतरी आम्ही तो सहन करणार नाही. कायद्याच्या चौकटीमध्ये आपल्याला काम करावे लागेल. ज्या गोष्टी उदया, परवा बघण्यासाठी नको होत्या त्या बघाव्या लागणार आहेत. सर्वानी यावर उपाय काढून आपल्याला कायद्याने करणे बंधनकारक आहे. परंतु चौकटीमध्ये होणारे काम सुध्दा यंत्रणेकडून होणे अपेक्षीत आहे. यंत्रणेकडून आपल्याला सहकार्य पाहिजे एवढीच अपेक्षा करतो. कैलास कदम यांनी विषय मांडलेला आहे

त्यामुळे त्यांना सुध्दा धन्यवाद देतो. या सुरक्षेच्या बाबतीत सुध्दा संभ्रमाचे वातावरण आहे, तो सुध्दा विषय आहे. सुरक्षेच्या बाबतीत आम्ही दिलेले उपाय किंवा तुम्हांला चांगले वाटतील असे सुरक्षेचे नियंत्रण करावे. आमचे नागरीक नको त्या गोष्टीला घाबरणार नाहीत असे करावे आणि तसे तुम्ही करणार अशी अपेक्षा व्यक्त करतो. पुणे शहरात झालेल्या घटनेचा मी जाहिर निषेध करतो आणि ही सभा दि. १७.८.२०१२ दुपारी ३.०० पर्यंत तहकूब करावी अशी सूचना मांडतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो. पुण्यात बॉम्बस्फोट झालेला आहे. आपली सुरक्षा वाढविली पाहिजे. जीबी १५ दिवसात एकदा होते. सोमवार पासून अतिक्रमणाची कारवाई करणार आहेत. शासनाचे प्रतिनिधी म्हणून आयुक्त आहेत. त्यांना अधिकार आहेत, कोर्टाचे व शासनाच्या ऑर्डर आहेत, पावसाळा सुरु आहे आणि पावसाळयामध्ये आपण अतिक्रमणाची कारवाई करत नाहीत. माझी विनंती आहे की आयुक्तांचे बरोबर आहे तरी त्यांनी पावसाळयानंतर ही कारवाई करावी एवढीच विनंती करतो.

मा.श्रींरग बारणे :- मा.महापौर साहेब, पुणे येथे झालेल्या साखळी बॉम्बस्फोटा संदर्भात या सभागृहात चर्चा होत असताना प्रामुख्याने त्या घटनेचा मी या सभागृहाच्या वतीने निषेध करतो. या सभागृहात या अगोदर सुध्दा अशाप्रकारची चर्चा झालेली आहे. जर्मन बेकरीमध्ये ज्यावेळेला बॉम्बस्फोट झाला त्यावेळेला सुध्दा याठिकाणी चर्चा झाली त्यानंतर या सभागृहाने काही सूचना केलेल्या होत्या परंतु त्याचे पालन प्रशासनाने केलेले नाही. आयुक्त साहेब आपण आल्यानंतर आपल्याला धमकीचे पत्र आले, काही प्रमाणात काही बंद पडलेले सीसीटिव्ही कॅमेरे प्रामुख्याने चालू झाले परंतु मध्यंतरीच्या कालावधीमध्ये या महापालिकेच्या इमारतीमध्ये बसविलेले सीसीटिव्ही कॅमेरे बंद होते. अनेक नगरसेवकांनी प्रशासनाच्या निदर्शनास ते आणून दिलेले होते. या शहराचा कारभार करत असताना आपली सुध्दा काही जबाबदारी आहे ती जबाबदारी पार पाडत असताना प्रामुख्याने पोलीस खात्याला आपण काही सूचना कराव्यात जेणेकरुन यामध्ये सर्वसामान्य माणूस भरडला गेला नाही पाहिजे हे पाहिले पाहिजे. आपण पोलीस खात्याला महापालिकेच्या वतीने या अगोदर सुध्दा ब-याचशा प्रमाणात मदत केली, कर्तव्य म्हणून मदत केलेली असेल. वाहतूक शाखेला ५० टूव्हिलर गाडया दिलेल्या होत्या. पोलीस दलातील कर्मचारी अतिक्रमण पाडण्याचा भार उचलण्यासाठी घेतले. त्यासाठी महापालिका ५०-५५ लाख दर महिन्याला पगार देत होती. मध्यंतरी त्यातील निम्मा स्टाफ प्राधिकरणाला दिला. कोणतीही अतिरेकी कारवाई करणा-यांना जातभेद नसते. परंतु ही घटना घडत असताना सर्वसामान्य माणसाचा बळी जातो तो जाऊ नये म्हणून या सभागृहाने लक्ष वेधलेले आहे. भविष्यामध्ये पोलीस खात्यास महापालिकेच्या माध्यमातून तशाप्रकारच्या सूचना कराव्यात. गर्दिच्या भागामध्ये जास्तीत जास्त काळजी घेण्याच्या बाबतीत महापालिकेच्या वतीने सांगावे. प्रशांत शितोळे यांनी मुद्दे मांडलेले आहेत. आयुक्त साहेब आपण आल्यानंतर या शहराचे वातावरण अतीशय भीतीचे झालेले आहे. बॉम्बस्फोटा मध्ये कोणी मरतील किंवा नाही मरतील परंतु यापेक्षाही उदया अतिक्रमणाचा हातोडा पडल्यानंतर कोणाचातरी बळी जाईल, कोणीतरी दगावला जाईल हे मात्र खरे आहे. ही बाब सत्तारुढ पक्षामध्ये असलेल्यांनीही सांगीतली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील तीन्ही आमदार उपोषणाला बसलेले होते त्यांना पाठिंबा म्हणून मागची सभा तहकूब झालेली होती त्यातुन काही मार्ग निघालेला नाही. कदाचित आपल्या पक्षाच्यामध्ये त्यांचे काही चालले नसेल परंतु ही अतिक्रमणाची कारवाई होत असताना आपण लक्षात घेतले पाहिजे. आपण फक्त घोषणा करतो,

वर्तमानपत्रामधून ऐकलेले, प्रत्यक्ष काहीच झालेले नाही. आयुक्त साहेब जे बांधकाम आहे ते पाडणार आहेत चालू बांधकाम थांबविण्यासाठी आपण काहीही केलेले नाही, कुठलेही पाऊल उचललेली नाहीत. ती बांधकाम चालू आहेत, सर्वसामान्य माणसाचे नुकसान होणार आहे व ते तुम्ही करणार त्यामुळे राष्ट्रीय संपतीची आपण काळजी घेतली पाहिजे. आपण जिल्हाधिकारी म्हणून नांदेडमध्ये कारभार केलेला असेल परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये आपण प्रथमच कारभार करतो. मी सुध्दा याठिकाणी प्रशांत शितोळे यांनी सांगीतलेले दहा आयुक्त पाहिलेले आहेत. सुर्वे साहेब असतील, डिग्गीकर साहेब असतील, गुप्ता साहेब असतील, ठाकुर साहेब असतील, बंड साहेब असतील, शर्मा साहेब असतील या कारकिर्दीतील तुम्ही दहावे आयुक्त आहेत. तुमच्या पेक्षा सुध्दा जास्त आयुक्त आम्ही पाहिलेले आहेत. शेवटी महापालिकेमध्ये काम करत असताना नागरीकांचा सुध्दा विचार केला पाहिजे. कायदेकानुन हे लोकांसाठी होतात. प्रामुख्याने महापौर साहेब आपल्याला सुध्दा सांगीतले, आपल्या पक्षाच्या नेत्यानी ही भूमिका घेतलेली आहे त्यादृष्टिकोनातून १३ मार्च १२ ला कायदा सुध्दा पारीत केलेला आहे त्या चौकटीमध्ये राहून आयुक्त साहेब काम करतात. या शहरात राहणारे माणस श्रीमंत नाहीत, मोठे नाहीत, या शहरात राहणारे माणस सर्वसामान्य गरीब कामगार आहेत. उल्हासनगरला सुध्दा अनधिकृत बांधकाम झाल्यानंतर ते पाडण्याची मोहिम सुरु झाली त्यावेळेस राज्यशासनाने निर्णय घेवून ते बांधकाम थांबविलेले आहेत. आयुक्त साहेबांनी याठिकाणी सांगीतले सोमवार पासून बांधकाम पाडणार त्यामुळे लोक झोपत नाहीत. आयुक्त साहेब आपण आपले कर्तव्य बजावतात. कायद्याच्या चौकटित राहून सर्वसामान्याना न्याय देण्याचे काम सुध्दा आपण करावे अशी विनंती करतो. पुणे शहरात झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाचा मी जाहीर निषेध करुन माझे मनोगत थांबवितो.

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, पुण्यामध्ये जे सिरीअली बॉम्बस्फोट झाले त्यामध्ये सुदैवाने जिवीत हानी झालेली नाही परंतु अतिरेक्याचे संकट निर्माण झालेले आहे त्याप्रमाणे आपणही व्यवस्थापन व्यवस्थीत करण्याची आवश्यकता आहे. मंत्रालयात लागलेली भीषण आग त्यामुळे संपुर्ण जगामध्ये व्यवस्थापनेच्या बाबतीत आपली नाचक्की झालेली आहे. या दहशतवादी कारवाई संदर्भात आपल्या काही उपाययोजना आहेत का. आपतकालीन व्यवस्थापन कायदा विधीमंडळात पारीत झाला, त्याची अंमलबजावणी आपण करतो का. ते करणे आवश्यक आहे. मंत्रालयामध्ये घटना घडली त्याप्रमाणे याठिकाणी घटना घडलीतर आपली उपाययोजना काय आहे. सुरक्षा व्यवस्थीत आहे का. संसदेवर हाल्ला झाला. या सभागृहात व्यवस्थापनाने त्यासंदर्भात काय पाऊल उचलली आहेत. आपतकालीन व्यवस्थापन कायदयामध्ये फायर ऑडीट असेल, सुरक्षा व्यवस्थापन असेल याबाबतीत सभागृहाला सांगीतलेतर बरे होईल असे वाटते.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, याठिकाणी निषेध केलेला आहे त्याला माझे अनुमोदन आहे. परंतु याठिकाणी आजच्या सकाळ पेपरमध्ये आपल्या शहराचे तीन्ही आमदार मा.लक्ष्मण जगताप, मा. विलास लांडे, मा.आण्णा बनसोडे यांनी जी आयुक्तांकडे मागणी केलेली आहे ती आजच्या सकाळमध्ये दिलेली आहे ती आपण सगळयांनी वाचलेली असेल ती पुन्हा एकदा सर्व सभागृहाच्या निदर्शनास आणून देते. पिंपरी चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १४३ नुसार दंड आकारुन नियमित करण्याबाबतची माहिती महापालिका प्रशासनाने सर्वसामान्य नागरिकांना द्यावी अशी मागणी केलेली आहे. संपुर्ण राज्यातील

अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नाबाबत विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात चर्चा झाली. त्यानंतर अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे धोरण निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी एक समिती स्थापन केली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन अधिनियम १९६६ च्या कलम १४३ नुसार अनधिकृत किंवा विनापरवाना केलेले बांधकाम तडजोड शुल्क आकारुन नियमित करण्याची तरतूद आहे. त्युनसार नगरविकास विभागाने १० नोव्हेंबर १९९७ रोजी पुणे जिल्हयातील ग्रामीण भागातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे आदेश दिले आहेत. तत्पूर्वी म्हणजे १९ मे १९९७ रोजी महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे नगररचना व नियोजन अधिनियमानुसार दंड आकारुन नियमित करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला आहे. या ठरावांची माहिती केवळ बांधकाम व्यावसायिकांना आहे. सर्वसामान्य नागरिक या ठरावापासून अनभिज्ञ आहेत. त्याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना दिल्यास अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचे प्रस्ताव महापालिकेकडे मोठया प्रमाणात दाखल होतील. याशिवाय प्राधिकरणातील पेठ क्रमांक २१ मधील गृहयोजना क्रमांक ६, १० व ११ मध्ये झालेली अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शिफारशी राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. ही बांधकामे नियमित करण्यासाठी राज्य सरकारने ३१ ऑगस्ट २००९ रोजी प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करण्याचे आदेश दिले आहेत. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशीमध्ये १.५ चटई क्षेत्र निर्देशांकापर्यंतची बांधकामे दंड आकारुन नियमित करणे व सामासिक अंतरात ५० टक्क्यापर्यंत बांधकाम अनुज्ञेय करण्याचा समावेश आहे. महापालिकेच्या प्रचलित धोरणानुसार सामासिक अंतरामध्ये १५ ते २० टक्के सूट देण्यात येते. मात्र ही सूट ५० टक्क्यांपर्यंत दिल्यास शहरातील अनेक अनधिकृत बांधकामे दंड आकारुन नियमित करता येतील त्यामुळे महापालिकेचा आर्थिक फायदाही होईल. असे असेलतर हे सुध्दा आयुक्तांच्या वाचण्यात आलेले असेल. तीन्ही आमदारांनी ही माहिती दिलेली आहे, त्यांनी सांगीतले, ही माहिती नागरिकांना द्यावी. सर्वसामान्य नागरीकांना याची माहिती नसते याचा आपण विचार करावा. आपल्याला कोर्टाचे आदेश आहेत, परंतु आपण पिंपरी चिंचवड शहराचेही आयुक्त आहात. त्यामुळे या दोन्हीचाही मेळ कसा घालावा हे आपण बघावे आणि या नियमाच्या आधारे शहरातील बांधकाम नियमित करावीत व ही सभा तहकूब करावी.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी पुणे येथे जो बॉम्बस्फोट झालेला आहे त्याचा निषेध करण्यासाठी व मृत व्यक्तिंना श्रध्दांजली अर्पण करुन सभा तहकूब करण्याचे ठरलेले आहे. एक वर्षापुर्वी जर्मन बेकरी येथे झालेला बॉम्बस्फोट त्यावेळेला भरपुर सूचना सदस्यानी दिलेल्या होत्या. ताकाला जायच आणि गाडग लपवायच, याप्रमाणे न बोलता वर्तमानपत्रातील बातमी पठाणताईनी वाचली. अशा बातम्या यापुर्वी सुध्दा ऐकल्या. राजकारण करण्यासाठी निश्चित आपल्याला व्यासपीठ मिळते. या सभागृहात कुठल्याही बाबतीत राजकारण होऊ नये. बॉम्बस्फोटाची मालीका चालू असताना पिंपरी चिंचवड शहराची अवस्था अशा अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत जी झालेली आहे ती थांबविणे आवश्यक आहे. अनधिकृत बांधकामाच्या विरोधात आम्ही सर्वजण आहोत परंतु हे बोलत असताना आपण सांगीतले ३१ मार्च १२ नंतरच्या बांधकामावर कारवाई होईल. सर्व सभागृह, आमदार, खासदारापासून आपल्याला विनंवन्या करतात. एक-दोन गुंठयाचे बांधकाम पुर्णत्वास येत आहे. ज्यांनी आपले जुने घर पाडून घर बांधलेले आहे त्यांना तरी आपण हात लावू नये असे वाटते. याठिकाणी एखादा जरी मनुष्य दगावलातरी या सभागृहातील १२८

नगरसेवकांना जास्त हळहळ वाटेल. आपणास सुध्दा कोणावरही कारवाई करावी असे वाटत नाही परंतु कायद्याप्रमाणे कारवाई करतो. कायदा जेवढा आहे तेवढयाच पळवाटा सुध्दा आहेत. आपण आणि शासनाने मनामध्ये आणलेतर येथून मागच्या लोकांना माफी देवून यापुढे आमचे सभागृह सुध्दा आपल्या बरोबर राहिल. आपल्याला सुध्दा एक पत्र आलेले आहे. कुठल्याही आयुक्तांना असे पत्र आलेले नसेल, आपल्याला सुरक्षा पुरविलेली आहे तशी तुम्ही नागरीकांना सुरक्षा द्यावी, परंतु सिटी इंजिनिअर, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर यांचे काय. सिटि इंजिनिअरला तर असे वाटू लागले की, कुठून मी सिटि इंजिनिअर झालो. त्यांना कुठलीही सुरक्षा मिळणार नाही, आपणच आपली सुरक्षा करायची. यातून आपण मध्यमार्ग काढावा. आरक्षणावरील बांधकामाला मोठी यंत्रणा लागणार आहे. रेसीडेन्शीअलवरील बांधकामाचा पुर्नरविचार करावा अशी विनंती करते, धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे :- मा.महापौर साहेब, पुण्यामध्ये जो बॉम्बस्फोट झालेला आहे त्याचा निषेध करण्यासाठी सभा तहकूबी मांडलेली आहे. सुरक्षाच्या संदर्भात काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत अशाप्रकारच्या सूचना सर्वानी केलेल्या आहेत. जर्मन बेकरी बॉम्बस्फोट झाला त्यावेळेला अशा सूचना मांडलेल्या आहेत. पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड शहर वेगळे राहिलेले नाही ते एकच झालेले आहे. त्यामुळे तेथे अशी घटना होते तशी घटना भविष्य काळात आपल्या शहरात होऊ शकते याबाबतीत काय उपाययोजना केल्या पाहिजेत. पोलीसांशी बोलून काय उपाययोजना केल्या पाहिजेत त्याबाबत लक्ष घालावे. आपल्या महापालिकेवर दोन संकट आहेत. एक म्हणजे कालच्या बॉम्बस्फोटाचे आणि दुसरे संकट सोमवार पासून अतिक्रमणावर कारवाई होणार आहे. सुलभाताईनी सांगीतले आहे आम्ही सर्व पक्ष एकत्रीत येवून याला तोंड देतो. अशा कामाला आम्ही कधीच भेदभाव केलेला नाही. विरोधी पक्षाच्या आणि सत्तारुढ पक्षाच्या नगरसेवकांना समान न्याय मिळतो त्यामुळे यात मार्ग काढण्यासाठी एकत्रीत येवून काम करणे आवश्यक आहे. तीन्ही आमदारांनी अशीच भूमिका घेतलेली आहे. आयुक्तं साहेबांनी अशी भूमिका का घेतली कारण हायकोर्टाची ऑर्डर आहे त्यामुळे प्रशासनाला अशा प्रकारची कारवाई करावी लागते. अशा परिस्थितीत प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्रित येवून यामध्ये मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नागरीकांच्या दृष्टिकोनातून कसे चांगले निर्णय होतील असा निर्णय झाला पाहिजे अशी आमची आपेक्षा आहे. ३१ मार्च १२ पर्यंतच्या ५०० घराचे पंचनामे केलेले आहेत. त्याच्यावर कारवाई करणार आहेत. हे ५०० घर नसुन किमान ५ हजार असतील व एवढया मोठया प्रमाणात कारवाई करायची म्हणलेतर किती लोकांना त्रास होईल आणि किती कुटूंबे उध्दवस्त होतील. सुप्रिम कोर्टाच्या वकिलांशी, हायकोर्टाच्या वकिलांशी तीन्ही आमदारांनी चर्चा केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या महापालिकेनी सुध्दा पुणे कोर्टात काहीतरी विषय मांडायचा म्हणून अप्लीकेशन दिलेले आहे. माझी विनंती राहणार आहे की या गोष्टीचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन हिंसक वळण वगैरे या गोष्टीला लागू शकते. पवना पाईपलाईनच्या बाबतीत जसे घडले तसे घडू नये. नागरीकांच्या दृष्टिकोनातून हिताचा निर्णय कसा होईल ते पाहिले पाहिजे. कोर्टाच्या दिशेने आम्हांला सुध्दा फॉलो करावा लागेल. नागरीकांच्या वतीने आम्हांला सुध्दा कोर्टात जावे लागेल आणि कारवाई थांबविण्याच्या दृष्टिने आमचे तीन्ही आमदारांच्या माध्यमातून प्रयत्न राहणार आहेत. बिल्डींग परमिशन मध्ये ज्या त्रुटि आहेत त्या दुर करणे आवश्यक आहेत. आज सुध्दा असे बांधकाम आहेत की दिघीमध्ये दोन एकरमध्ये एखादयाने बंगला बांधला असेलतर व नंतर तो प्लॅनसाठी आला असेलतर त्याला दोन ते तीन एकरच्या मोजणीसाठीचे पैसे भरावे लागतील असे सांगीतले जाते. महापालिका स्तरावर, शासन स्तरावर यात काय बदल करता

येतील त्याबाबतीत प्रयत्न केले पाहिजेत. एन.अे. च्या बाबतीत सांगायचे झालेतर रेसिडेन्शिअल झ ोनमध्ये प्लॅन पास केलातर एन.अे.साठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सहा-सहा महिने फाईल पडून राहते त्यामुळे लोकांना अनधिकृत काम नाईलाजास्तव करावे लागतात. कायदा सुध्दा तसा सुटसूटित पाहिजे. महापालिकेच्या इतिहासामध्ये किती बांधकाम अधिकृत झाले. माझ्या माहितीप्रमाणे ८० टक्के बांधकाम व्यावसायीक आहेत त्यांचे झालेले आहेत परंतु २० टक्के लोकांनी स्वतः राहण्यासाठी त्यांनी प्लॅन पास केलेले आहेत. छोटे प्लॉटधारक हे प्लॅन पास करु शकत नाहीत कारण कायदा किचकट आहे. आपल्या बिल्डींग परमिशनला किती उत्पन्न मिळते त्याच्यामध्ये डेव्हलपमेंट चार्जचे किती उत्पन्न मिळते व दंड म्हणून किती उत्पन्न मिळते. दंडात्मक कारवाई करुन लोकांना पैसे भरावे लागतात त्यामुळे दंडाचे उत्पन्न आपल्याला जास्त मिळते. एक-दोन गुंठयावाले प्लॉटधारक असतात त्यांना गावठाणाप्रमाणे नियम करावेत. शहर सुधारणा समितीमध्ये तसा ठराव मंजूर केलेला आहे. छोटे प्लॉटधारकांना गावठाणाप्रमाणे नियम लावलातर खुप मोठया प्रमाणात लोक अधिकृत घरे बांधतील व त्यादृष्टिने प्रयत्न करावा. आता नवीन नगरसेवकांना असे वाटत असेल की आपण पाच-सहा महिने झाले निवडून येवून, निवडून आल्यापासून आपण कुंठलेही काम करु शकलेलो नाहीत. नवीन कोणतेही काम चालू झालेले नाही. अतिक्रमण कारवाईबरोबर बाकीचे सुध्दा काम करण्यासारखे आहेत. सगळे अधिकारी यामध्येच गुंतलेले आहेत. वॉर्डातील कामाकडे लक्ष देण्यासाठी अधिका-यांना वेळ मिळावा. या कामातुन त्यांना सवड द्यावी. अधिका-यांना असे वाटू लागले की एवढया वर्षाच्या सर्व्हिसमध्ये चांगले काम केलेले आहे व आता वाईट कामाला सामोरे जावे लागते त्यामुळे राजीनामा दिलेला बरा अशी त्यांची मानसीकता झालेली आहे. तरी आपण चांगले निर्णय घ्यावेत जेणेकरुन या शहरातील नागरीकांना दिलासा मिळेल. अन्न,वस्त्र,निवारा या मुलभूत गरजा आहेत. ३० ते ३५ हजार घरे देण्याचा महापालिकेचा प्रयत्न झालेला आहे आणि दुस-या बाजूला अशी कारवाई होणार हे योग्य वाटत नाही. आयुक्त साहेब आपल्याला कळकळीची विनंती आहे की आपण याचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन यातून मार्ग काढावा अशी विनंती आहे.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माणसाना असे वाटु लागले आहे की आता पाऊस पडायला लागला, श्रावण महिना आला, हा महिना सणासुदीचा असतो. या महिन्यात या शहरात असे वातावरण निर्माण झालेले आहे की पुण्यातील बॉम्बस्फोट आणि अतिक्रमणाची भिती झालेली आहे. या वातावरणामध्ये अशी परिस्थिती झालेली आहे. आम्ही सत्तेमध्ये असलोतरी आम्ही सुध्दा माणस आहोत, आम्हांला सुध्दा सामोरे जावे लागते. पिंपरी चिंचवड शहरात आज इतर आजाराच्या साथी आहेत याचा आपण आढावा घेतला आहे का. किती लोकांचा मृत्यू झालेला आहे. डेंग्यू, मलेरिया, स्वाईनफ्ल्यू असेल कशामुळे लोकांचा मृत्यु झाला याचा विचार केला आहे का. यासाठीची यंत्रणा पिंपरी चिंचवड शहरात राबवितो का. डॉ.जगदाळे यांनी चार्ज घेतल्यानंतर मी ज्या ज्या वेळेला फोन लावला त्या त्या वेळेला हाळूच आवाजामध्ये सांगीतले, आम्ही आयुक्त साहेबांकडे मिटिंगला बसलेलो आहोत. अशा परिस्थितीमध्ये साथीच्या रोगाला सामोरे जाताना कोणी दगावलेतर त्यांना नुकसानभरपाई देता येईल का याचा विचार करावा लागेल. आम्ही सांगीतले आहे आरक्षणावरचे, नदीपात्रातील बांधकाम, बिल्डर्सचे बांधकाम असेल अशा अनधिकृत बांधकामाचा आपण नक्कीच विचार करा. ते करत असताना पुण्यामध्ये बॉम्बस्फोट झाला, चुकून पिंपरी चिंचवडमध्ये बॉम्बस्फोट झाला असतातर आपली काय अवस्था झाली असती. जर्मन बेकरीमध्ये

बॉम्बस्फोट झाला त्यावेळेस या सभागृहात सर्वजण बोलले. नुसते कॅमेरे बसवून चालतील का. याच्यासाठी तरतूद करायची असेलतर त्याचे अधिकार आम्ही तुम्हांला देतो. वायसीएम, प्रभाग, महापालिकेच्या इमारती याठिकाणा शिवाय शहरातील प्रमुख रस्ते याठिकाणी अशा घटना घडू शकतात. डेक्कन याठिकाणी साखळी पध्दतीने बॉम्बस्फोट झालेला आहे त्याठिकाणी मोठयाप्रमाणात दुर्घटना घडली असतीतर आज कुठल्या गोष्टीला सामोरे जावे लागले असते याचा विचार न करणे बरे. शेजारी घटना घडली उदया माझ्याकडेही घडू शकते. यासाठी पोलीस यंत्रणेवर विसंबुन न राहता आपल्याकडेही ही यंत्रणा पाहिजे. यासाठी आपण सुचना द्याव्यात. यासाठीच्या निवीदा काढायच्या असतीलतर त्या काढाव्यात व कमीत कमी दिवसात सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टिने काय करता येईल हे बघितले पाहिजे व यासाठीचा विचार करावा अशी मी विनंती करते. पावसाळयाचे दिवस आहेत आपत्कालीन कमिटी आहे त्यांची मिटिंग होणे आवश्यक आहे. हॉस्पिटलमध्ये औषध आहेत का, वॉर्ड उपलब्ध आहेत का याचा आढावा घ्यावा व त्यावर प्रॅक्टीकली काम केले पाहिजे. बॉम्बस्फोटापेक्षाही मोठया भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. सगळया पक्षानी विनंती केलेली आहे. नदीपात्रातील बांधकामे जरुर काढा, चालू बांधकामाचे अधिकारी फोटो काढतात. आम्हांला विरोध करायचा नाही. शहरात दोन-तीन गुंठे जागेवर पाच ते सहा मजली बिल्डींग केलेली आहे असे बांधकाम अधिका-यांनी थांबविलेले आहे, त्याचे रेकॉर्ड आहे का. आज शहरात असे बांधकाम चालले असेलतर तशी अधिका-याची एक टिम करावी व ते थांबवावे त्यादृष्टिने लोकांना समजेल व अनधिकृत बांधकाम थांबतील. बिल्डरनी आरक्षणावर केलेले बांधकाम थांबवावे, नदीपात्रातील बिल्डरने बांधलेले अनधिकृत बांधकाम थांबवावे त्यांच्यावर जरुर करवाई करावी. सभागृहात सुध्दा सगळयांच्या चेह-यावर एकच आहे ही सभा घेवून काय करणार. सर्वांचा अक्रोश आहे. नगरसेवक निवडून येवून सहा महिने झाले, नगरसेवकांच्या वॉर्डात कुठेही काम झालेली नाहीत. ते म्हणतात आमचा यात काय दोष आहे. या नवीन नगरसेवकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. मी महापौरांना विनंती करते की काल झालेल्या बॉम्बस्फोटाचा निषेध करुन ही सभा शुक्रवार दि. १७/८/२०१२ रोजी दु.३.०० पर्यंत तहकूब करावी.

मा.महापौरः- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दि. १७.०८.२०१२ रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -६
सभावृत्तांत
(दि.२०.७.२०१२ (दु. २.०० व २.३०), दि. ३.८.२०१२ ची तहकुब सभा)

दिनांक :- १७.८.२०१२ वेळ:-दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. ३.८.२०१२ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.१७.८.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.जगदीश शेट्टी
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी
२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२२. मा.पवार संगीता शाम
२३. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२८. मा.भारती फरांदे
२९. मा.आर.एस.कुमार
३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३२. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३३. मा.नेटके सुमन राजेंद्र
३४. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३६. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३९. मा.लोंढे गणेश नारायण
४०. मा.शमीम पठाण
४१. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४३. मा.अपर्णा निलेश डोके
४४. मा.अनंत सुभाष को-हाळे
४५. मा.शितल ऊर्फ विजय गोरख शिंदे
४६. मा.जयश्री वसंत गावडे
४७. मा.पवार मनीषा काळूराम
४८. मा.प्रसाद शेट्टी
४९. मा.अविनाश (दादा) टेकावडे
५०. मा.काळभोर वैशाली जालिंदर
५१. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
५२. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५३. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५४. मा.वाबळे संजय मल्हारराव
५५. मा.मडिगेरी वर्षा विलास
५६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५८. मा.सुपे आशा रविंद्र
५९. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
६०. मा.गोफणे अनुराधा देविदास
६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६३. मा.महेशदादा किसन लांडगे

६४. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६५. मा.लोंढे शुभांगी संतोष
६६. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६७. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६८. मा.सावळे सिमा रविंद्र
६९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७०. मा.भोसले राहूल हनुमंतराव
७१. मा.पालांडे सुजाता सुनिल
७२. मा.बहल योगेश मंगलसेन
७३. मा.कदम सदगुरु महादेव
७४. मा.गिता सुशील मंचरकर
७५. मा.कैलास महादेव कदम
७६. मा.छाया जगन्नाथ साबळे
७७. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८०. मा.काळे विमल रमेश
८१. मा.पाडाळे निता विलास
८२. मा.विनोद जयवंत नढे
८३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८५. मा.विमलताई सुरेश जगताप
८६. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८७. मा.बारणे निलेश हिरामण
८८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८९. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९०. मा.बारणे माया संतोष
९१. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९३. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९४. मा.कलाटे स्वाती मयुर
९५. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९६. मा.चौंधे आरती सुरेश
९७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९९. मा.जवळकर वैशाली राहुल
१००. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०१. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०२. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०५. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०६. मा.काटे रोहित अप्पा सुदाम
१०७. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०९. मा.शेंडगे आशा सुखदेव
११०. मा.मोटे किरण बाळासाहेब
१११. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११२. मा.संजय केशवराव काटे
११३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११४. मा.पाटील सुजित वसंत
११५. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
११६. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त, मा.कदम-अति.आयुक्त, मा.सावंत-सह. आयुक्त, मा.मुंढे, मा.पवार, मा.कुलकर्णी, मा.दुरगूडे-सहा.आयुक्त, मा.चाकणकर -प्र.नगरसचिव,मा.चव्हाण-सह शहर अभियंता,मा.भोसले- मुख्यलेखापाल, मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.पाटील, मा.चव्हाण-कार्य.अभियंता, मा.देशमुख-कायदा सल्लागार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :-मा.महापौर साहेब, सहकारमहर्षि-बाबालाल काकडे, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी- प्रभाकर कुंटे, ज्येष्ठ छायालेखक- अशोक मेहता यांचे दुःखद निधन झाल्याने श्रध्दांजली वाहून आजची सभा तहकूब करणेत यावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, या सभेत बाबालाल काकडे, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी- प्रभाकर कुंटे व अशोक मेहता याना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सहकार, राजकीय क्षेत्रातील आणि चित्रपट श्रेष्ठीतील अशा नामवंत व्यक्तिना या सभेत श्रध्दांजली अर्पण करत असताना या राज्यामध्ये, देशामध्ये विलासराव देशमुख यांच्या जाण्याने दुःख झालेले आहे. या महाराष्ट्राला लोकनेत्यांची वेगळी परंपरा आहे. या कर्तृत्ववान व्यक्ति महाराष्ट्राच्या सर्वांगीन विकासासाठीच्या आठवणी ठेवून गेलेल्या आहेत. यशवंतराव चव्हाण असतील, वसंतदादा पाटिल असतील, शरद पवार आहेत. ख-या अर्थाने या लोक नेत्यांनी त्यांच्या कर्तृत्वाचा जो आलेख करत असताना तो कोणी उंचावला असेलतर या तीन्ही नेत्यानी व त्यांचा संगम असलेले नेते म्हणजे विलासराव देशमुख. विलासराव देशमुख हे उत्तम वक्ते, ठुमकदार शैली, दुरदृष्टी असलेले नेते. राजकारणात उंची प्राप्त करुन घ्यायची असेलतर गॉडफादर लागतो परंतु विलासरावांनी सांगीतलेले होते कर्तृत्वा मध्येच तुमची उंची असेलतर गॉडफादर निर्माण होतो. राजकारणामध्ये त्यांनी अनेक चढउतार पाहिले, कार्यकर्त्यांना ताकद देवून सहकार विषयी, शेती विषयीचे धोरण असेल, सामान्य कार्यकर्त्यांना राजकारणामध्ये ताकद देण्याचे काम असेल अशा अनेक घटना त्यांनी त्यांच्या कर्तृत्चाने निर्माण केलेल्या आहेत. आणि म्हणून या ठिकाणी विलासराव देशमुख यांच्या आठवणी पिंपरी चिंचवड शहरात असंख्य आहेत, येथील असंख्य कार्यकर्ते त्यांना ओळखत होते. यादगार असे अनेक निर्णय त्यांनी पुणे जिल्हा व पिंपरी चिंचवड शहरासाठी घेतलेले आहेत. चाकण परिसरामध्ये जनरल मोटर्स, फोक्स वॅगन, मर्सिडीज बेंझ आदी वाहन निर्मितीचे कारखाने या परिसरात आणण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या निधनाने राजकीय नुकसान होत असताना वैयक्तिक राजकीय नुकसान सुध्दा आमचे झालेले आहे परंतु आवाहन स्विकारण्याची प्रेरणा त्यांच्याच कर्तृत्वातून मिळालेली आहे. त्यांना श्रध्दांजली वाहताना, त्यांच्या आठवणीला उजाळा देत असताना पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षाच्या वतीने, पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.नारायण बहिरवाडे :-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांचे नुकतेच निधन झालेले आहे. सभागृहाने त्यांना श्रध्दांजली अर्पण कली आहे. विलासरावांच्या बाबतीत सांगायचे झालेतर १९९७ साली मी प्रथम महापालिकेत निवडून आलो त्या दरम्यान राज्याचे उदयोगमंत्री ते होते आणि माझा जो वॉर्ड होता तो वॉर्ड एमआयडीसीचा जी ब्लॉक म्हणजे निवासी झोन असा असल्याकारणाने अनेक क्लॅशेस त्याठिकाणी होत. त्या जागा महापालिकेला मिळाव्यात म्हणून महापालिकेनी एमआयडीसीला पत्रव्यवहार सुरु केला. मी नगरसेवक झाल्यानंतर स्व.रामकृष्ण मोरे यांना सांगीतले माझा परिसर एमआयडीसीचा आहे त्याठिकाणी अशा अशा ॲमेनिटीजचा प्रश्न आहे त्यावेळेस मोरे साहेबांनी सांगीतले आपण हे विलासरावांच्या कानावर घालू. त्यानंतर आम्ही विलासरावांकडे गेलो त्यावेळेस हा प्रश्न उपस्थित केला त्यांनी लगेच या जागा महापालिकेला द्याव्यात म्हणून एमआयडीसीला सुचना दिल्या. त्यानंतर त्या जागा मनपाच्या वतीने विकसीत करुन त्याठिकाणी उदयान विकसीत केले ते राजर्षी शाहू महाराज उदयान म्हणून विकसीत झालेले आहे. असे उत्तम उदयान त्याठिकाणी विकसीत झालेले आहे. त्यावेळेस मी स्व.रामकृष्ण मोरे साहबांना सांगीतले की ही जागा विलासराव देशमुख यांनी मिळवून दिलेली असल्याने व ते आता राज्याचे मुख्यमंत्री असल्याने त्यांच्या हास्ते या उदयानाचे उद्घाटन व्हावे त्यावेळेला तत्कालीन महापौर लक्ष्मण जगताप होते त्यांनी मुख्यमंत्री यांना पत्र दिले व विलासरावांनी येण्याचे कबुल केले व त्याठिकाणी त्यांच्या हस्ते त्या उदयानाचे उद्घाटन झाले तो अतीशय चांगला कार्यक्रम झाला. त्याठिकाणी त्यांनी अतीशय सुंदर भाषण केले व अतीशय मिश्कीलपणे त्यांनी उल्लेख केला. त्याठिकाणी असलेल्या भूलभूलैय्याचे त्यांनी खुप चांगला उल्लेख

केला होता.  कामाच्या बाबतीत त्यांच्याकडे जात असताना ते कायम म्हणत तुमच्या पिंपरी चिंचवड शहराचे काय चालले आहे, तुमचे भूलभूलैय्या उदयान कसे काय चालले आहे. या शहरातील गुंठेवारीचा प्रश्न होता एक, दोन गुंठे जागा घेवून लोकांनी घर बांधलेली होती. स्व.रामकृष्ण मोरे यांच्या समवेत त्यांच्याकडे जाऊन गुंठेवारीचा कायदा आणावा असे आम्ही त्यांना सांगीतले होते तो कायदा त्यांच्यामुळे आला. असा नेता आपल्यातुन निघुन गेलेला आहे त्यांना माझ्या बहिरवाडे कुटूंबाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द संपवितो.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब,  राज्याचे माजी मुख्यमंत्री  तसेच केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांना या सभागृहाने श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. त्यांच्या आठवणीना उजाळा देत असताना या शहरात गुंठेवारी पध्दत जी चालू झाली ती त्यांच्या कालावधीमध्येच. असे महत्वपुर्ण निर्णय घेत असताना त्यांनी स्थानीक कारखान्यात, उदयोगनगरीमध्ये स्थानिकांना ८० टक्के रोजगार उपलब्ध झाला पाहिजे असा महत्वपुर्ण निर्णय  मुख्यमंत्री असताना घेतलेला आहे. सामान्य कामगारांची, कष्टक-याची जाण असलेला अष्टपैलू नेता आपल्यातुन निघुन गेलेला आहे अशा नेत्यास विरोधीपक्ष नेता म्हणून, पिंपरी चिंचवड कामगारांच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, राज्याचे माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांना या सभागृहात श्रध्दांजली वाहीली.  खरेतर  त्यांच्या अनेक आठवणीना उजाळा द्यावा असे व्यक्तिमत्व, मुळामध्ये राजकारणामध्ये असून सुध्दा राजकारण कधी अंगाला लागू दिले नाही आणि सामाजीक बांधीलकी जोपासणारे उत्तम व्यक्ति आपल्यातून निघुन गेलेली आहे. या राज्याच्या निर्मिती नंतर ख-या अर्थाने कै.यशवंतराव चव्हाण, आदरणीय शरद पवार साहेब यांच्यानंतर ज्यांचे नाव घेतले जात ते कै.विलासराव देशमुख. माझ्या राजकीय आणि सामाजीक जीवनामध्ये अनेकवेळा त्यांचा सहवास लाभला. महापालिकेच्या सभागृहामध्ये स्थायी समितीचा अध्यक्ष होण्याचा मान मला मिळाला, त्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुर्ण हॅण्डल करण्याचे काम तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी केलेले होते.  थेरगाव परिसरामध्ये बोट क्लबसाठी पशुसंवर्धन विभागाची साडेपाच एकर जागा आठवडयात विलासराव देशमुख यांच्यामुळे मिळाली. तत्कालीन आयुक्त डिग्गीकर साहेब, मी , महापौर त्यांच्याकडे गेल्यानंतर त्याठिकाणी सर्वांचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर त्यांनी असा निर्णय लगेच घेतला. मला श्रीरंग बारणे यांना जागा द्यायची ती कशी द्यायची हे मला सांगावे असे त्यांनी अधिका-यांना सांगीतले व आठ दिवसात त्या जागेचे पत्र महापालिकेला आले. छत्रपती शिवाजी महाराजांचा  आश्वरुढ पुतळा उभारला ती जागा सुध्दा विलासराव देशमुख यांच्यामुळे मिळाली आहे. कार्यकर्त्यांना बळ देणारे, ख-या अर्थाने न्याय देणारे नेते या राज्यातुन हारवले आहेत. आताच्या नेत्यांना फोन केलातरी ते फोन उचलत नाहीत परंतु विलासराव देशमुख हे मोबाईलद्वारे फोन केलातरी ते तात्काळ उचलत होते. खरेतर राजकारणामध्ये असे माणंस शोधून सुध्दा कमी मिळतात. व्यक्ति म्हणून, कॉंग्रेस पक्षाचा नेता म्हणून काम केले असलेतरी राजकीय पातळीवर या राज्याचे नेते म्हणून विलासरावांच्या जाण्यानी फार मोठे नुकसान झालेले आहे. खरेतर आपण सर्वजण मंडळी कै.रामकृष्ण मोरे यांच्या तालमीमध्ये  तयार झालेले आहेत. उत्तम नेता, सर्वसामान्य कार्यकर्त्यांना पाठबळ देणारा नेता हरवल्याने या महाराष्ट्राचे नुकसान झालेले आहे. त्यांनी राजकारणामध्ये चाळीस

वर्षे घालविलेले आहेत, भविष्यामध्ये त्यांच्या जाण्यानी या राज्याचे फार मोठे नुकसान झालेले आहे. मी सभागृहाच्या वतीने त्यांना भावभूर्ण श्रध्दांजली वाहून माझे दु:खद शब्द संपवितो.

मा.अरुण बो-हाडे :- मा.महापौर साहेब, कै.विलासराव देशमुख, त्याचप्रमाणे स्वातंत्र्यसेनानी प्रभाकर कुंटे, सहकारमहर्षी बाबालाल काकडे. महाराष्ट्राच्या समाजकारणातील, राजकारणातील, सहकारातील सर्वांगीन स्पर्श करुन जाणारे हे व्यक्तिमत्व, यांच्या निधनामुळे समाजाची निर्माण झ ालेली पोकळी मोठी आहे. सभागृहाने त्यांना श्रध्दांजली वाहिली आहे. स्व.विलासराव देशमुख यांच्या विषयी या अगोदर ब-याचजणांनी सांगीतलेले आहे. महाराष्ट्रातील नेत्यांची परंपरा आहे. कर्तबगार नेत्यांमध्ये कै.वसंतदादा पाटिल असतील, कै.यशवंतराव चव्हाण असतील, आदरणीय पवार साहेब असतील या सर्वच नेत्यांमध्ये सर्वोच्च गुण साठलेले आहेत ते गुण विलासराव देशमुख यांच्यामध्ये साठलेले होते. माझ्या सारख्या कार्यकर्त्यांचा अनेकवेळा संबंध आलेला आहे. सर्वसामान्य माणसाचा प्रश्न घेवून जाताना त्यांनी उत्साहाने सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. बुध्दीची देणगी त्यांना लाभलेली आहे. तरुण वयापासून ईश्वरी देणगीचा वापर महाराष्ट्र राज्यासाठी त्यांनी केलेला आहे. कष्टकरी कामगारांच्या वतीने, महापालिकेच्या वतीने या नेत्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.वसंत लोंढे :- मा.महापौर साहेब, विलासराव देशमुख यांना श्रध्दांजली वाहत असताना मला अतीशय दु:ख होत आहे. गेली तीस ते पस्तीस वर्षे त्यांच्याशी माझा संबंध आलेला होता. प्रत्येक मंत्री मंडळामध्ये ते होते. शंकरराव चव्हाण, वसंत नाईक, वसंतदादा पाटिल, विलासराव देशमुख हे जास्त काळ मुख्यमंत्री पदावर राहणारे नेते होते. मग ते मराठवाडयामधील असलेतरी त्यांचे प्रेम पश्चिम महाराष्ट्रावर होते. पुण्यामध्ये फार मोठे कार्यकर्ते त्यांनी जोडलेले होते. उल्हास पवार, प्रकाश ढेरे, रामकृष्ण मोरे हे सतत त्यांच्याशी संपर्क असलेले नेते. ते राजकारणातच नव्हतेतर उत्तम माणस जोडणारे, क्रिडा क्षेत्राची आवड असलेले, फिल्मी सिटीवर प्रेम करणारे असे नेते, सर्वाना बरोबर घेवून जाणारे असे हे नेते आपल्यातुन निघून गेलेले आहेत. पंढरपूर पेक्षाही जास्त लोक त्यांच्या अंत्ययात्रेला जमलेले होते, हीच खरी त्यांची पावती आहे. त्यांचे लोक प्रत्येक ठिकाणी होते. असे कुशल नेतृत्व आपल्याला सोडून गेल्यामुळे साहजीकच आपल्याला दु:ख झालेले आहे. काँग्रेस पक्षाला नेता राहिलेला नाही. त्यांच्याशी आमचे प्रेमाचे नाते जोडलेले होते. त्यांनी कधीही भेदभाव केलेला नाही. विरोधी पक्षाच्या लोकांना सुध्दा हा नेता हवासा वाटत होता. स्टेजवर विलासराव देशमुख आल्यानंतर ते विरोधकाला सुध्दा कोपरखळया मारत होते व आपल्याशी करुन घेत होते असा नेता आपल्यातुन निघून गेलेला आहे. जन्माला आल्यानंतर त्याला जायचेच असते व आपल्याला सर्वानाच त्या मार्गाने जायचे आहे. जीवनामध्ये चांगल्या गोष्टी केल्या पाहिजेत. यांच्या जान्यामुळे देशाची हानी झालेली आहे ती भरुन येणे अवघड आहे. त्यांच्या कुटूंबाला दु:ख सहन करण्याची ताकद मिळो अशी प्रार्थना करतो आणि लोंढे कुटूंबाच्या वतीने आदरांजली वाहतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, विलासराव देशमुख, सहकारमहर्षि-बाबालाल काकडे, ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी- प्रभाकर कुंटे, ज्येष्ठ छायालेखक- अशोक मेहता या सगळयांना श्रध्दांजली वाहत असताना सगळयांना दु:ख झालेले आहे. विलासराव देशमुख सर्वपक्षीय होते, असे चित्र होते. त्यांचे वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व सर्वाना भावणारे होते अशा नेतृत्वाला सर्व राज्य मुकलेले आहे. ज्यावेळेला महापौर परिषद पिंपरी चिंचवड शहरात घेण्याचा योग आला त्यावेळेला विलासराव

देशमुख मुख्यमंत्री होते. उल्हासदादानां मी म्हणाले मुख्यमंत्री महापौर परिषदेला येतील का तर ते म्हणाले एक फोन करुन बघ. मुख्यमंत्री स्वतः फोन उचलायचे, फोन केल्यानंतर त्यांनी महापौर परिषदेला यायचे कबुल केले. सर्वसामान्य माणसाला सुध्दा त्यांच्याशी सरळ सरळ बोलायला यायचे असे हे व्यक्तिमत्व होते. कोणत्या पक्षाचा, कुठला असे न विचारता ते अडचणी सोडविणारे नेते होते. महापौर परिषदेमधील प्रशासनाचे, नगरसेवकांचे विषय असतील या सर्व विषयाना मा. पवार साहेबांच्या सूचनेनुसार सगळे प्रश्न मार्गी लावले अशा नेत्यांना आपण मुकलो आहोत. मी सर्वांच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहते आणि थांबते.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, सगळया सदस्यांनी देशमुख साहेबांच्या संदर्भात त्यांच्या अडचणीला उजाळा दिलेला आहे. मी महापौरांना व आयुक्त साहेबांना विनंती करील की, विलासराव देशमुख यांचा पुतळा किंवा तैलचित्र आपल्या सभागृहात लावावे अशी मी विनंती करतो.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, विलासराव देशमुख यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण याठिकाणी बोलतो आहोत. मघाशी भाऊसाहेब आणि आमचा विषय झाला. २०१२ मध्ये अनेक स्टार गेले, शम्मी कपुर, देवानंद, राजेश खन्ना त्याचप्रमाणे राजकारणामधील स्टार विलासराव देशमुख होऊन गेले. अतीशय चांगले व्यक्तिमत्व आपल्यातुन निघुन गेलेले आहे. परमेश्वर त्यांच्या कुटूंबाला दुःख सहन करण्याची ताकद देओ, मी नांदगुडे कुटूंबाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, आज या सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री कै.विलासराव देशमुख, माजी आरोग्य मंत्री दिग्विजय खानविलकर, प्रभाकर कुंटे, अशोक मेहता, बाबालाल काकडे या विवीध मान्यवराना श्रध्दांजली अर्पण करण्यात आलेली आहे. आता सांगीतल्याप्रमाणे ते कर्तबगार नेते होते. ते सरपंचापासून मुख्यमंत्र्यापर्यंत, केंद्रीय मंत्री अशी त्यांच्या जीवनाची वाटचाल अनेकांनी पाहिलेली आहे. सिनीअर नगरसेवकांना त्यांना जवळून भेटण्याचा योग आलेला आहे. असे नेते खुप कमी भेटतात. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटिल, आदरणीय शरद पवार साहेब असतील त्यांच्यानंतर स्मरणात राहणारे नेते देशमुख साहेब असतील. विलासराव देशमुख गेल्यानें एक मोठी पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही न भरुन येण्यासारखी आहे. मी राष्ट्रवादी पक्षाचा अध्यक्ष या नात्यने सर्वांच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये महत्वाची भुमिका बजाविणारे कै.विलासराव देशमुख आपल्यातून निघुन गेलेले आहेत. ते कार्यकर्त्यांना ताकद देणारे नेते होते. कै.रामकृष्ण मोरे यांच्या तालमीमध्ये आम्ही तयार झालेलो आहोत. मोरे साहेब आणि देशमुख साहेब मित्र होते त्यामुळे अनेकवेळा त्यांना भेटण्याचा योग आलेला आहे. ते शांत स्वभावाचे होते. १९७२ पासून बाभळगावचे सरपंचा पासून ते राजकारणामध्ये आले. १९८३ पासून ९४ पर्यंत कॅबीनेट मंत्री होते, त्यानंतर मुख्यमंत्री होते, २००९ साली केंद्रामध्ये गेले त्याठिकाणी हेवी इन्डस्ट्रीयल खाते

त्यांच्याकडे होते. त्यांनी चांगले काम केलेले असल्यामुळे महाराष्ट्रातील लोक त्यांना विसरु शकत नाहीत. ते राजकीय पुढारी होते, हॉलीबॉल, टेबलटेनीसमध्ये ते इन्ट्रेस्ट घेत होते, ते शास्त्रीय संगीत ऐकत होते. अशा नेत्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.अनंत को-हाळे :- मा.महापौर साहेब, उतूंग असे राजकीय व्यक्तिमत्व असलेले कै.विलासराव देशमुख, प्रभाकर कुंटे, दिग्विजय खानविलकर यांच्याबद्यल ज्येष्ठ नेत्यानी याठिकाणी बरेचसे अनुभव सांगीतलेले आहे. परंतु जे ऐकले आणि जे पाहिलेले आहे त्यावरुन एक-दोन गोष्टी जाणवतात. जेव्हा राणेसाहेब कॉंग्रेस पक्षात गेले आणि मुख्यमंत्री पदासाठी त्यांचे चालले होते त्यांनी बरेचसे आरोप विलासराव देशमुख यांच्यावर केले त्यावेळेला अतीशय शांतपणे त्यांनी तो विषय हाताळलेला आहे त्यातून एक गुण दिसून आलेला आहे. अजीबात खुनशी राजकारण ते करत नव्हते हा अतीशय चांगला गुण त्यातून दिसून आलेला आहे. खुनशी राजकारण होऊ नये असे गुण आपण घेतलेतर त्यांना ख-या अर्थाने आदरांजली वाहिल्यासारखे होईल. अशा उतूंग राजकीय नेत्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गटनेता या नात्याने मी श्रध्दांजली वाहतो.

मा.सुरेश म्हेत्रे :- मा.महापौर साहेब, आज आपण माजी मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांना आदरांजली वाहतो आहोत. माझा आणि त्यांचा संबंध उदयोग क्षेत्रात काम करताना आलेला आहे. मी त्यांच्याकडे दोन प्रश्न घेऊन गेलो होतो त्यावेळेला हा संबंध आला. प्रशासनाने पाणीपट्टी २८ रुपये दराने आकारली त्यासाठी त्यांनी एक बैठक लावलेली होती त्यावर त्यांनी खरोखरच त्वरीत निर्णय घेऊन २८ रुपयाचे १८ रुपये केले. त्यानंतरही अनेक प्रश्न होते, पॅकेज संबंधी दुसरी बैठक घेतली त्यावेळेला सुध्दा त्यांनी सहकार्य केले. औद्योगिक क्षेत्रात भरभराटीच्या दृष्टिने ते प्रयत्नशिल असायचे. ते मुख्यमंत्री असताना तळेगाव, चाकण याठिकाणची एमआयडीसी वाढविली. मी त्यांना लघुउदयोजकातर्फे आणि म्हेत्रे कुंटूबातर्फे श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.सुजाता पालांडे :- मा.महापौर साहेब, १९८८ ला सामाजिक पुरस्कार मिळाला त्यावेळेला त्यांच्यामध्ये असलेली कार्यकर्त्याविषयीची जाण निदर्शनास आली. त्यांनी दिलेली थाप होती ते म्हणाले तू खुप मोठी हो. असे अतीशय मोठे कर्तृत्व, वकृत्व व नेतृत्व अशा तीन्ही गुणांचे व्यक्तिमत्व असलेला नेता आपल्यातुन निघुन गेलेला आहे त्यांना माझ्यातर्फे भावपुर्ण श्रध्दांजली वाहते.

मा.महापौर :- माजी आरोग्य मंत्री खानविलकर, कुंटे, मेहता, काकडे, विद्यमान केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख या नेत्यांना आपण सर्वानी श्रध्दांजली वाहीली आहे. मी माझ्या कुटूंबाच्या वतीने व पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहते व उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे शनिवार दि. १.०९.२०१२ रोजी दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -६
सभावृत्तांत
(दि.२०.७.२०१२ (दुपारी २.०० व २.३०), दि.३.८.२०१२ व
दि.१७.८.२०१२ (दु.३.००) ची तहकुब सभा)

दिनांक :- १.९.२०१२ वेळ:-दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१७.८.२०१२ (दु.३.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.१.९.२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे
२६. मा.आर.एस.कुमार
२७. मा.जावेद रमजान शेख
२८. चारुशीला प्रभाकर कुटे
२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण
३८. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे
३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.जयश्री वसंत गावडे
४३. मा.प्रसाद शेट्टी
४४.मा.अविनाश (दादा) टेकावडे
४५.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४६.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४७.मा.शेख अस्लम शैकत
४८.मा.वाबळे संजय मल्हारराव
४९. मा.मडिगेरी वर्षा विलास
५०. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५१. मा.सुपे आशा रविंद्र
५२. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
५३. मा.अजित दामोदर गव्हाणे
५४.मा.गोफणे अनुराधा देविदास
५५. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५७.मा.महेशदादा किसन लांडगे
५८. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५९. मा.लोंढे शुभांगी संतोष
६०. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६१. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६२. मा.सावळे सिमा रविंद्र

६३. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६४. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६५. मा.पालांडे सुजाता सुनिल
६६. मा.बहल योगेश मंगलसेन
६७. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६८. मा.कदम सदगुरु महादेव
६९. मा.कैलास महादेव कदम
७०. मा.छाया जगन्नाथ साबळे
७१. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७२. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७३. मा.आसवाणी सविता धनराज
७४.मा.वाघेरे सुनिता राजेश
७५.मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७६. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७७.मा.काळे विमल रमेश
७८.मा.पाडाळे निता विलास
७९. मा.विनोद जयवंत नढे
८०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८२. मा.विमलताई सुरेश जगताप
८३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८४.मा.बारणे निलेश हिरामण
८५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८६. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८७.मा.बारणे माया संतोष
८८. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८९. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९१. मा.कलाटे स्वाती मयुर
९२. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९३. मा.चौंधे आरती सुरेश
९४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९५. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९६. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९७. मा.जवळकर वैशाली राहुल
९८. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९९. मा.जगताप राजेंद्र गणपत
१००. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०१. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०२. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०३. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०४. मा.जम सोनाली पोपट
१०५. मा.प्रशांत शितोळे
१०६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०७. मा.काटे रोहित अप्पा सुदाम
१०८. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०९. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११०. मा.शेंडगे आशा सुखदेव
१११. मा.मोटे किरण बाळासाहेब
११२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
११३. मा.संजय केशवराव काटे
११४. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह.आयुक्त, मा.मुंढे,मा.पवार,मा.कुलकर्णी,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्य लेखापरिक्षक,मा.चाकणकर -प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.काची-उपशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.जगदाळे-प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.पाटील, मा.शरद जाधव,मा.लडकत,मा.पठाण, मा.साळवी-कार्य.अभियंता, मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.देशमुख-कायदा सल्लागार, मा.गायकवाड -जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.तानाजी खाडेः-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२६९/२०१२, दि.०७/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ०७/०५/२०१२ ठराव क्र.७
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.५७८ दि.१२/६/२०१२

नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास तसेच नगरसचिव कार्यालयातील

लघुलेखकाच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता, नगरसचिव कार्यालयासाठी च्लघुलेखक उच्चस्तरछ अभिनामाची  नवीन दोन पदे सुधारित वेतनश्रेणी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे र.रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४००/- या वेतनश्रेणीत पदोन्नतीने खाली दिलेल्या अर्हता व अटी - शर्ती मध्ये निर्माण करणेस, अर्हता व अटी शर्ती - १) लघुलेखन  १२० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, २) मराठी टंकलेखन ४० श.प्र.मी. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, ३) किमान एच.एस.सी (१२ वी) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ४) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ५) नगरसचिव कार्यालयात लघुलेखक पदावर कामकाजाचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र. १२८, दि. ०६/१०/२००७ अन्वये ४ कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदांची मंजुरी करुन महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीकामी पाठविणेत आलेली आहे. तसेच मा. विधी समिती ठराव क्र.७, दिनांक ०७/०५/२०१२ अन्वये दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची ६ (सहा) पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करणेत आलेला आहे.  परंतु महानगरपालिकेचा विस्तार पहाता आणखी १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची पदे अत्यावश्यक आहेत.  म्हणजेच एकूण १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (चौदा) पदांची निर्मिती होणे व मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीकामी पाठविणेस, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभा ठराव क्र. १६९७ दि.२७/११/१९९० अन्वये शहरांतर्गत दळणवळण व वाहतुकीचे नियोजन करणेसाठी वाहतूक घटक (Traffic Cell) घटक स्थापन करणे व त्याकरीता असिस्टन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर तथा उप परिवहन नियोजक या पदाची निर्मिती करुन त्यास महाराष्ट्र शासनाची शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३०९१/४०२/ प्र.क्र.८९/९१/नवि - २२ दिनांक २१ डिसेंबर १९९१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. १९९१ ते मे २०१२ पर्यंत या पदावर महानगरपालिकेने कोणाचीही रितसर नियुक्ती केलेली नाही किंवा कोणी अधिकारी या पदावर काम करणेस उत्सुक नसावा कारण की या पदावरील अधिका-यास इतरांप्रमाणे पदोन्नतीची संधीच उपलब्ध नाही.  मुंबई, पुणे महानगरपालिका, सिडको, मुंबई महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (MMRDA) इत्यादी ठिकाणी असलेल्या पदोन्नतीच्या संधीप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये असिस्टंन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर या पदावरील अधिका-यास पुढील पदोन्नतीच्या संधी   सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे देणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून ट्रान्सपोर्ट प्लानर तथा परिवहन नियोजक व सिनियर ट्रान्सपोर्ट प्लानर तथा वरिष्ठ परिवहन नियोजक या दोन पदांची नविन निर्मिती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, याठिकाणी दोन नवीन प्रभाग निर्माण करणार आहोत. त्यामध्ये त्या प्रभागांचे कच्चे नकाशे बघितले त्यात आढळून आले की, अ,ब,क,ड या ४ प्रभागांमधील ४ वॉर्ड नवीन प्रभागांना जोडले आहेत. हे करत असताना यमुनानगर व निगडी सध्या अ प्रभागात आहेत. ते नवीन नकाशाप्रमाणे निगडी हा भाग अ प्रभाग सोडून क प्रभागाला जोडला आहे. हे भौगोलिक दृष्टीकोणातून बघितले तर निगडी अ प्रभागामधून वगळून कसे काय क प्रभागाला जोडले गेले. नेहरुनगर क प्रभागात असताना अ प्रभागात प्राधिकरणाला जोडले गेले आहे. निगडी मध्ये विरोधी पक्षाचे दोन नगरसेवकांचे वॉर्ड आहेत. जाणूनबुजून उचलून टाकले आहेत का? अशी

शंका यायला लागली आहे. यात स्वतः लक्ष घाला. नागरिकांना सोयीचे होईल असे करा. भौगोलिक दृष्टीकोणातून प्राधिकरण व निगडी एकच आहे. निगडी भागाला अ प्रभागातच ठेवा अशी विनंती करते.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महापालिकेची लोकसंख्या १८ लाखांच्या पुढे गेलेली आहे. मुं.प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ नुसार कलम २९अ नुसार ही कारवाई होते का. या कलमानुसार कारवाई केलेली आहे हे पाहिले आहे का. लोकसंख्येनुसार किती प्रभाग वाढवले पाहिजेत. त्याची क्षमता किती पाहीजे हा तक्ता याठिकाणी मांडावा. आत्तापर्यंत महापालिकेमध्ये किती पदे भरली आहेत. सध्या कोणत्या विभागात काम करतो आहोत याची सुद्धा माहिती सभागृहात द्यावी. आपण २९ डिसेंबर १९९९ला शासनाची मान्यता घेतली. २०/२२ वर्षे गप्प बसलात. या कालावधीत कारवाई का केली नाही. या सगळ्याची अधिकाऱ्यांमार्फत उत्तरे द्यावीत. तक्त्यानुसार आरक्षित आहे का. २९अ नुसार तक्ता काय म्हणतोय.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, नेमका नियम काय यासंदर्भात भूमिका विषद केलेली आहे. माझीसुद्धा हीच मागणी आहे. अधिक गतीमान विकास होण्यासाठी प्रभाग निर्मिती करत असताना केवळ दोनच का. कोणता नकाशा लावला आहे. वर्गवारी लोकसंख्या डोळ्यासमोर ठेवून सोय केली का राजकीय सोयीनुसार असे नाही. प्रभाग व्हावा अशी इच्छा आहे. प्रभाग निर्मिती अत्यंत गरजेची आहे. दोनच का. नगररचना विभागाला सुद्धा मनुष्यबळ कमी पडते आहे. सगळ्या संकटांना सामोरे जातो आहोत. परत त्यात ताणतणाव निर्माण होऊन प्रकरण थांबवणार. प्रशासनाच्या बाजूने प्रशासनाकडून खुलासा करावा. कोणत्या अडचणी आहेत का, नियमानुसार दोन प्रभागांव्यतिरिक्त वाढ आवश्यक आहे का. आवश्यक असेल तर सगळ्या गोष्टींची माहिती आम्हाला द्यावी. तसेच आमच्या ज्ञानात थोडीफार भर पडणार आहे. दोन पेक्षा अधिक प्रभाग आवश्यक आहेत. ते निर्माण करताना विशिष्ट कालावधी जाईल. आम्हाला प्रशासनाच्या बाजूने माहिती मिळावी.

मा.सावंत (सह आयुक्त) :- मा.महापौर साहेब, कलम २९ प्रमाणे ९ पर्यंत प्रभाग तयार करु शकतो. यासंदर्भात सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी मा.आयुक्तांशी चर्चा झाली होती. त्यावेळी ५ जून २०१० पासून गेल्या ऑक्टोबर पर्यंत शासनाने क व ड वर्गांची नोकर भरती बंद केली होती. २००० पासून नोकर भरती करत आहोत. कर्मचारी निवृत्त होतात, मयत होतात, नोकरी सोडून जातात, त्यामुळे जागा रिकाम्या होतात. ५ जून ला बंदी आली. २००९ पासूनच कर्मचारी निवृत्त होत राहीले आहेत. जून मध्ये आपली ही मुदत संपली होती. अंध अपंगांची भरती चालू केलेली आहे. मागासवर्गीय भरती चालू केलेली आहे. अशा परिस्थितीत मागील महापालिका सभेमध्ये विनंती केली होती. पुणे महानगरपालिकेचा पॅटर्न पाहीला तर लक्षात आले की, तेथे प्रभाग अधिकारी हा डेप्युटी इंजिनिअर असून त्याच्या हाताखाली ज्युनिअर इंजिनिअर लोक आहेत. प्रशासन अधिकारी हे वरच्या दर्जाचे पद आहे. अशा परिस्थितीत प्रभागातील कामे होणार का? ३ लाख लोकसंख्या वाढली, समस्या वाढल्या. करसंकलन झोनल ऑफीसप्रमाणे ऑफीस तयार होतील. आपल्याकडे असिस्टंट कमिश्नर दर्जाचे अधिकारी प्रभाग अधिकारी आहेत. ३ झोनल ऑफीसर मिळून असणारा प्रभाग अधिकाऱ्याचा दर्जा आहे, ही तफावत कायम राहणार. या परिस्थीतीत मला आयुक्त साहेबांकडून सूचना आली की, सध्या २ प्रभाग वाढवतोय, त्यासाठी कर्मचारी स्टाफ वाढवा. एका प्रभागाकरिता ८३० कर्मचारी

लागतात. काही स्टाफ मर्ज होईल. काही पदे अशी आहेत की ती स्वतंत्र निर्माण करुन कर्मचारी नेमावे लागतात. सहाय्यक आयुक्त, अकाऊंटस् ऑफिसर इ. सगळी १५० ते १७५ पदे २ प्रभागांकरिता लागणार आहेत. एकूण ३७२ पदे निर्मिती करावी लागेल. त्यासाठी ११ कोटी पगारावरील खर्च व इतर खर्च, एकूण २५ कोटी खर्च वाढेल. महसूल खर्च ७ कोटी प्रत्येक प्रभागात १४ कोटी, एकूण २५ कोटी खर्च वाढेल. पुणे महानगरपालिकेने आपला पॅटर्न ॲप्रेशिएट केला आहे. आपल्याकडे सहाय्यक आयुक्त इनचार्ज आहे. त्यामुळे कामाला गती मिळते. तिथे एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर हे काम पाहतात. लहान ऑफीसमध्ये कामाची गती कमी होईल असे प्रामाणिक मत आहे. याचे डॉकेट आपल्यापुढे आलेले नाही. आपण जो निर्णय घ्याल तो आम्हाला मान्य आहे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, २५ कोटी खर्च करणार आहोत. एकतर नियमात ९च संख्या प्राप्त आहे. दोन प्रभाग वाढवून ५० कोटी खर्च करत असाल तर स्थापत्य व इतर योजनांवर खर्च करा. सत्तेच्या माध्यमातून पदे निर्माण करुन घ्या. केवळ दोन पदे वाढवण्यासाठी ५० कोटी खर्च होणार असतील तर फार मोठे प्रमाण आहे. १५० लोकांची पद निर्मिती एका प्रभागासाठी करण्यासाठी, एकूण ३७२ पदांची निर्मिती करावी लागणार आहे. वेतनश्रेणी, सर्व खर्च घाईघाईने करण्यापेक्षा संपूर्ण खर्च आरेखित भविष्यात तिजोरीवर आर्थिक ताण येवू नये म्हणून आर्थिक नियोजन करणे महत्वाचे आहे. हा सुद्धा आर्थिक प्रश्न निर्माण होतो, त्यावेळी राजकीय संबंध येत नाहीत. प्रत्येक नगरसेवकाला तिजोरीवर काय ताण पडतो हे महत्वाचे आहे का.  मी शहर कॉंग्रेस पक्षाचा अध्यक्ष आहे. मी माझ्या भावना त्या पद्धतीने मांडतोय. येथेच १२८ नगरसेवकांना प्रणाम ठोकावा लागणार आहे. आर्थिक नियोजन करत असताना आज आवश्यक आहे. भूमिका मांडत असताना मान्य करतो, सहभागी आहोत, मान्यता दिलेली आहे तिथे वेगळे असते. आम्ही समजण्यासारखे आहोत. अशा धोरणातून चालवण्या साठी नाही. आपण आपली भूमिका मांडली यापेक्षा आयुक्त साहेबांनी आराखडा तयार करुन घेऊन मिटींग बोलवावी. आर्थिक तिजोरीवर ताण पडू शकतो. कधी भरती होते, मुलाखती घेतल्या जातात काही समजत नाही. निश्चित व्यवस्थितपणे कारभार चालला आहे. आमचा हस्तक्षेप नको म्हणून मी जातही नाही. आर्थिक नुकसान होत असेल तर नगरसेवकांकडून याची वर्गवारी करत असताना एक काळ असा होता ही महापालिका अतिशय श्रीमंत होती. आज तोडातोड बजेट होते. कामे करावी लागतात. अशी अवस्था कोणताही कारभार करत असताना निविदा करत असताना विशिष्ट कालखंड ठरत असतो. अटी शर्ती सोयीनुसार शिथिल करता येतात. त्या कालखंडात कामे झाली नाहीतर तिजोरीवर अतिरिक्त भार पडतो. आधीचे आयुक्त शर्मा यांनी आर्थिक नियोजन अतिशय सुंदर केले. २५/३० कोटींची वाढीव टेंडर सभागृहात मंजूर केलेली आहेत. विषयांतर केलेले नाही. इतिहासाची पुनरावृत्ती परत करणार आहात का. हे करत असताना केवळ व्यवस्था करुन होणार नाही, न्याय मिळेल का. गतीमान कारभार होत असताना वर्षातून फक्त २५ कोटी स्थापत्यवर खर्च करण्यासाठी ५० कोटी खर्च करणार हा व्यवहार्य दृष्टीकोण नाही. राजकीय दृष्टीकोणातून म्हणत असाल तर अडचण नाही. आर्थिक दृष्टिकोणातून करत असाल तर तुम्ही विचार करा.

मा.स्वाती साने :- मा.महापौर साहेब, अ प्रभाग सोडून निगडी भागाला क प्रभागात कसे काय टाकले याचा खुलासा हवा आहे. लोकांना किती लांब जावे लागेल. याला काही अर्थ नाही.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, हा निवडणूकीचा विषय नाही. मी एका कामासाठी सावंत साहेबांकडे गेले असताना ते नकाशावर काम करत होते. वॉर्डांचा नंबर बघितले होते. त्यात लिहीले होते, अ प्रभागातील निगडी वॉर्डाला क प्रभागात टाकले होते. त्यावेळी मी त्यांच्याशी या विषयावर बोलले होते. त्यांनी अजून फायनल  झालेले नाही असे सांगितले. परंतू फायनल झाल्यानंतर आपण हरकती, सूचना घेणार त्यानंतर आपण करणार आहात का.

मा.महापौर :- हा विषय नंतर महापालिका सभेपुढे येणार आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, हा विषय अतिशय गंभीर आहे.

मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, दोन प्रभाग वाढवायचा विषय आहे, हा विचार केला पाहिजे. शहराची लोकसंख्या १७-१८ लाख आहे, ९ पेक्षा जास्त प्रभाग पाहीजेत. ४ प्रभागांत अतिशय व्यवस्थित पद्धतीने कार्यकारीणी चालू आहे. २ प्रभागांच्या रचनेवर वर्षाला किती खर्च करावा लागणार आहे, किती कर्मचारी वर्ग लागणार, त्यासाठी होणारा खर्च या गोष्टी विचारात घेणे गरजेचे आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने होत आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरात मोठमोठे गृहप्रकल्प उभारत आहेत. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड शहरात सुमारे ७० मीटर उंचीच्या इमारती उभारण्यास बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पुणे महसूल विभागाचा भूकंपप्रवण क्षेत्रात झोन-३ मध्ये समावेश आहे. शहरातील वेगाने वाढणाऱ्या बांधकामांच्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीकडे बांधकाम उद्योजकांचे होणारे दुर्लक्ष हा नागरीकांच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय असल्याने त्याबाबत वेळीच खबरदारीची उपाययोजना करुन दक्षता घेणे आवश्यक आहे. आजमितीस मनपाकडे अशी स्वतःची स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी तपासणीसाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे याबाबतची मनपाची जबाबदारी लक्षात घेवून मनपाकडे सादर होणाऱ्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट नुसार तपासणी करण्यासाठी व योग्य ती उपायायोजना करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत स्ट्रक्टरल सेल (Structural Cell) स्थापन करणे व या क्षेत्रातील उच्च अर्हताधारक म्हणजे एम.ई. (स्ट्रक्चरल इंजिनिअरींग) ही पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या तसेच किमान १५ वर्षे मनपा सेवेतील अनुभव असणाऱ्या व्यक्तीस स्ट्रक्चरल अभियंता तसेच एम.ई. (स्ट्रक्चरल इंजिनिअरींग) ही पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या तसेच किमान १० वर्षे मनपा सेवेतील अनुभव असणाऱ्या व्यक्तीस सहाय्यक स्ट्रक्चरल अभियंता पदी नेमणूक करणेस व नव्याने अशा दोन पदांची निर्मिती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपामध्ये दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने उपअभियंता (स्थापत्य) अभिनामाची १८ पदांची निर्मिती होणे व मंजूरीकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच कायदा विभागात ना.सर्वोच्च न्यायालय, ना.उच्च न्यायालय, मे.जिल्हा न्यायालय व मनपा न्यायालयाचे कामकाज चालते. त्याअनुषंगाने ना.न्यायालयांमध्ये चालणारे कामकाज हे इंग्रजीमध्ये असून सदरील कामकाजाकरिता कायदा विभागासाठी च्लघुलेखक उच्चस्तर (इंग्रजी)छअभिनामाचे पद ६व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे र.रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४००/- या वेतनश्रेणीत पदोन्नतीने खाली

दिलेल्या अटी व शर्तीस अधिन निर्माण करणेस अर्हता व अटी शर्ती :- १) इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक, २) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक, ३) कोणत्याही शाखेचा पदवीधर, ४) शासनाची एम.एस.सी.आय.टी. ही संगणकीय परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ५) कायदा विभागात लघुलेखक (इंग्रजी) पदाचा प्रत्यक्ष कामकाजाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक, वरीलप्रमाणे महानगरपालिकेच्या कायदा विभागासाठी च्लघुलेखक उच्चस्तर (इंग्रजी)छ पदाची निर्मिती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नव्याने होणाऱ्या दोन प्रभागांकरीता व म.न.पा.चा वाढता विस्तार पाहता तसेच सद्यस्थितीत विद्युत विभागाकडील कमी असलेली पदे, लक्षात घेता, म.न.पा. चे अस्थापनेवर कार्यकारी अभियंता (विद्युत) ४ पदे, उपअभियंता (विद्युत) ८ पदे आवश्यक असल्याने सदर पदे, नव्याने निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुर्वीच्या चार प्रभाग कार्यालयांमध्ये नागरवस्ती विकास योजना विभागाचे नियमीत कामकाज करणेकामी मा.आयुक्त जि.२१/७/२००९चे मंजूर प्रस्तावानुसार आदेश क्र.नावियो/१/काविं/५०७/ २००९, दिनांक २५/८/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि कर्मचाऱ्यांअभावी प्रभाग स्तरावर कामकाज सुरु झालेले नाही. तरी नव्याने निर्माण करावयाचे दोन प्रभाग आणि पुर्वीचे चार प्रभाग कार्यालयांमध्ये नागरवस्ती विकास योजना विभागाचे कामकाजाकरीता महापालिकेने निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार खालीलप्रमाणे पदे निर्माण करण्यास तसेच कासारवाडी येथील साई शारदा महिला I.T.I. येथे प्राचार्यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | समाज विकास अधिकारी | ९३००-३४८००+५४०० | ०६ |
| २ | सहाय्यक समाज विकास अधिकारी | ९३००-३४८००+४६०० | ०६ |
| ३ | समाजसेवक | ९३००-३४८००+४३०० | १२ |
| ४ | प्राचार्य (महिला आय.टी.आय.) कासारवाडी | | ०१ |

तरी कृपया नव्याने निर्माण करावयाच्या दोन प्रभागांकरीता निश्चित केलेल्या पदांमध्ये सदर पदांचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.४४५, दि.१९/५/१९८७ अन्वये मान्यता दिलेनुसार शासन निर्णय क्र. पीसीसी-३०८९/६४४/सीआर-९७ नावि-२२, दि.१ डिसेंबर १९८९ अन्वये खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.

१) सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) - ०१ पद
२) समाजविकास अधिकारी - ०१ पद

तरी महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त अभिनामाचे ११ पदांपैकी दि.__________ चे शासन निर्णयानुसार मंजूर असलेल्या सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून “उपआयुक्त (सामूहिक विकास)” असे करण्यास मान्यता देणेस आणि शासनाचे दि.४ मे, २००६चे आकृतीबंधानुसार क वर्ग महापालिकांकरीता ‘समाज विकास अधिकारी’ पदास र.रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी निश्चित करणेस व सदरची वेतनश्रेणी आकृतीबंधातील ‘सहाय्यक आयुक्त’ पदाचे वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असल्यामुळे तसेच सदरची वेतनश्रेणी या महापालिकेतील “प्रशासन अधिकारी” पदाचे समकक्ष असल्यामुळे आकृतीबंधातील वेतनश्रेणीनुसार

'समाज विकास अधिकारी' अभिनामाचे पदनाम बदलून 'सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास)' असे करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.नवनाथ जगताप :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र काटे :- मा.महापौर साहेब,सहा प्रभाग होणार आहेत. भौगोलिक परिस्थिती पाहून हा विषय करावा. माझ्या प्रभागात निम्मे दापोडी, निम्मे बोपखेल येते.

मा.तानाजी खाडे :- उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :-९३ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२६९/२०१२, दि.०७/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ०७/०५/२०१२ ठराव क्र.७
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.५७८ दि.१२/६/२०१२

नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास तसेच नगरसचिव कार्यालयातील लघुलेखकाच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता, नगरसचिव कार्यालयासाठी "लघुलेखक उच्चस्तर" अभिनामाची नवीन दोन पदे सुधारित वेतनश्रेणी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे र.रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४००/- या वेतनश्रेणीत पदोन्नतीने खाली दिलेल्या अर्हता व अटी - शर्ती मध्ये निर्माण करणेस, अर्हता व अटी शर्ती - १) लघुलेखन १२० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, २) मराठी टंकलेखन ४० श.प्र.मी. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, ३) किमान एच.एस.सी (१२ वी) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ४) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ५) नगरसचिव कार्यालयात लघुलेखक पदावर कामकाजाचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र. १२८, दि. ०६/१०/२००७ अन्वये ४ कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदांची मंजुरी करुन महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीकामी पाठविणेत आलेली आहे. तसेच मा. विधी समिती ठराव क्र.७, दिनांक ०७/०५/२०१२ अन्वये दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची ६ (सहा) पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणेत आलेला आहे. परंतु महानगरपालिकेचा विस्तार पहाता आणखी १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची पदे अत्यावश्यक आहेत. म्हणजेच एकूण १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (चौदा) पदांची निर्मिती होणे व मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीकामी पाठविणेस, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभा ठराव क्र. १६९७ दि.२७/११/१९९० अन्वये शहरांतर्गत दळणवळण व

वाहतुकीचे नियोजन करणेसाठी वाहतूक घटक (Traffic Cell) घटक स्थापन करणे व त्याकरीता असिस्टन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर तथा उप परिवहन नियोजक या पदाची निर्मिती करुन त्यास महाराष्ट्र शासनाची शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३०९१/४०२/ प्र.क्र.८९/९१/नवि - २२ दिनांक २१ डिसेंबर १९९१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. १९९१ ते मे २०१२ पर्यंत या पदावर महानगरपालिकेने कोणाचीही रितसर नियुक्ती केलेली नाही किंवा कोणी अधिकारी या पदावर काम करणेस उत्सुक नसावा कारण की या पदावरील अधिका-यास इतरांप्रमाणे पदोन्नतीची संधीच उपलब्ध नाही. मुंबई, पुणे महानगरपालिका, सिडको, मुंबई महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (MMRDA) इत्यादी ठिकाणी असलेल्या पदोन्नतीच्या संधीप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये असिस्टंन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर या पदावरील अधिका-यास पुढील पदोन्नतीच्या संधी सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे देणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून ट्रान्सपोर्ट प्लानर तथा परिवहन नियोजक व सिनियर ट्रान्सपोर्ट प्लानर तथा वरिष्ठ परिवहन नियोजक या दोन पदांची नविन निर्मिती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड शहराचा विकास झपाट्याने होत आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहरात मोठमोठे गृहप्रकल्प उभारत आहेत. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड शहरात सुमारे ७० मीटर उंचीच्या इमारती उभारण्यास बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पुणे महसूल विभागाचा भूकंपप्रवण क्षेत्रात झोन-३ मध्ये समावेश आहे. शहरातील वेगाने वाढणाऱ्या बांधकामांच्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीकडे बांधकाम उद्योजकांचे होणारे दुर्लक्ष हा नागरीकांच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय असल्याने त्याबाबत वेळीच खबरदारीची उपाययोजना करुन दक्षता घेणे आवश्यक आहे. आजमितीस मनपाकडे अशी स्वतःची स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी तपासणीसाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे याबाबतची मनपाची जबाबदारी लक्षात घेवून मनपाकडे सादर होणाऱ्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट नुसार तपासणी करण्यासाठी व योग्य ती उपाययोजना करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत स्ट्रक्टरल सेल (Structural Cell) स्थापन करणे व या क्षेत्रातील उच्च अर्हताधारक म्हणजे एम.ई. (स्ट्रक्चरल इंजिनिअरींग) ही पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या तसेच किमान १५ वर्षे मनपा सेवेतील अनुभव असणाऱ्या व्यक्तीस स्ट्रक्चरल अभियंता तसेच एम.ई. (स्ट्रक्चरल इंजिनिअरींग) ही पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या तसेच किमान १० वर्षे मनपा सेवेतील अनुभव असणाऱ्या व्यक्तीस सहाय्यक स्ट्रक्चरल अभियंता पदी नेमणूक करणेस व नव्याने अशा दोन पदांची निर्मिती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपामध्ये दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने उपअभियंता (स्थापत्य) अभिनामाची १८ पदांची निर्मिती होणे व मंजूरीकामी महाराष्ट्र शासनाकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच कायदा विभागात ना.सर्वोच्च न्यायालय, ना.उच्च न्यायालय, मे.जिल्हा न्यायालय व मनपा न्यायालयाचे कामकाज चालते. त्याअनुषंगाने ना.न्यायालयांमध्ये चालणारे कामकाज हे इंग्रजीमध्ये असून सदरील कामकाजाकरिता कायदा विभागासाठी "लघुलेखक उच्चस्तर (इंग्रजी)"अभिनामाचे पद ६व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे र.रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४००/- या वेतनश्रेणीत पदोन्नतीने खाली दिलेल्या अटी व शर्तीस अधिन निर्माण करणेस अर्हता व अटी शर्ती :- १) इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक, २) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक,३) कोणत्याही शाखेचा पदवीधर, ४) शासनाची एम.एस.सी.आय.टी. ही संगणकीय परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ५) कायदा विभागात लघुलेखक (इंग्रजी) पदाचा प्रत्यक्ष कामकाजाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक, वरीलप्रमाणे

महानगरपालिकेच्या कायदा विभागासाठी “लघुलेखक उच्चस्तर (इंग्रजी)” पदाची निर्मिती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नव्याने होणाऱ्या दोन प्रभागांकरीता व म.न.पा.चा वाढता विस्तार पाहता तसेच सद्यस्थितीत विद्युत विभागाकडील कमी असलेली पदे, लक्षात घेता, म.न.पा. चे अस्थापनेवर कार्यकारी अभियंता (विद्युत) ४ पदे, उपअभियंता (विद्युत) ८ पदे आवश्यक असल्याने सदर पदे, नव्याने निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुर्वीच्या चार प्रभाग कार्यालयांमध्ये नागरवस्ती विकास योजना विभागाचे नियमीत कामकाज करणेकामी मा.आयुक्त जि.२१/७/२००९चे मंजूर प्रस्तावानुसार आदेश क्र.नाவियो/१/काvि/५०७/ २००९, दिनांक २५/८/२००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि कर्मचाऱ्यांअभावी प्रभाग स्तरावर कामकाज सुरु झालेले नाही. तरी नव्याने निर्माण करावयाचे दोन प्रभाग आणि पुर्वीचे चार प्रभाग कार्यालयांमध्ये नागरवस्ती विकास योजना विभागाचे कामकाजाकरीता महापालिकेने निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार खालीलप्रमाणे पदे निर्माण करण्यास तसेच कासारवाडी येथील साई शारदा महिला I.T.I. येथे प्राचार्यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | समाज विकास अधिकारी | ९३००-३४८००+५४०० | ०६ |
| २ | सहाय्यक समाज विकास अधिकारी | ९३००-३४८००+४६०० | ०६ |
| ३ | समाजसेवक | ९३००-३४८००+४३०० | १२ |
| ४ | प्राचार्य (महिला आय.टी.आय.) कासारवाडी | | ०१ |

नव्याने निर्माण करावयाच्या दोन प्रभागांकरीता निश्चित केलेल्या पदांमध्ये सदर पदांचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.४४५,दि.१९/५/१९८७ अन्वये मान्यता दिलेनुसार शासन निर्णय क्र. पीसीसी-३०८९/६४४/ सीआर-९७ नावि-२२, दि.१ डिसेंबर १९८९ अन्वये खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.

१) सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) - ०१ पद
२) समाजविकास अधिकारी - ०१ पद

तरी महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त अभिनामाचे ११ पदांपैकी दि. चे शासन निर्णयानुसार मंजूर असलेल्या सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून “उपआयुक्त (सामूहिक विकास)” असे करण्यास मान्यता देणेस आणि शासनाचे दि.४ मे, २००६चे आकृतीबंधानुसार क वर्ग महापालिकांकरीता ‘समाज विकास अधिकारी’ पदास र.रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी निश्चित करणेस व सदरची वेतनश्रेणी आकृतीबंधातील ‘सहाय्यक आयुक्त’ पदाचे वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असल्यामुळे तसेच सदरची वेतनश्रेणी या महापालिकेतील “प्रशासन अधिकारी” पदाचे समकक्ष असल्यामुळे आकृतीबंधातील वेतनश्रेणीनुसार ‘समाज विकास अधिकारी’ अभिनामाचे पदनाम बदलून ‘सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास)’ असे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.साधना जाधव:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ९४ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.स्था/बीआरटीएस/१६८/१२दि.४/६/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.५९६ दि.१२/६/२०१२

सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या मागील तीन आर्थिक वर्षात मनपाची सुधारलेली आर्थिक परिस्थिती विचारात घेवून जागतिक बँकेकडून [१)डांगे चौक येथे उड्डाणपूल बांधणे र.रू.१० कोटी, २)बीआरटीएस बसस्टॉप व बसमध्ये ITS यंत्रणा उभी करणे र.रू.७ कोटी ३)तीन बस टर्मिनल व पार्कींग विकसित करणे र.रू.१२ कोटी ४)मुंबई पुणे व औंध-रावेत बीआरटीएस रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी सुविधा निर्माण करणे र.रू.१० कोटी) असे एकूण र.रू.३९.०० कोटी इतके कर्ज कमी करणेकामीची बाब अवलोकन करणेत येत आहे.

मा.अरुणा भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.शुभांगी बोऱ्हाडे :-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ९५ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/६/कावि/१३३६/१२ दि.४/६/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६२५ दि.१३/६/२०१२

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत तारखा विहित करणे आवश्यक असल्याने महापालिका आयुक्त यांनी महापालिकेचे अंदाजपत्रक कलम ९५ अन्वये दरवर्षी २० फेब्रुवारीपुर्वी मा.स्थायी समितीला सादर करावे, याप्रमाणे तारखा विहीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.अमिना पानसरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.प्र.नगरसचिव यांनी विषय क्रमांक ४चे वाचन केले. त्यानंतर मा.जगदीश शेट्टी, स्थायी समितीचे सभापती यांनी आपले निवेदन सादर केले. नंतर ठराव मांडला. मा.राजू मिसाळ यांनी सदर ठरावास अनुमोदन दिले. यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ९६ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/
कावि/१३३७/१२ दि.५/६/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६२६ दि.१३/६/२०१२

मा.आयुक्त यांजकडून आलेले पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे "प" अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक कामीचे अंदाज/प्रस्ताव अवलोकन करणेत आले.

<u>अंदाजपत्रक "अ","क","प " व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक</u>

| अ.क्र. | तपशिल | सन २०१२-१३ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | १८,७६,२७,६८,३०० |
| २) | एकूण खर्च | १८,७१,८१,७३,४०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ४,४५,९४,९०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | ४५४,५९,३५,३४७ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ४५४,५९,३५,३४७ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ११३६,२६,६५,०३० |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ११३५,७७,८०,८५६ |
| ३) | अखेरची शिल्लक | ४८,८४,१७४ |

त्यानुसार मा.स्थायी समितीचे सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक “अ” व “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे तयार करणेत आले आहे ते अंतिमरित्या स्विकृत करणेत येत आहे.

अंदाजपत्रक “अ”,“क”,“प ” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१२-१३ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | १८,७६,२७,६८,३०० |
| २) | एकूण खर्च | १८,७१,८१,७३,४०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ४,४५,९४,९०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | ४५४,५९,३५,३४७ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ४५४,५९,३५,३४७ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ११३६,२६,६५,०३० |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ११३५,७७,८०,८५६ |
| ३) | अखेरची शिल्लक | ४८,८४,१७४ |

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.आशा सूर्यवंशीः-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक :- ९७ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.निता पाडाळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८४ दि.२८/६/२०१२

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अपंग कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामधील मा.महापालिका सभा ठराव क्रमाक ९४४ दिनांक २३/७/२०१० अन्वये घटक योजना क्र. ७ “महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ

करणा-या महापालिका हद्यीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य" यामध्ये "१८ वर्षावरील मतिमंद व्यक्ती प्रमाणेच वयवर्षे ५ ते १८ वयोगटातील मतिमंद बालक/व्यक्ति यांना देखील वार्षीक र.रु.१२०००/- (अक्षरी रक्कम रुपये बारा हजार फक्त) अर्थसहाय्य" अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.मंदाताई आल्हाट :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.तानाजी खाडे:-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६

दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.विनया तापकीर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७२९ दि.३/७/२०१२

चिंचवड स.नं.१६५ प्रेमलोक पार्कमधील शाळा इमारत मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडे दराने व योग्य त्या अटीशर्तीवर नॉव्हेल इन्स्टीटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च चिंचवड या संस्थेस ३५ वर्षे कालावधीकरीता भाड्याने देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.रामदास बोकड :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

मा.विनोद नढे :- मा.महापौर साहेब, मी खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेक्टर नं.२८ येथील कै.पांडुरंग काळभोर सभागृह मधील किचन हॉल हा आदर्श महिला बचत गट, खराळवाडी, पिंपरी यांना मा.उपसंचालक, नगररचना विभाग जे भाडे निश्चित करतील, त्या भाडे दराने पुढील २० वर्षे कालावधीसाठी निविदा न मागविता थेट पद्धतीने करारनामा करुन भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी.

मा.गणेश लोंढे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, माझ्या वॉर्डात मनपाची शाळा आहे. ३५ वर्षांच्या भाडे करारावर नगररचना ठरवतील त्या दराने देण्याचा हा विषय मला कळालेला नाही. ही महापालिकेची मालमत्ता आहे. योग्य दर मिळालेला नाही. चुकीच्या पद्धतीने विषय मंजूर करुन महापालिकेचे नुकसान करतोय याचा विचार व्हावा. या विषयाला माझा विरोध आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

मौजे सांगवी येथील मनपाच्या ताब्यात असलेल्या सर्वे क्र.६ मधील विकसित उद्यानातील गाळे हे भूमीजिंदगी विभागाकडे वर्ग झालेनंतर मनपाकडे विनंती अर्ज करणारे व अपंग असणारे अर्जदार यांना सदर एकूण ३ गाळे हे खालीलप्रमाणे १) काकडे संतोष गणपत २) सौ.पवार सुरेखा मनोहर ३) केदारी कृष्णा तुकाराम या तीन अर्जदारांना २५ वर्षांचे कालावधीकरिता निविदा न काढता थेट पद्धतीने प्रति ५ वर्षांनी नुतनीकरणाचे अटीवर व मनपा ठरवेल त्या योग्य भाडेदराने देणेस तसेच याबाबतचे इतर सर्व प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देणेत यावी. ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. तसेच भूमि आणि जिंदगी विभागामार्फत निवीदा नोटीस क्र.१/२०१२-१३ मधील सांगवी सर्वे क्र.६ मधील उद्यानाचे गाळे भाडेकराराने देणेची प्रक्रिया रद्द करावी आणि सदर सर्व गाळे केवळ अपंग व्यक्तिंना देणेचे धोरणास मान्यता देणेत यावी.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, दोनही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ९८ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.विनया तापकीर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७२९ दि.३/७/२०१२

चिंचवड स.नं.१६५ प्रेमलोक पार्कमधील शाळा इमारत मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडे दराने व योग्य त्या अटीशर्तीवर नॉव्हेल इन्स्टीटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च चिंचवड या संस्थेस ३५ वर्षे कालावधीकरीता भाड्याने देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेक्टर नं.२८ येथील कै.पांडुरंग काळभोर सभागृह मधील किचन हॉल हा आदर्श महिला बचत गट, खराळवाडी, पिंपरी यांना मा.उपसंचालक, नगररचना विभाग जे भाडे निश्चित करतील, त्या भाडे दराने पुढील २० वर्षे कालावधीसाठी निविदा न मागविता थेट पद्धतीने करारनामा करुन भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावी. तसेच मौजे सांगवी येथील मनपाच्या ताब्यात असलेल्या सर्वे क्र.६ मधील विकसित उद्यानातील गाळे हे भूमीजिंदगी

विभागाकडे वर्ग झालेनंतर मनपाकडे विनंती अर्ज करणारे व अपंग असणारे अर्जदार यांना सदर एकूण ३ गाळे हे खालीलप्रमाणे १) काकडे संतोष गणपत २) सौ.पवार सुरेखा मनोहर ३) केदारी कृष्णा तुकाराम या तीन अर्जदारांना २५ वर्षांचे कालावधीकरिता निविदा न काढता थेट पद्धतीने प्रति ५ वर्षांनी नुतनीकरणाचे अटीवर व मनपा ठरवेल त्या योग्य भाडेदराने देणेस तसेच याबाबतचे इतर सर्व प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच भूमि आणि जिंदगी विभागामार्फत निवीदा नोटीस क्र.१/२०१२-१३ मधील सांगवी सर्वे क्र.६ मधील उद्यानाचे गाळे भाडेकराराने देणेची प्रक्रिया रद्द करावी आणि सदर सर्व गाळे केवळ अपंग व्यक्तिंना देणेचे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.साधना जाधव :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ७

दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६६५/१२ दि.९/७/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७६३ दि.१०/७/२०१२

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणी बिलाबाबत प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद प्रमाणे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

मा.अरुणा भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, मी खालीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

(१) द.सा.द.शे. १५% सरळ व्याज ऐवजी १२% करण्यात यावा.
(२) बिलाच्या मूळ रकमेवर ३०% दंड ऐवजी २०% करण्यात यावा.
(३) तसेच सदर योजनेचा लाभ घेण्याचा कालावधी ३० नोव्हेंबर पर्यंत वाढवण्यात यावा.
(४) मिटर मालकाचे नाव बदल करताना अनामत रक्कम पुर्वी घेतलेली असते. त्यामुळे सदर मालकाकडून पुर्वी दिलेली अनामत रक्कम मुळ मालक परत मागणार नाही याचे हमीपत्र घेवुन ५०० रुपये आकारुन नाव बदल करण्यात यावा.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, प्रथम आयुक्तांचे आभार व्यक्त करतो. मिटर बसवण्यासाठी बराच वादविवाद झालेला आहे. अटी शिथिल करण्याच्या प्रस्तावाचे शहराच्या वतीने मनापासून

आभार व्यक्त करतो. नागरिकांना मिटरची चोरी झाली किंवा दुरुस्ती करावी लागली तर भूर्दंड पडतो. यात महापालिकेने काही प्रमाणात जबाबदारी स्विकारली पाहीजे.

मा.साधना जाधव :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ९९ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६६५/१२
दि.९/७/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७६३ दि.१०/७/२०१२

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणी बिलाबाबत प्रस्तावासोबतच्या तक्त्यात खालील नमूद प्रमाणे दुरुस्ती करुन प्रस्तावातील धोरणास मान्यता देणेत येत आहे.

(१) द.सा.द.शे. १५% सरळ व्याज ऐवजी १२% करण्यात यावा.
(२) बिलाच्या मूळ रकमेवर ३०% दंड ऐवजी २०% करण्यात यावा.
(३) तसेच सदर योजनेचा लाभ घेण्याचा कालावधी ३० नोव्हेंबर पर्यंत वाढवण्यात यावा.
(४) मिटर मालकाचे नाव बदल करताना अनामत रक्कम पुर्वी घेतलेली असते. त्यामुळे सदर मालकाकडून पुर्वी दिलेली अनामत रक्कम मुळ मालक परत मागणार नाही याचे हमीपत्र घेवुन ५०० रुपये आकारुन नाव बदल करण्यात यावा.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.तानाजी खाडेः-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १०० विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/४५७/२०१२,
दि. १८/०६/२०१२

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२५ दि.६/७/२०१२

डॉ.श्री.उदय टेकाळे,सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २७/०८/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.भारती फरांदे :- मा.महापौर साहेब,विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- ९

दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१अ/कावि/५०८/२०१२, दि. ३/७/१२

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८ दि.६/७/२०१२

शासन निणर्याने “सहाय्यक आयुक्त” पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील “प्रशासन अधिकारी” पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असून “उप आयुक्त” पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा “सहाय्यक आयुक्त” पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू आहे. “क” वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये उपआयुक्त अभिनामाची पदे अस्तित्वात असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशी पदे अस्तित्वात नसल्याने वेतन वा इतर कोणत्याही बाबीमध्ये बदल न करता “सहाय्यक आयुक्त” पदाचे पदनाम बदलून “उप आयुक्त” व “प्रशासन अधिकारी” अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून “सहाय्यक आयुक्त” असे करणेस मान्यता देणेत यावी.

मा.आशा सुपे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

मा.शमिम पठाण :- मा.महापौर साहेब, फक्त पदनाम बदललेले आहे का वेतनश्रेणीत काही बदल झालेला आहे. ३ वेळा सहाय्यक आयुक्त, प्रशासन अधिकारी शब्द आलेला आहे.

मा.श्रीकर परदेशी :- सर्वसामान्यपणे प्रशासकीय पेपर म्हणतात, किंवा तशी पद्धत आहे की, सहा.आयुक्त पेक्षा वरिष्ठ उप (महापालिका आयुक्त) आयुक्त त्यांच्यापेक्षा वरिष्ठ सह आयुक्त,

त्यानंतर अतिरिक्त आयुक्त व महापालिका आयुक्त अशी रचना आहे. नागपूर किंवा पुणे महानगरपालिकेत वरिष्ठ अधिकाऱ्यांना बैठकीला बोलवतात. आयुक्त नसेल तर उपआयुक्त किंवा सहा.आयुक्त जातात. बैठक घेणाऱ्या अधिकाऱ्याला वाटते हे यांच्यापेक्षा ज्युनिअर आहेत. सहा.आयुक्तांपेक्षा उपआयुक्त वरिष्ठ आहेत. अशीच सिनिऑरिटी असल्यामुळे फक्त पदनामाला दुरुस्त करतोय.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

भांडारनियंत्रक, मुख्य आयातकर अधिक्षक, विशेष अधिकारी, संगणक अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी ही पदे प्रशासकीय संवर्गातील असून प्रशासन अधिकारी गट-ब या पदाशी समकक्ष आहे, व त्यांची वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० देखील प्रशासन अधिकारी पदाशी समकक्ष आहे. त्यामुळे प्रशासन अधिकारी या पदास 'सहाय्यक आयुक्त' असे पदनाम करण्याच्या प्रस्तावानुसार भांडारनियंत्रक, मुख्यआयातकर अधिक्षक, संगणक अधिकारी, विशेष अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी या पदांचे पदनाम देखील 'सहाय्यक आयुक्त' असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड मनपा अग्निशामक आस्थापनेवरील कर्मचारी श्री.भाऊसाहेब धराडे यांची आरक्षण अनुशेष, रोस्टर आवश्यकता व अर्हता या बाबी विचारात घेऊन आरोग्य निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात यावी तसेच स्थायी समितीची पिं.चिं.मनपा ठराव क्र.८९९२ दिनांक १८.०८.२००९ यांस आधीन राहून सदर ठरावाची संपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देऊन सदर ठरावाप्रमाणे कांबळे एन.ए. यांची वायरलेस ऑपरेटर या पदाची सेवा ज्येष्ठता यादी गुणवत्तेऐवजी रुजू तारखेनुसार रुजु तारखेस शासन नियमानुसार करुन त्यांना रेडिओ मॅकेनिक इलेक्ट्रीशीअन या पदावर सन १९८८ रोजी पदोन्नती देऊन वायरलेस इन्चार्ज या पदावर १९९० पासून व सन १९९७ पासून आणखी एक विकास अभियंता (वि/यां) हे पद निर्माण करुन सदर पदास एस.एस.सी. तांत्रिक परीक्षा उत्तीर्ण हे अर्हता धारण करणाऱ्यास सदर पदावर पदोन्नतीत प्राधान्य देण्यात येऊन आरक्षण, अनुशेष, ५० बिंदू नामावली, रोस्टर, आवश्यकता व अर्हता व राज्य शासनाचे मागासवर्गीयांस उच्च पदावर पदोन्नत्या देण्याच्या आरक्षण कायद्यानुसार अनुसूचीत जाती कल्याण समिती महाराष्ट्र शासन तसेच अनुसूचीत जाती राज्य व केंद्रीय आयोग यांच्या मागासवर्गीयांच्या पदोन्नत्यात आरक्षणाच्या शिफारसी व रोस्टर या बाबी विचारात घेऊन सदर पदावर श्री.कांबळे एन.ए. यांना पदोन्नती देण्यात यावी तसेच श्री.राजेंद्र विष्णु हात्ते व श्री.पोपट विठ्ठल सुर्वे पद-सुतार, स्थापत्य विभाग हे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करीत असलेने तसेच त्यांना स्थापत्यविषयक कामांचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेता त्यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर पदोन्नती देणेबाबत या ठरावान्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी आवश्यक शासन मान्यतेबाबतची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी अंतर्गत लेखा परिक्षक हे पद शासन मंजूर असुन सदर पदास महापालिकेच्या नियमाप्रमाणे सर्वात सेवाज्येष्ठ व लेखाधिकारी पदावर १५ वर्षे सेवा झालेले श्री.दत्तात्रय यशवंत गायकवाड हे पात्र असल्याने शासन नियमाप्रमाणे कामकाज पाहण्यासाठी त्यांना पदोन्नती देण्यास मान्यता देणेत यावी. सदर विषय कायम होण्याची वाट न पाहता तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये असलेले जनतासंपर्क अधिकारी पद हे वर्ग २ चे पद असल्याने या पदाचे पदनाम बदलून "सहाय्यक आयुक्त (जनसंपर्क)" असे करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आस्थापनेवर अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या अभिनामाचे एक पद पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, गोपनीय अहवाल, आरक्षण, सेवाज्येष्ठता क्रमांक, अनुभव कालावधी इ. सेवा विषयक बाबी व शासनाने कळविलेली शैक्षणिक अर्हता धारण करणारे डॉ.पवन वसंत साळवे हे एकमेव वैद्यकीय अधिकारी आहेत. सबब अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.४४५, दि.१९/५/१९८७ अन्वये मान्यता दिलेनुसार शासन निर्णय क्र. पीसीसी-३०८९/६४४/ सीआर-९७ नावि-२२, दि.१ डिसेंबर, १९८९ अन्वये खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.

१) सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) - ०१ पद
२) समाजविकास अधिकारी - ०१ पद

तरी महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त अभिनामाचे ११ पदांपैकी दि. चे शासना निर्णयानुसार मंजूर असलेल्या सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून "उपआयुक्त (सामूहिक विकास)" असे करण्यास मान्यता यावी आणि शासनाचे दि.४ मे, २००६चे आकृतीबंधानुसार क वर्ग महापालिकांकरीता 'समाज विकास अधिकारी' पदास र.रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी निश्चित केली आहे. सदरची वेतनश्रेणी आकृतीबंधातील 'सहाय्यक आयुक्त' पदाचे वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असल्यामुळे तसेच सदरची वेतनश्रेणी या महापालिकेतील 'प्रशासन अधिकारी' पदाचे समकक्ष असल्यामुळे आकृतीबंधातील वेतनश्रेणीनुसार 'समाज विकास अधिकारी' अभिनामाचे पदनाम बदलून 'सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास)' असे करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.प्रसाद शेट्टी :- मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होत असेल तर निश्चितपणे त्यानुसार कारवाई करावी. प्रमोशनबाबतीत, सिनिऑरिटीबाबतीत आर्थिक ताण येत असेल पदे वाढवून त्याबाबत सरळ कमिटी आपल्या दक्षतेखाली त्यांनी निर्णय घ्यावा, या उपसूचनेनुसार कारवाई करावी.

मा.भारती फरांदे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- १०१ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१अ/कावि/५०८/२०१२,
दि. ३/७/१२

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८ दि.६/७/२०१२

शासन निणर्याने "सहाय्यक आयुक्त" पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील "प्रशासन अधिकारी" पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असून "उप आयुक्त" पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा "सहाय्यक आयुक्त" पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू आहे. "क" वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये उपआयुक्त अभिनामाची पदे अस्तित्वात असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशी पदे अस्तित्वात नसल्याने वेतन वा इतर कोणत्याही बाबीमध्ये बदल न करता "सहाय्यक आयुक्त" पदाचे पदनाम बदलून "उप आयुक्त" व "प्रशासन अधिकारी" अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून "सहाय्यक आयुक्त" असे करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच भांडारनियंत्रक, मुख्य आयातकर अधिक्षक, विशेष अधिकारी, संगणक अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी ही पदे प्रशासकीय संवर्गातील असून प्रशासन अधिकारी गट-ब या पदाशी समकक्ष आहे, व त्यांची वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ५४०० देखील प्रशासन अधिकारी पदाशी समकक्ष आहे. त्यामुळे प्रशासन अधिकारी या पदास 'सहाय्यक आयुक्त' असे पदनाम करण्याच्या प्रस्तावानुसार भांडारनियंत्रक, मुख्यआयातकर अधिक्षक, संगणक अधिकारी, विशेष अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी या पदांचे पदनाम देखील 'सहाय्यक आयुक्त' असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड मनपा अग्निशामक आस्थापनेवरील कर्मचारी श्री.भाऊसाहेब धराडे यांची आरक्षण अनुशेष, रोस्टर आवश्यकता व अर्हता या बाबी विचारात घेऊन आरोग्य निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात यावी तसेच स्थायी समितीची पिं.चिं.मनपा ठराव क्र. ८९९२ दिनांक १८.०८.२००९ यांस आधीन राहून सदर ठरावाची संपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देऊन सदर ठरावाप्रमाणे कांबळे एन. ए. यांची वायरलेस ऑपरेटर या पदाची सेवा ज्येष्ठता यादी गुणवत्तेऐवजी रुजू तारखेनुसार रुजु तारखेस शासन नियमानुसार करुन त्यांना रेडिओ मॅकेनिक इलेक्ट्रीशीअन या पदावर सन १९८८ रोजी पदोन्नती देऊन वायरलेस इन्चार्ज या पदावर १९९० पासून व सन १९९७ पासून आणखी एक विकास अभियंता (वि/यां) हे पद निर्माण करुन सदर पदास एस.एस.सी. तांत्रिक परीक्षा उत्तीर्ण हे अर्हता धारण करणाऱ्यास सदर पदावर पदोन्नतीत प्राधान्य देण्यात येऊन आरक्षण, अनुशेष, ५० बिंदू नामावली, रोस्टर, आवश्यकता व अर्हता व राज्य शासनाचे मागासवर्गीयांस उच्च पदावर पदोन्नत्या देण्याच्या आरक्षण कायद्यानुसार अनुसूचीत जाती कल्याण समिती महाराष्ट्र शासन तसेच अनुसूचीत जाती राज्य व केंद्रीय आयोग यांच्या मागासवर्गीयांच्या पदोन्नत्यात आरक्षणाच्या शिफारसी व रोस्टर या बाबी विचारात घेऊन सदर पदावर श्री.कांबळे एन.ए. यांना पदोन्नती देण्यास तसेच श्री.राजेंद्र विष्णु हात्ते व श्री.पोपट विठ्ठल सुर्वे पद-सुतार, स्थापत्य विभाग हे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची शैक्षणिक व तांत्रिक अर्हता धारण करीत असलेने तसेच त्यांना स्थापत्यविषयक कामांचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेता त्यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर पदोन्नती देणेबाबत या ठरावान्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच याकामी आवश्यक शासन मान्यतेबाबतची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करावी. तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी अंतर्गत लेखा परिक्षक हे पद शासन मंजूर असुन सदर पदास महापालिकेच्या नियमाप्रमाणे सर्वात सेवाज्येष्ठ व लेखाधिकारी पदावर १५ वर्षे सेवा झालेले श्री.दत्तात्रय यशवंत गायकवाड हे पात्र असल्याने शासन नियमाप्रमाणे कामकाज पाहण्यासाठी त्यांना पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. सदर विषय कायम होण्याची वाट न पाहता तातडीने अंमलबजावणी करावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये असलेले जनतासंपर्क अधिकारी पद हे वर्ग २ चे पद असल्याने या पदाचे पदनाम बदलून "सहाय्यक

आयुक्त (जनसंपर्क)" असे करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या अभिनामाचे एक पद पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, गोपनीय अहवाल, आरक्षण, सेवाज्येष्ठता क्रमांक, अनुभव कालावधी इ. सेवा विषयक बाबी व शासनाने कळविलेली शैक्षणिक अर्हता धारण करणारे डॉ.पवन वसंत साळवे हे एकमेव वैद्यकीय अधिकारी आहेत. सबब अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागाकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.४४५,दि.१९/५/१९८७ अन्वये मान्यता दिलेनुसार शासन निर्णय क्र.पीसीसी-३०८९/६४४/ सीआर-९७ नावि-२२, दि.१ डिसेंबर, १९८९ अन्वये खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.

१) सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) - ०१ पद
२) समाजविकास अधिकारी - ०१ पद

तरी महापालिका आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त अभिनामाचे ११ पदांपैकी दि. चे शासना निर्णयानुसार मंजूर असलेल्या सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास) अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून "उपआयुक्त (सामूहिक विकास)" असे करण्यास मान्यता देण्यास आणि शासनाचे दि.४ मे, २००६चे आकृतीबंधानुसार क वर्ग महापालिकांकरीता 'समाज विकास अधिकारी' पदास र.रु.८०००-१३५०० वेतनश्रेणी निश्चित केली आहे. सदरची वेतनश्रेणी आकृतीबंधातील 'सहाय्यक आयुक्त' पदाचे वेतनश्रेणीपेक्षा वरिष्ठ वेतनश्रेणी असल्यामुळे तसेच सदरची वेतनश्रेणी या महापालिकेतील 'प्रशासन अधिकारी' पदाचे समकक्ष असल्यामुळे आकृतीबंधातील वेतनश्रेणीनुसार 'समाज विकास अधिकारी' अभिनामाचे पदनाम बदलून 'सहाय्यक आयुक्त (सामूहिक विकास)' असे करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १०२ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-१/२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११ दि.२/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६७ दि.९/०७/२०१२ अन्वये.

मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील स.नं.२११ पैकी क्षेत्र जलाशय विभागाऐवजी निवासी विभागात समाविष्ट करणेकामी जाहिर नोटीशीचे अनुषंगाने ३० दिवसाचे विहित मुदतीत इकडील विभागास एकही हरकत प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरचे प्रस्तावास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी मान्यता व प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देत आहे.

मा.गणेश लोंढे :- पिंपरी चिंचवड शहरातील तलावाचे सुशोभिकरण करुन सौंदर्यात भर घालण्याऐवजी व्यापारीकरण करण्याच्या दृष्टीने मौजे वाकड येथील तलावाचे निवासी विभागात समावेश व्हावा यासाठी शासनास्तरावर मान्यता घेणेकामी पालिका सर्वसाधारण सभेत ठराव करुन विषय मंजूरीस मांडण्यात आला आहे. त्यास कॉंग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवक, नगरसेविका यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. वास्तविक मौजे वाकड येथील तलाव व त्याची जागा पुर्वी नवनगरविकास प्राधिकरणात समाविष्ट होती. प्राधिकरणाच्या डी.पी. मध्ये सुद्धा सदर जागा तलाव म्हणूनच दाखवण्यात आली होती. डी.पी. कोणताही असो, प्राधिकरणाचा असो, महापालिकेचा असो, जिल्ह्याचा असो किंवा राज्य शासनाचा असो तो सर्वांनाच लागु असतो. हा तलाव नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील जलाशय विभागाऐवजी निवासी विभागात समाविष्ट करणेकामी मनपाने ठरावाद्वारे फेरबदल करणेकामी शासनस्तरावर मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे. हा ठराव बेकायदेशीर असून महापालिका तलावाची जागा रहिवासी किंवा व्यापारी कारणासाठी सदर आरक्षण बदलू नये अशी कॉंग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवक नगरसेविकांच्या वतीने मागणी करण्यात आली आहे. शहरात तीन-तीन तलाव असून त्याचे सुशोभिकरण करुन शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचे सोडून व्यापारीकरण करत आहेत व शहरीकरणास प्रोत्साहन देण्यात येत आहे. हे सर्व चुकीचे असून सदर प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन पिंपरी चिंचवड शहरात होणाऱ्या या बेबंदशाहीच्या विरोधात दाद मागण्यात येणार आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, हा विषय ज्यावेळी सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावेळी त्याअनुषंगाने बोललो होतो. तुमचे सगळे बोलून झाल्यानंतर हा विषय या सभागृहात मंजूर करण्यात येणार आहे. खरोखर मूळ विषयाला माझा विरोध आहे. याचे सगळे महसूल पुरावे, कागदपत्रे पाहिली, याची फाईल पूर्णपणे पाहिली आहे. या महसूल पुराव्यात १९३२ पासून ७/१२ च्या उताऱ्यावर तळे अशी नोंद आहे. संपूर्ण सर्वे नंबर २११ची नोंद आहे. मागील सभेत याबद्दल बोललो आहे. अधिकाऱ्यांनी आदेश काढला त्यानुसार देवांची नावे ७/१२वर लागली आहेत. सगळा घाट प्रामुख्याने बांधकाम व्यावसायीकांसाठी घातला जातो. मुख्य प्रस्ताव महापालिकेकडून आलेला आहे. ठराव क्रमांक ८२३ दि. २०/२/२०१० कडून प्रस्ताव देण्यात आला. त्याद्वारे या प्रस्तावाच्या अनुषंगाने कारवाई करण्यात आली. परंतू सदर जागेत बांधकाम परवानगी घेत असताना बांधकाम विभागाचे अधिकारी, नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्टपणे अभिप्राय दिलेला आहे. कनिष्ठ अभियंत्यांपासून शहर अभियंत्यांपर्यंत लेखी अभिप्रायात लेखी पत्र आहे. ही जागा तलावाने बाधित असल्याने या जागेला बांधकाम परवानगी देणे उचित होणार नाही असे नमूद केलेले आहे. पूर्णपणे नमूद केलेले असतानाही सदर बांधकाम व्यावसायिकाने पत्र दिले, त्याच्या अनुषंगाने सदरचा तलाव

बाधित आहे. पूर्णपणे पाण्याने बाधित असूनही एका तलावाची जागा निवासी भागात समाविष्ट करण्याचा घाट घातला जातो आहे. जवळपास ३ हेक्टर जागा आहे. त्याचा भाव सांगणे आवश्यक नाही. संबंधित बांधकाम व्यावसायिकाला या जागेतून जवळपास २००/२५० कोटी मिळणार आहेत. यासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका सादर केलेली आहे. या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनाकडून पत्र पाहिजे. उच्च न्यायालयात याचिका सादर करताना महापालिकेने ठराव पारित केलेला आहे. महापालिकेचे आयुक्त म्हणून आपली भूमिका काय आहे? बहुमत असणाऱ्या पक्षाने ठराव मंजूर करण्यासंदर्भात त्यांची भूमिका या ठिकाणी काय आहे? सभागृहातील सर्व सदस्यांना एवढेच सांगेल एकीकडे राज्यात दुष्काळ पडला असताना पाण्याचा निचरा होऊन फक्त जावा असे धोरण ठरवत आहे. कूपनलिका, बोअरवेल यांना बंधन घालण्याचे काम शासनाने केलेले आहे. जे आहे त्याची आकारमिती भरावी. राज्य शासनाचे ठराव आहेत. नैसर्गिक तलाव भरण्याचे काम गेली ७/८ वर्षे चाललेले आहे. हा पत्रव्यवहार  प्रामुख्याने मनपा प्रशासनाला करीत आहे. तिथे थोडा पाऊन पडला असताना देखील पाणी जमा झालेले आहे. एका व्यक्तीच्या फायद्यासाठी हा खटाटोप चालला असेल तर अतिशय विरोधाची बाब आहे. प्रशासनात काम करणाऱ्या सगळ्या कनिष्ठ अभियंत्यांपासून सर्व ठराव लिहितात. या ठरावाला निवासी झोनमध्ये रुपांतरीत करण्यासाठी परवानगी देता येणार नाही. असा काय साक्षात्कार झाला जेणेकरुन तलाव पूर्णपणे नष्ट करुन बांधकाम करुन मग वैयक्तिक फायदा करण्यासंदर्भात घाट घातला जातो. बहुमताच्या जोरावर निर्णय घेतला जाईल. या ठरावाच्या विरोधात मतदान व्हावे. आमचा विरोध आहे अशी सूचना देतो. उच्च न्यायालयात सदरची बाब असल्यामुळे न्यायालयातदेखील दाखवून द्यायचे आहे. बहुमताच्या जोरावर प्रशासनदेखील चुकीच्या पद्धतीने काम करते, काम केले जाते. प्रशासनाला वाटते की, ही तलावाची जागा निवासी झोनमध्ये करण्यासंदर्भात कार्यवाही करता येणार नाही. कोणालातरी वाटते, कोणीतरी  अभिप्राय दिला म्हणून निवासी झोनमध्ये रुपांतरीत करण्यासंदर्भात हालचाल करतात. मोठ्या प्रमाणात अर्थव्यवहार झाल्याची कुणकुण कानावर येते आहे. ही तलावाने बाधित असणारी जागा तलावानेच बाधित असावी. तलाव नष्ट करु नये या भूमिकेशी मी ठाम आहे. या ठरावाला माझा विरोध आहे. तरी देखील ठराव मंजूर करत असाल तर नगरसचिवांनी सभागृहात मतदान घ्यावे.

मा.कैलास कदम :- मा.महापौर साहेब, सर्वे नंबर २११ निवासी विभागात समाविष्ट करण्यासंदर्भात महापालिका सभेने याठिकाणी प्रस्ताव सादर केला आहे. ३ दिवसांत एकही हरकत आलेली नाही ही बाब पटण्यासारखी नाही. न्यायालयीन बाब असेल तर त्या ठिकाणी मनपाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले असेल तर एकही हरकत आलेली नाही हे पटत नाही. हा विषय स्पष्टपणे नामंजूर करावा अशी मागणी आहे.

मा.अनंत कोऱ्हाळे :- मा.महापौर साहेब, मा.कैलास कदम, मा.गणेश लोंढे यांनी सांगितले, तेच मी सांगतोय. तेथे मोठा तलाव पाहिला होता. आत्ता तो मुरुमाने भरुन टाकला आहे. याच्यावर कारवाई झाली पाहीजे. ठराव नामंजूर झाला पाहीजे, याला माझा पूर्णपणे विरोध आहे.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, हा विषय पहिल्यांदा आलेला नाही. यापूर्वी हा विषय दोनदा तहकूब केलेला आहे. सगळ्यांनी बघितले असेल. इलेक्ट्रॉनीक मिडीयासमोर पालकमंत्री श्री.अजित पवार यांना काही चॅनेलवाल्यांनी, पत्रकारांनी विचारले, हा ठराव केला जातोय. तेव्हा त्यांनी स्वत:

सांगितले होते की, चुकीच्या पद्धतीने याठिकाणी कामे होणार नाहीत. तसा आदेश पदाधिकाऱ्यांना देऊ असे सांगितले असताना काय एवढा मोठ्ठा साक्षात्कार झाला, बदल झाला, बाईसाहेब फक्त मंजूर मंजूर म्हणताहेत. त्याठिकाणी स्वतःचे शब्द बदलण्यासाठी आर्थिक हित जोपासले गेले आहे. वरिष्ठांपासून सगळ्यांचा यात सहभाग आहे असा प्रश्न मनाला भेडसावतोय. आदेशाचे पालन करणार आहे. दादा चौथ्या मजल्यावरुन उडी मारा म्हटले तर मारणार का? मागील दाराने बोलणी करायला जाणार हे सुद्धा आम्हाला माहिती आहे. उच्च न्यायालयात याचिका दाखल असताना विषय मंजूरीसाठी येतो आहे. यासाठी विरोध नोंदवतो आहे. दादांच्या स्टेटमेंटच्या भावना त्यांना कळवल्या पाहिजेत.

मा.आरती चौंधे :- मा.महापौर साहेब, सर्व सदस्यांनी विरोध केलेला आहे. माझा सुद्धा या गोष्टीला पूर्ण विरोध आहे.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब,आत्ता जसा विषय आलेला आहे. याआधी असाच विषय नगररचना विभागाने केलेला आहे. भोसरी सर्वे नं.२०० तळ्यासाठी टी.डी.आर. देण्याचा विषय आलेला आहे. चुकीचा प्रस्ताव प्रशासन करत असेल तर सर्वसामान्य नागरिकांकडून काय अपेक्षा करणार. सर्वे नं.२०० मध्ये टी.डी.आर.मध्ये कोणाला इंटरेस्ट आहे म्हणून शासनाकडे पाठवतो. सर्वसामान्य माणसाने चांगले वागले पाहिजे म्हणून कशी काय अपेक्षा करतो. आम्हाला माहित आहे, ठरले आहे, करणार आहे. आम्ही विरोध सुद्धा तेवढाच ताकदीचा नोंदवणार आहोत. गटनेते श्री.श्रीरंग बारणे यांनी याचिका दाखल केलेली आहे. शिवसेना म्हणून पूर्ण पाठिंबा असणार आहे. शासनाकडे शिफारस केलेली आहे. महापालिकेने तळे बांधलेले आहे. त्याचा टी.डी.आर कसा काय मंजूर करु शकतो. शासनाकडे शिफारस कसे काय करतो. नगररचना विभागाचा आर्थिक संबंध आहे काय. मुळात असा आदेश आणला नाही पाहीजे. विरोधकांनी विरोध केला म्हणून कांगावा करावा लागणार नाही. भोसरी इथे महापालिकेने बांधलेले तळे आहे. सर्वे नं. २०० चा टी.डी.आर. निर्माण होणार आहे. शासनाकडून परत प्रस्ताव मागवावा, तुम्ही चौकशी करावी. नंतर शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात यावा.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, २/३ महिन्यांपूर्वी सभागृहात विषय आला त्यावेळी म्हटले होते, हा विषय सदस्यांनी दिलेला आहे. त्याप्रमाणे आपल्या समोर मान्यतेसाठी विषय आलेला आहे. ही मान्यता घेत असताना विषयात म्हटले आहे, ३० दिवसांत विहीत मर्यादेत एकही हरकत प्राप्त झालेली नाही. ज्या-ज्या लोकांना विरोध करावयाचा आहे. सूचना बजावण्यासाठी मदत दिलेली आहे. सूचना देण्यासाठी एकही व्यक्ती समोर आलेली नाही. त्या का आल्या नाहीत. हे शोधण्याचे काम प्रशासन किंवा सत्ताधारी पक्षाचे सुद्धा नाही. हा विषय शहराच्या हद्दीतील आहे. शहराच्या हद्दीतील विषय, झोन बदल करण्याचा विषय, हरकती सगळ्या मान्यता करत इथे आल्यानंतर उच्च न्यायालयात गेलेला आहे. विरोध करणार आहात. तुमचे काम व्यवस्थित करणार. तुम्ही विरोध करणार म्हणजे हा विषय चुकीचा आहे, हे काम चुकीचे आहे असा याचा अर्थ १००% खरा नाही. दादांनी सांगितले तर आम्ही चवथ्या काय ५०व्या मजल्यावरुन सुद्धा उडी मारु. जसे आमचे नेते आहेत तसे तुमचे सुद्धा नेते आहेत. ऐकायची सुद्धा सवय ठेवा. आम्ही करतो ती चोरी, आम्ही ८४ जण चोर आहोत. चोरी करायला सुद्धा कला लागते. तुम्ही एवढे बोलत असून सुद्धा आम्ही काही

बोललो नाही. तुम्ही सुद्धा स्थायी समितीमध्ये सदस्य होता त्यावेळी किती वेळा विरोध नोंदवला ते काढा.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, स्थायी समिती सभांचे प्रोसिडींग लिहायला चालू करा. सभा नियमाप्रमाणे प्रोसिडींग सुरु करणार का म्हणजे सांगते.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, आमच्या नेत्याचा आदर करतो आहोत, होतो आणि आदर करणार आहोत. तुमच्या नेत्याचा सुद्धा आदर आहे. आम्ही सुद्धा सुसंस्कृत आहोत. मी विषयावर बोलतो, विषयावर ऐकतो. मी पहिल्या मिटींगमध्ये सांगितले होते, हा विषय कोणी सदस्यांनी दिलेला नाही. राजकीय मनुष्याने दिलेला नाही. हा विषय बेकायदेशीर आहे का नाही हे ठरवण्याचा अधिकार हा प्रशासकीय कामकाजाचा भाग आहे. १९३२ मध्ये त्या-त्या वेळचे पेपर आपण दाखवले पुरावा म्हणून मा.न्यायालयात सादर करावे. सभागृहाचे जे अधिकार आहेत. त्या नियमानुसार काम करतो. त्यानुसार काम चालणार. त्यानुसार आज विषय मंजूर होणार. ज्या-ज्या लोकांना गौडबंगाल वाटते, त्या-त्या लोकांना मत मांडायचा अधिकार आहे तो आपण शंभर टक्के पार पाडावा. याअनुषंगाने विषय तुमच्यासमोर आणून देतोय. ताथवडे, रावेत, किवळे असेल, नवीन गावे समाविष्ट केली. काही भाग रहीवासी करण्याचे काम केलेले आहे. आत्ता सुद्धा रेसिडेन्शियल झोनमध्ये नाही तिथे आपल्या पक्षाचे नगरसेवक आहेत, इतर पक्षातील आहेत. त्या भागातील लोकांचा प्रस्ताव होता की, रेसिडेन्शियल झोनमध्ये बदल करा. मंजूरी अशी आली तेव्हा आपण येथे असेच मानणार का. यांनी सांगितले म्हणून विरोध करणार. स्थानिक परिस्थिती, त्या जागेचा मालक एक आहे का शंभर आहेत. उच्च न्यायालयात गेले तर त्यांना या पूर्ण प्रकरणाची माहिती आहे. जेव्हा सामूहिक चर्चा करतो, तेव्हा विरोधाचे प्रमाण वाढत असते. न्यायालयीन प्रकरण असल्यामुळे विरोध वाढला. जास्तीत जास्त विरोध होतो आहे, ही नैसर्गिक वृत्ती आहे. माझी सुद्धा मान्यता आहे. प्रस्ताव कोणतेही पडतात, कायद्याचे उल्लंघन होईल अशी वेळी प्रशासनाला सुद्धा काम करूच देणार आहे. सत्ताधारी पक्षाचा जबाबदार नगरसेवक म्हणून सांगतो. या विषयाला सपोर्ट करण्याचा हेतू केवळ इतका आहे, त्याठिकाणी पुरावा काय आहे मला माहित नाही. मला लहानपणी चांगले आठवते, दगडांची खाण होती, पाणी साठत होते. तेथे नैसर्गिक झरा नाही. मा.विलास नांदगुडे यांना सुद्धा माहिती आहे. त्याभागात वस्ती करणाऱ्या लोकांना माहित आहे. मा.संपत पवार, मा.श्रीरंग बारणे यांना माहिती आहे. त्या परिसरातल्या बऱ्याचशा लोकांना माहित आहे. परिस्थिती काय आहे. नैसर्गिक येणारे पाणी, खोदाई खड्डा खोल असल्यामुळे साठायचे. त्यामुळे तळे अशी नोंद झाली. हे सिद्ध करुन दाखवावे लागेल. कागदोपत्री बदल झाला, तो शोध घेतल्यानंतर तुमच्या आमच्यासमोर येणार आहे. प्रशासकीय कामकाज करुन निर्णय घेण्याची वेळ आजची आहे. याचा निर्णय घेतला पाहीजे. जवळपास २ महिने विषय तहकूब ठेवला आहे. खरोखर त्यात काय आहे का, खरोखर पाण्याच्या खड्ड्याचा तलाव झाला आहे. त्यामुळे हा विषय मंजूर करावा, तहकूब करु नये. करतो काय हे मला कळत नाही ज्याचे काम तो करतो. आम्ही स्वतः जी कामे करायची त्यासाठी मुकत आहोत. तुम्हाला आम्हाला धोरणाला समान अधिकारानुसार हा विषय कायदेशीररित्या तुमच्या आमच्या समोर जसा आलेला आहे तसा मंजूर करावा अशी विनंती करतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, खरेतर मा.प्रशांत शितोळे यांनी सांगितले की हा विषय प्रशासनाकडून आलेला आहे. या संदर्भात खुलासा करायचा आहे. मुळात क प्रभागात मा.एकनाथ मोटे सुचक व मा.राजेंद्र काटे अनुमोदक यांनी झोन बदलीबाबतचा ठराव आणला आहे. सर्वे क्रमांक ७७६ हा निवासी झोन करण्याबाबत ठराव होता. मा.प्रशांत शितोळे यांनी या ठरावाला उपसूचना दिली. मा.गणेश भोंडवे यांनी यातून वाकड येथील नियोजन नियंत्रणाखाली असलेल्या क्षेत्राखाली सर्वे नं.२११ ची जमिन मंजूर विकास योजनेत जलक्षेत्र बाजूत सुचवलेली होती. तेथे काही निर्णयाला येऊन मा.प्रशांत शितोळे यांनी अनुमोदन दिलेले आहे. इथून पुढे प्रशासनाची कागदे फिरायला लागली. सदस्य प्रस्ताव आहे. यासंदर्भात संबंधित बांधकाम व्यावसायिकाने त्यावर्षी महापालिकेला पत्र दिले होते. दि.२९/१/२००८ रोजी पत्र दिले. त्यानंतर आपल्या बांधकाम परवानगी विभागाने पत्र लिहीले होते. पूर्ण पत्र वाचून दाखवतो. (पत्राचे वाचन केले.) सदरच्या बांधकाम व्यावसायिकाने त्याच्या जागेला लागून परवानगी मागितली त्यावेळी स्पष्ट लिहीले होते, “सदरचा भाग तलाव बाधित आहे. उर्वरीत भागाकरिता बांधकाम परवानगी द्यावी.” त्यामुळे प्रस्तूत जागेवर मागणी केल्यानुसार व्यापारी उद्दीष्टाने बांधकाम परवानगी दिली. कायद्यानुसार करण्याची शक्यता आहे. यापूर्वी दिलेल्या बांधकाम परवानगीबाबत जनसामान्यांच्या मनात साशंकता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नगररचना विभागाचे पत्र सुद्धा त्याच पद्धतीचे आहे. अशा प्रकारची परवानगी देता येणार आहे. या सभागृहात बहुमताच्या जोरावर ठराव मंजूर करणार असला तरी, चुकीच्या पद्धतीने कारभार करणार असला तरी पावसाचे नैसर्गिक पाणी जमा होते आहे. सदरच्या भूगर्भात नैसर्गिक पाणी जाऊन पाण्याची पातळी वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. कोणाचे भले होत असेल, चांगल्यासाठी असा प्रकारचे कृत्य करत असेल तर १९९५ मध्ये डी.पी. झाला ते वेडे होते. त्यांनी तळे असे नाव का ठेवले. संपूर्ण भाग तलाव बाधीत आहे. तिथे तळे राहणे गरजेचे आहे. वादविवाद घालायचा नाही. कोण कोणाच्यासाठी काम करतोय. सर्वांना आक्षेप आहे. जे बोलतात त्यांना सुद्धा आक्षेप आहे. यात आम्ही मागणी केली, मतदान व्हावे. नियमानुसार जी मागणी आहे, ती केलेली आहे. ठराव होत असताना मतदान व्हावे. विरोध नोंदवून यात वाईट वाटण्याचे कारण काहीच नाही. खोलात घुसायचे नाही. सभागृहात चुकीच्या पद्धतीने कारभार करताय. तो मात्र चुकीचा होतो आहे. वॉटरबॉडी नष्ट होऊ नये. भविष्यात या संदर्भात काय प्रश्न उपस्थित होणार आहे. म्हणून या संदर्भात मतदान घ्यावे अशी मागणी करतो.

मा.राजेंद्र जगताप :- मा.महापौर साहेब, त्या ठिकाणी पाहिले तर बरेचशे सदस्य त्या परिसरात बऱ्याच वेळा फिरलेले आहेत. संपूर्ण माळरान मोकळे आहे. त्याठिकाणी २१४ फूट खड्डा असेल पाणी साचत होते. पुण्यावरुन रस्ता येत होता. त्याठिकाणी दगड लावून पाणी तुंबवले. पुण्यातून येत असताना पाणी अडवून एकाने तिथे माशाचे उत्पन्न चालू केले होते. बरीच वर्षे त्या ठिकाणी तो व्यवसाय करीत होता. व्यवसाय केल्यानंतर तिथे त्याला वाकडचे तळे असे नाव पडले. बरीच वर्षे माशांचा व्यवसाय करुन त्या गृहस्थाने काहीतरी केले असेल. औंध-रावेत रस्ता खूप उंच आलेला आहे. त्याठिकाणी पाणी साचलेले दिसते आहे. त्याठिकाणी तळे आहे असे आपण म्हणतोय. माशांचा व्यवसाय करत होता. माशांचे उत्पादन होत असताना जास्तीत जास्त व्यवसाय करुन त्यावेळी जास्तीत जास्त वापर होता नंतर सगळे बंद पडलेले आहे. आत्ता तेथे तळे सुद्धा नाही.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, हा विषय त्याच अनुषंगाने बरीच चर्चा झाली आहे. मुळात काही प्रमाणात हा प्राधिकरणाचा भाग आहे. १९९५ मध्ये प्राधिकरणाने डी.पी. मंजूर केला. १९९७ ला आपल्याकडे आला. ब्ल्यू असे दाखवलेले आहे. या मताशी आम्ही सुद्धा सहमत आहोत. प्रत्यक्षात मागणी केली गेली. बांधकाम परवानगी विभागाने नकार दिला. पूर्वीचा कलर बघत दिलेला आहे. संबंधित कोण आहे त्याने आयुक्तांना विनंती केली. समक्ष पाहून केले त्यावेळी श्री.दिलीप बंड यांना स्वतः तिथे जाऊन पाहून गेले. अहवाल दिला त्यांनी म्हटले तलाव काही नाही. डी.पी.मध्ये अनेकवेळा दाखवतात, मुळात तिथे वेगळे असते. रस्त्याच्या बाबतीत असे असते. घरे झालेली होती, टाऊन प्लॅनिंग विभागाने रस्ता टाकलेला आहे असे निदर्शनास येते. कर्नल लोखंडे माजी सैनिक यांनी घर बांधलेले आहे. प्रस्तावित डी.पी. नुसार त्यांच्या घरावरुन रस्ता जातो. नेटके ताईंना असेच दाखवलेले आहे. EWS मधून डिलिट केलेला भाग बिल्डर घशात टाकणार आहे. खऱ्या अर्थाने गोरगरीबांची घरे आहेत, तिथे आरक्षण पडणार आहे. असे व्हावे असे म्हणत नाही. अशी चूक होते. उपसूचनेद्वारे विषय आला असेल असे विषय आहेत. असे असताना सुद्धा परमिशन द्या. बिल्डींग परमिशन विभागाने परमिशन दिलेली नाही. नगररचना मॉडीफीकेशन झाल्याशिवाय मान्यता देणार नाही असे स्पष्ट सांगितल्यानंतर स्थायी समितीमध्ये मंजूर झाले असले तरी २०१० मध्ये अटी मागितल्या. त्याचवेळेला महापालिका सभेत ठराव होत असताना कायम करण्याचा प्रयत्न न पाहता शासनाकडे पाठवावे. असे असते तरी दिलेल्या विहीत मुदतीत प्रशासनाने त्यांचे काम केलेले आहे. सूचना पाठवाव्यात, येथे हरकती/सूचनांसाठी पाठवलेले होते. त्यात कोणीही हरकत घेतलेली नाही. उच्च न्यायालयाकडून जो निर्णय होईल तो सर्वांना बंधनकारक असणार आहे. उच्च न्यायालयाने स्टेटसक्यू दिलेला आहे. नाहीतर निर्णय घेण्यासाठी आज आपण ओपन आहोत. यात मान्यता दिल्यानंतर सूचना/हरकती येतात. कोणी हरकती घेतल्या नाहीत. आयुक्तांनी त्यावेळीच पाहून करुन अहवाल दिलेला आहे. आयुक्त त्यांचा अभिप्राय शासनाला देतील. शासन अंतिम निर्णय देणार आहे. त्याची दखल घेतलीय. नेत्यांची नावे घेतली जातात. आजपर्यंत मा.अजित पवार यांनी महापालिकेच्या कामात ढवळाढवळ केलेली नाही, हस्तक्षेप केलेला नाही. हा निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे. ही चर्चा न करता विरोधकांनी मतदानाची मागणी केली आहे. त्यांचा हक्क आहे. त्याद्वारे विषय मंजूर करावा. त्याअनुषंगाने विषय मतदानास टाकावा.

यानंतर मा.प्र.नगरसचिव यांनी मा.महापौर यांचे सूचनेनुसार प्रस्तावाच्या बाजूने व प्रस्तावाच्या विरोधात सदस्यांना हात वर करुन मत नोंदवण्यास सांगितले.

मा.महापौर :- प्रस्तावाच्या बाजूने ५९ व प्रस्तावाच्या विरोधात २० अशी मते नोंदवण्यात आली असून त्यानुसार बहुमताने हा विषय मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

अनुकूल-५९ प्रतिकूल- २०

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ११

दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८ दि.१६/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७० दि.९/०७/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकास योजनेव्यतिरिक्त कलम २०५ नुसार घोषित केलेल्या सध्या बाधीत मिळकत धारकांना एफ.एस.आय. देणेत येतो. परंतु सदर बाधीत मिळकत धारकांना सदर जागेचा टी.डी.आर. देण्यात यावा. सदर बाधीत जागेचा फक्त एफ.एस.आय. न देता टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.रामदास बोकड :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, या विषयाला विरोध नाही. कलम २०५ नुसार घोषित केलेल्या विकसित रस्त्यांच्या जागांचे संपादन करताना टीडीआर स्वरुपात मोबदला अदा करावयाची तरतूद करण्यासाठी MRTP Actच्या कलम ३७ची कार्यवाही करण्यास मंजूरी देण्याचा विषय सभागृहासमोर आहे. विषयाला माझा विरोध नाही. परंतु सदर विषय करण्यामध्ये काही कायदेशीर त्रुटी आहेत त्या आपण समजून घेतल्या पाहिजे. केवळ काही सदस्यांच्या हट्टापोटी किंवा संख्याबळाच्या जोरावर विषय मंजूर केला तरी त्याला शासनाची मान्यता मिळत नसल्याने कलम ३७चे अनेक फेरबदल प्रलंबित आहेत. MRTP Act च्या कलम १२५ प्रमाणे Regional Plan, Development Plan किंवा Town Planning Plan च्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेली जमीन ही Land Acquisition Act १८९४ च्या अर्थानुसार सार्वजनिक प्रयोजनांसाठी आवश्यक असलेली जमिन आहे असे मानले जाते. तसेच MRTP Act च्या कलम १२५ प्रमाणे निश्चित झालेल्या समाजोपयोगी आरक्षणांना ताब्यात घेण्याची कायदेशीर तरतूद MRTP Act च्या कलम १२६ मध्ये करण्यात आलेली आहे. कलम १२६ अन्वये ज्या आरक्षणांचे / रस्त्यांचे क्षेत्राचे संपादन करावयाचे आहे. अशा प्रकरणीच मोबदल्याच्या स्वरुपात टीडीआर अनुज्ञेय करता येतो. BPMC Act च्या कलम २०५ नुसार घोषित केलेल्या रस्त्यांच्या जागेचे संपादन करण्याचा अधिकारी BPMC Act च्या कलम २०९ नुसार प्राप्त होतो व असे संपादन आयुक्तांना BPMC Act च्या कलम ७७,७८ व ७९ च्या अधिन राहूनच करता येते. BPMC Act च्या कलम २०५ नुसार घोषित केलेल्या रस्त्यांच्या जागेचे संपादन करणेकामीच्या कलम २०९, ७७, ७८ व ७९ मध्ये टीडीआर स्वरुपात मोबदला अदा करावयाची तरतूद नाही. त्यामुळे कलम २०५ नुसार घोषित केलेल्या रस्त्यांना टीडीआर स्वरुपात मोबदला अदा करावयाची कायदेशीर अडचण ही केवळ BPMC Act मध्ये फेरबदल केल्यासच दूर होऊ शकते आणि BPMC Act मध्ये फेरबदल

करण्याचा अधिकार हा राज्य शासनाचा असल्याने सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत यावा. विषयाला अनुमोदन असले तरी आयुक्तांना त्यांचे विशेष अधिकार याठिकाणी वापरावे लागतील.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, टी.डी.आर. बद्दल बोलावयाचे आहे. शहर सुधारणा समिती स्थापन केली त्यावेळी पुण्याच्या धर्तीवर शहर सुधारणा समिती आपल्याकडे स्थापन करण्यात आली आहे. याची स्थापना करत असताना त्याच्या पूर्ण पॉवर्स काढून घेण्यात आल्या. या समितीचे पूर्वीचे नाव झोपडपट्टी पुनर्वसन समिती असे होते. नगररचना विभागाकडून असे सांगण्यात आले आहे की, कलम ३७ नुसार येणार नाही. टीडीआरबद्दल चर्चा झाली. फक्त अधिकार लागतो, कमिटी आहे. मॅटरसाठी भदाणे मॅडम यांनी सांगितले, MRTP Act खाली आयुक्तांना अधिकार असतात, ते स्वतः अकोमोडेट करतात. MRTP Act प्रमाणे केलेले आहे. आपण BPMC प्रमाणे जातो. म्हणजे BPMC Act मॅडमनी समजून घेतला नाही. टीडीआरच्या विषयात अनेक ठिकाणी फाईल अडवतात. ३/४ महिने घेतात नंतर आयुक्तांकडे काम असते. अधिकारी दिवसभरात उठतात, घरीसुद्धा फाईली घेऊन जाऊन त्यांना काम करावे लागते. या कमिटीत लोकप्रतिनिधी का नाही. MRTP Act प्रमाणे या कमिटीत पारदर्शक कारभारासाठी नियम करु. यात उपमहापौर, पक्षनेते श्री.योगेश बहल सारखे माझ्या सारखे सिनिअर नगरसेवक अशा २/३ नगरसेवकांना घ्या. नवीन नगरसेवकांना घ्यायला हरकत नाही. कमिश्नर मान्य करण्यास तयार नाही. स्पेशल इनव्हायटी म्हणून बोलवावे काय हरकत नाही. आयुक्तांना अधिकार आहेत. ही ब्युरोक्रसी कामे करताना आम्ही सांगू शकतो, टीडीआरमध्ये काही घोळ नाही. ठिक आहे काम करणारे फाईल पुटअप करताना आयुक्तांनी शहर सुधारणा समितीमार्फत जाऊ द्यावे. कमीत-कमी कमिटीला पाठवावे. नगररचना विभागाने टीडीआरच्या मान्यतेसाठी, अवलोकनासाठी पाठवायला हरकत नाही. ते सुद्धा नाही म्हणाले, असे का म्हणतात. हे मला आत्तापर्यंत समजलेले नाही की, आपण BPMC Act प्रमाणे काम करतो, नगररचना विभागात MRTP Act प्रमाणे कामे केली जातात. BPMC Act प्रमाणे कारभार करण्यासाठी यांचा सुद्धा सहभाग करुन घेतला पाहीजे अशी सूचना करु इच्छितो. इलेक्टेड रिप्रेझेंटेटिव्ह इनवॉल्व्ह नाही. कमिटीने पास केलेल्या ठरावालासुद्धा विरोध करण्याचा आपल्याला अधिकार आहे.

मा.विलास नांदगुडे :- मा.महापौर साहेब, हा विषय प्रशासनाने आणला आहे. ॲक्टमध्ये आहे ते केले गेले आहे. कलम २०५ खाली रस्ते टाकतात. FSI देतो. TDR देऊ शकत नाही. फक्त ५ गुंठे जागा असेल तर संपूर्ण जागा २०५च्या रेटमध्ये गेली. नियमाप्रमाणे म्हणालात तर फक्त याचा FSI घ्या. त्या सभासदाला FSI घेता येऊ शकत नाही. त्या ठिकाणी जागा शिल्लक राहत नाही. २०५ खाली रोड टाकला तर FSI देतो. तेथे TDR टाकला पाहीजे. प्रशासन हा विषय मांडत नाही म्हणून सदस्यांच्या माध्यमातून विषय मांडत आहे. २०५ प्रमाणे काही प्रमाणात आत्तापर्यंत १२५ रोडची अ,ब,क,ड चारही प्रभागांत आरक्षणे टाकली आहेत. ५१ रोड झालेले आहेत. त्याचा मोबदला २% लोकांनी सुद्धा घेतलेला नाही, घेता आलेला नाही. यात TDR दिला, निश्चितच याचा उपयोग होईल. डेव्हलपमेंटच्या दृष्टीकोणातून फायदा होईल. रोड ताबडतोब ताब्यात येतील. डेव्हलपमेंटसाठी मोठा उपयोग होईल म्हणून विनंती आहे. हा विषय मंजूर करावा.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, हा विषय २०५ खाली रस्ते विकासात घेतो. त्याचा आपण आर्थिक स्वरुपात किंवा FSI स्वरुपात मोबदला देतो. TDR देत नाही. त्याअनुषंगाने प्रस्ताव मांडला आहे. खरेतर आपण अशा पद्धतीने २०५ खाली विकसित जागेचा TDR दिला. इथे मोठ्या प्रमाणात रस्ते विकसित करता येतील. शहराच्या विकासासाठी हातभार लागेल. महापालिकेला आर्थिक बोजा सहन करावा लागतो. तो नक्कीच कमी होईल. या अनुषंगाने सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, मागिल वर्षी BRT खाली १० ते १२ रस्ते विकसित केले होते. त्याच्यालगतच्या प्रॉपर्टीचा मूळ FSI होता. आत्ता .४ टीडीआर देत आहोत. BRT खाली रस्ता विकसित केला. १+.४+.४+.२ असा २ FSI देण्याचा निर्णय घेतला. त्या ठरावानुसार १ FSI देतोय. १.४ मोजणार. त्यात .६ वाढणार आहे. त्यात चूक झाली. अख्ख्या एका टीडीआरवर प्रिमिअम लावण्यात आला. त्या प्लॉटधारकावर अन्याय झाला. जास्त प्रिमियम चार्ज केला होता. मागिल काळात ठराव करुन आमचा जो विषय शासनाकडे ठराव पाठवला आहे, शासनाच्या माध्यमातून लवकरात लवकर करुन घेणे गरजेचे आहे. BRT चे १२ रस्ते विकसित केले. मोजणी करुन १० ते १२ प्लॅन मंजूर झाले आहेत. इतर जागा मालकांना प्लॅन सँक्शन करता येत नाही. नियमात,व्यवस्थेत बदल केला नाहीतर लोक अनधिकृत बांधकामे करतील. शहरात बकालपणा निर्माण होणार. शहर चांगल्या पद्धतीने विकसित व्हावे म्हणून बांधकाम परवानगीचे नियम सुटसुटीत व्हावेत म्हणून बदलता यावेत. १.४ व .४ FSI होता त्याला कोणत्याही प्रकारचा प्रिमियम लावू नये अशी उपसूचना आहे. मी खालीलप्रमाणे उपसूचना देतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजना नकाशा मधील बी.आर.टी. रस्त्यांच्या दोन्ही बाजूस १०० मी. अंतरापर्यंत बी.आर.टी. कॉरीडॉर ठेवणे व त्या अनुषंगाने लागु करावयाच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीमध्ये फेरबदल प्रस्तावास, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.टिपीएस-१८०९/४/प्र.क्र.१६५२/०९/नावि-१३ दि.३/३/२०१० नुसार मान्यता मिळालेली आहे. यामध्ये भूखंड क्षेत्राच्या ८०% टिडीआर वापरास परवानगी मिळालेली आहे. परंतू प्रिमीअम आकारतांना संपूर्ण ८०% वापरावर लागू होतो. वास्तविकपणे ४०% टिडीआर वापर संपूर्ण महापालिका क्षेत्रात वापरास अनुमती आहे. त्यामुळे बीआरटी कॉरीडॉरमध्ये मुळ ४०% टीडीआर वापरासाठी प्रिमिअम आकारणे अन्यायकारक आहे. महापालिका क्षेत्रात पूररेषा, रेडझोन बफर झोन यामुळे महापालिकेच्या एकूण १७१ चौ.की.मी. क्षेत्रापैकी सुमारे ३० ते ४०% क्षेत्रामध्ये विकास खुंटला आहे. अशा मध्येच बीआरटी कॉरीडॉरचे प्रिमिअम आकारुन सर्वसामान्यांना याचा भूर्दंड सोसावा लागत आहे. निवासी फ्लॅट सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असून नुकतीच महापालिकेने अनाधिकृत बांधकामे पाडण्यास कारवाई सुरु केलेली आहे. त्यामुळे वरील सर्व अडचणीच्या परिस्थितीचा विचार करता बीआरटी कॉरीडॉरमध्ये आकारण्यात येणारा प्रिमिअम वाढीव ४०% टिडीआर वापरा पूरताच लागू करावा व मुळ ४०% वापरावरील प्रिमिअम संपूर्ण महापालिका क्षेत्रातील नियमाप्रमाणेच लागू नसल्यामुळे आकारु नये यास मान्यता देणेत येत आहे. यापूर्वीच्या ठरावामध्ये दुरुस्ती करण्यात यावी व म.प्रा.व.न.र. अधि.१९६६चे कलम ३७ नुसार कार्यवाही करुन हरकती व सूचनांवर कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास पाठविणेचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यास मान्यता देणेत यावी. त्याप्रमाणे ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करण्यासही मान्यता देणेत यावी.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- १०३ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८ दि.१६/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७० दि.९/०७/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकास योजनेव्यतिरिक्त कलम २०५ नुसार घोषित केलेल्या सध्या बाधीत मिळकत धारकांना एफ.एस.आय. देणेत येतो. परंतु सदर बाधीत मिळकत धारकांना सदर जागेचा टी.डी.आर. देण्यात यावा. सदर बाधीत जागेचा फक्त एफ.एस.आय. न देता टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजना नकाशा मधील बी.आर.टी. रस्त्यांच्या दोन्ही बाजूस १०० मी. अंतरापर्यंत बी.आर.टी. कॉरीडॉर ठेवणे व त्या अनुषंगाने लागु करावयाच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीमध्ये फेरबदल प्रस्तावास, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.टिपीएस-१८०९/४/प्र.क्र.१६५२/०९/नावि-१३ दि.३/३/२०१० नुसार मान्यता मिळालेली आहे. यामध्ये भूखंड क्षेत्राच्या ८०% टिडीआर वापरास परवानगी मिळालेली आहे. परंतू प्रिमीअम आकारतांना संपूर्ण ८०% वापरावर लागू होतो. वास्तविकपणे ४०% टिडीआर वापर संपूर्ण महापालिका क्षेत्रात वापरास अनुमती आहे. त्यामुळे बीआरटी कॉरीडॉरमध्ये मुळ ४०% टीडीआर वापरासाठी प्रिमिअम आकारणे अन्यायकारक आहे. महापालिका क्षेत्रात पूररेषा, रेडझोन बफर झोन यामुळे महापालिकेच्या एकूण १७१ चौ.की.मी. क्षेत्रापैकी सुमारे ३० ते ४०% क्षेत्रामध्ये विकास खुंटला आहे. अशा मध्येच बीआरटी कॉरीडॉरचे प्रिमिअम आकारुन सर्वसामान्यांना याचा भूर्दंड सोसावा लागत आहे. निवासी फ्लॅट सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असून नुकतीच महापालिकेने अनाधिकृत बांधकामे पाडण्यास कारवाई सुरु केलेली आहे. त्यामुळे वरील सर्व अडचणीच्या परिस्थितीचा विचार करता बीआरटी कॉरीडॉरमध्ये आकारण्यात येणारा प्रिमिअम वाढीव ४०% टिडीआर वापरा पूरताच लागू करावा व मुळ ४०% वापरावरील प्रिमिअम संपूर्ण महापालिका क्षेत्रातील नियमाप्रमाणेच लागू नसल्यामुळे आकारु नये यास मान्यता देणेत येत आहे. यापूर्वीच्या ठरावामध्ये दुरुस्ती करण्यात यावी व म.प्रा.व.न.र. अधि.१९६६चे कलम ३७ नुसार कार्यवाही करुन हरकती व सूचनांवर कार्यवाही करुन प्रस्ताव शासनास पाठविणेचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यास मान्यता देणेत येत आहे. त्याप्रमाणे ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करण्यासही मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.निलेश पांढारकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १०४ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१९ दि.१६/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७१ दि.९/०७/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रस्ता व आरक्षणे ताब्यात घेऊन खाजगी जागामालकांच्या मिळकतीवर विकास कामे केली आहेत.सदर जागांचे रितसर भूसंपादन करण्यात आलेले आहे व अवॉर्ड सुध्दा जाहीर झालेले आहे. परंतु ज्या जागामालकांनी त्याचा मोबदला भूसंपादनाने घेतलेला नाही अशा सर्व बाधीत मिळकतींना टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा. यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शेखर ओव्हाळ :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. नारायण बहिरवाडे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२७ दि. १९/६/२०१२

पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ४५.०० मीटर रुंद रस्ता चिंचवड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांच्या रेखांकनामधील सार्वजनिक / निम सार्वजनिक (Public Semipublic) या भूखंडावर प्रस्तावित आहे. परंतु या भूखंडावर साधारण सन १९५० पासून लिंगायत समाजाची दफन भूमी अस्तित्वात आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरात लिंगायत समाजाची लोकसंख्या बरीच असून पिंपरी चिंचवड शहरात या समाजाची ही एकमेव दफन भूमी आहे. तरी वरील बाबींचा विचार होऊन पिंपरी चिंचवड येथील लिंगायत समाजाच्या भावना न

दुखावता शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या रेखांकनामधील चिंचवड स.नं. २२१ मधील  सार्वजनिक व निमसार्वजनिक या भूखंडावरील ४५.०० मी. रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र लगत उपलब्ध असलेल्या जागेतून मिळावे तो पर्यंत सदर भूखंडावर कोणतेही काम करण्यात येऊ नये यास मान्यता देणेत येत आहे.

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.नारायण बहिरवाडे :- मा.महापौर साहेब, सदरची जागा पूर्वी MIDC ची होती. सरकारी आरक्षण होते. गेली ५० वर्षांपासून पिंपरी चिंचवडमध्ये राहणारा लिंगायत समाज या जागेचा दफनभूमी म्हणून वापर करीत आहे. तत्कालिन आयुक्त प्रविणसिंग परदेशी, तत्कालिन महापौर प्रकाश रेवाळे, मा.श्री.श्रीरंग बारणे यांनी सदरची जागा  लिंगायत समाजाला द्यावी असा ठराव केला होता. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडत आहे - लिंगायत दफनभुमी ४५ मीटर रस्ता प्रस्तावित असल्याने जेवढे क्षेत्र बाधीत होत आहे. तेवढे क्षेत्र लगतच्या प्लॉटमधून मिळू शकते. त्यासाठी प्रयत्न सुरु आहे. जोपर्यंत प्रत्यक्ष जागा ताब्यात मिळत नाही तोपर्यंत सदर दफनभुमीमध्ये काम करु नये, इतर ठिकाणी काम सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.निलेश पांढारकर  :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- १०५ विषय क्रमांक :- १३
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. नारायण बहिरवाडे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२७ दि. १९/६/२०१२

पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ४५.०० मीटर रुंद रस्ता चिंचवड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांच्या रेखांकनामधील सार्वजनिक /निम सार्वजनिक (Public Semipublic) या भूखंडावर प्रस्तावित आहे.  परंतु या भूखंडावर साधारण सन १९५० पासून लिंगायत समाजाची दफन भूमी अस्तित्वात आहे.  तसेच पिंपरी चिंचवड शहरात लिंगायत समाजाची लोकसंख्या बरीच असून पिंपरी चिंचवड शहरात या समाजाची ही एकमेव दफन भूमी आहे. तरी वरील बाबींचा विचार होऊन पिंपरी चिंचवड येथील लिंगायत समाजाच्या भावना न दुखावता शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या रेखांकनामधील चिंचवड स.नं.२२१ मधील सार्वजनिक व निमसार्वजनिक या भूखंडावरील ४५.०० मी. रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र लगत उपलब्ध असलेल्या जागेतून मिळावे तो पर्यंत सदर भूखंडावर कोणतेही काम करण्यात येऊ नये यास मान्यता देणेत येत येत आहे. तसेच लिंगायत दफनभुमी ४५

मीटर रस्ता प्रस्तावित असल्याने जेवढे क्षेत्र बाधीत होत आहे. तेवढे क्षेत्र लगतच्या प्लॉटमधून मिळू शकते. त्यासाठी प्रयत्न सुरु आहे. जोपर्यंत प्रत्यक्ष जागा ताब्यात मिळत नाही तोपर्यंत सदर दफनभुमीमध्ये काम करु नये, इतर ठिकाणी काम सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.सुजाता पालांडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक :- १४
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२८ दि. १९/६/२०१२

कासारवाडी येथे भाजी मंडईचे आरक्षणामध्ये इमारत विकसित केलेली आहे. परंतु सद्यस्थितीत जागेवर सदर इमारतीमध्ये दवाखाना, करसंकलन कार्यालय, ग्रंथालय इ. वापर सुरु आहे. सदर भाजीमंडई आरक्षणातील विकसित केलेल्या इमारतीमध्ये भाजी विक्रेत्यांचा प्रतिसाद न मिळाल्याने सदर ठिकाणी मनपाने दवाखाना सुरु केलेला आहे. सदर परिसरात भाजी विक्रेते हे जवळच रेल्वे लाईनलगत असलेल्या वाहनतळाच्या जागेत बसून भाजी विकतात. त्यामुळे वाहनतळाच्या आरक्षणऐवजी सदर ठिकाणी भाजीमंडई विकसित केल्यास भाजीविक्रेत्यांच्या सोईचे होईल तसेच महापालिकेसही त्यापासून उत्पन्न मिळू शकेल. तरी त्याप्रमाणे आरक्षण वापरात बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.माया बारणे :- मा.महापौर साहेब, सदर विषयाला अनुमोदन आहे.

मा.किरण मोटे :- हा विषय फेटाळण्यात यावा.

मा.आशा शेंडगे :- मा.महापौर साहेब,कासारवाडी भाजी मंडईचा खरा विषय बदलणार मंजूर होणार. या गोष्टीचे कारण काय. नक्की विषय बदलण्यासारखा नाही. दुसरी बाजू अशी की, मंडई बांधून झाली आहे. जागा चुकीची निवडली गेली आहे. वाहनतळाचे आरक्षण आहे, तिथे भाजी मंडईचे आरक्षण केलेले आहे. अभ्यास न करता विषय मांडला तर त्यात काहीच मजा नाही. तिथून रेल्वे गेलीतर अवस्था पाहू शकाल. दोन्ही ठिकाणी इमारत बांधली आहे. काय कारवाई चालू आहे. कोणकोणत्या गोष्टी चालतात. आरक्षण बदलायचे म्हणून बदलायचे असेल तर संख्याबळाच्या

जोरावर काही करु शकत नाही. गांभिर्याने चर्चा करा. रेल्वेगेटच्या बाजूनेच भाजी विकायला बसतात, त्यामुळे वाहनांची कोंडी होते. यावर योग्य विचार करुन निर्णय घ्यावा असे निश्चित वाटते.

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब,सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. कासारवाडी इथे रेल्वेलगतची जागा भाजी मंडईसाठी असून आरक्षणावर वर्क ऑर्डर होऊन काम चालू आहे. सदर आरक्षण भाजी मंडईचे १,००० स्क्वे. मीटर आहे. तिथे मा.आशा शेंडगे यांची मागणी आहे. वाहनतळाचे आरक्षण आहे तिथे अशाच पद्धतीने परत एकदा चूक व्हायला नको म्हणून १२ मीटरचे दोन रस्ते जातात. १,००० स्क्वे. मीटरचा आरक्षण एरिया असल्यामुळे जास्तीत जास्त लोकांना तिथे जागा देता येईल. आपल्याकडे १००% आरक्षण ताब्यात आहे का? त्याच्यावर अतिक्रमण झाले आहे का? वाहनतळासाठी म्हणून हा विषय आणला आहे.

मा.किरण मोटे :- मा.महापौर साहेब, सदर विषय तहकूब ठेवणेत यावा.

मा.संदिप चिंचवडे :- सदर सूचनेला अनुमोदन आहे.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, निर्णय काहीही घ्या पण नगरसेवक नवीन असेल त्याने बोलायचे नाही का?

मा.धनंजय आल्हाट :- मा.महापौर साहेब, जनतेच्या हितासाठी जनतेचे प्रश्न झाले पाहीजेत.

मा.निलेश बारणे :- मा.महापौर साहेब, सभासदांच्या मतांचा आदर करत नसेल तर बॉयकॉट करा.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, तुम्हाला वाटत असेल तर बॉयकॉट करा.

(सभागृहात गोंधळ)

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- १०६ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२८ दि. १९/६/२०१२

विषय क्रमांक १४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- १०७ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२९ दि. १९/६/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनेक सर्वसामान्य नागरिकांनी स्वतंत्र घरे बांधली आहेत व उद्योगनगरीमध्ये या नागरिकांनी अर्धा गुंठा, एक गुंठा, दिड गुंठा, दोन गुंठे इतक्या जागेत घरे बांधली आहेत. मनपाने या जागांवर सध्या अस्तित्वात असणा-या देय निर्देशंका व्यतिरिक्त जागेच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट निर्देशांक देणेत यावा व इतर नियमांमध्ये आवश्यक त्याप्रमाणे बदल करावा जेणेकरुन शहरातील अनाधिकृत बांधकामांना आळा बसेल, शहरातील मुलभूत सुविधा यामधे पाणीपुरवठा, विद्युत, ड्रेनेज, आरोग्य या सुविधांवर येणारा ताण कमी होईल. त्यामुळे सदर प्रस्तावाबाबत मनपाचा धोरणात्मक निर्णय घेवून शहरातील नागरिकांना दिलासा मिळावा म्हणून सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.निलेश पांढारकर :- मा.महापौर साहेब, सदर ठरावास अनुमोदन आहे.

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, मी आयुक्तांना विचारलेले आहे. आपण जो प्रस्ताव शासनाला पाठवलेला आहे. २.५ FSI चा प्रस्ताव काय आहे सभागृहाला सांगावे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने माहिती पुस्तक प्रसिद्ध केलेले आहे. रु.५/- किंमत ठेवली आहे. लहान भूखंडधारकांना नियमाची तरतूद २०० स्क्वे.फूट ते २५०० स्क्वे.फूट पर्यंत आहे. शहर सुधारणा समितीत यावर चर्चा झाली आहे. २० ते २०० फूटाचा प्लॅन पास होतो, ही गोष्ट शहरातील किती नागरीकांना माहिती आहे. मुळात ही गोष्टच माहित नाही. २०० स्क्वे.फूटाचा प्लॅनसुद्धा पास होतो हेच नागरिकांना माहित नाही. आत्ता आम्हाला समजते आहे हा नियम मुळात आहे. ते प्रसिद्ध करण्याचे काम तुम्ही केलेले आहे. ५/- रुपये प्रसिद्ध मूल्य लिहीलेले आहे. आपण याला प्रसिद्धी देत असताना प्रत्येक नागरिकापर्यंत माहिती पुस्तिका गेली पाहीजे. अतिशय चांगले आहे. तथापि त्यातील अटी पाहील्यातर खरोखर कामगारांना घर बांधणे शक्य आहे का. गल्लीबोळात रस्ता किमान ३ ते ५ मीटरचा असतो. टेबल २७/२७(२) - G+१ P+२ नकाशात दिल्याप्रमाणे १ गुंठ्याचा प्लॉटमध्ये साईड मार्जिन ३ मीटर चारी बाजूंनी जवळपास १० फुटाचे ठेवणे शक्य आहे का. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताय. लो साईड मार्जिन असत नाही असे किचकट नियम आहेत. ७/१२ उतारा, भूखंड नकाशा, डी.पी., शिधापत्र, हमीपत्र बाकी सगळ्या विभागांचे NOC यात सगळ्यात किचकट प्रकार भूखंड मोजणीचा आहे. मोजणीशिवाय प्लॅन पास करत नाहीत. मोजणीचे अधिकार महसूल विभागाकडून आपल्या अधिका-यांना देता येतात का नाही हे पाहिले पाहिजे. ही सुधारणा आपण केली पाहीजे. १/२ गुंठ्यांसाठी सुद्धा १ लाख भरावे लागतात. डेव्हलपमेंट चार्जेस फी धरुन १ गुंठ्यांसाठी ३ लाख खर्च होत असतील तर त्यात त्याचे प्लींथ होते. तो स्लॅब पर्यंत येतो म्हणून मोजणी करण्याचे अधिकारांबाबत नागरिकांना माहिती करुन द्या. संबंधित लोकांकडून याबाबतचा

चांगला निर्णय अडकला आहे. याच्याशिवाय डिक्लेअर केलेली नियमावली आजची नाही. आम्हाला आजच कळत आहे. जुनीच आहे. ही कामे १०/१५ वर्षांपूर्वी व्हायला पाहीजे होती. जवळपास ५०,००० घरे बांधल्यानंतर काय उपयोग? घरे बांधायच्या अवस्थेत सुद्धा लोक राहीले नाहीत. साईड मार्जिन, फ्रंट मार्जिनमध्ये काम जास्त झालेतर परवानगी घेण्यासाठी लोक तुमच्याकडे येणार नाहीत. नियमात बदल झाले पाहीजेत. प्रस्ताव वाचून दाखवावा. तो प्रस्ताव आमच्यासमोर का आला नाही हा देखील विषय आहे. २.५ FSI द्यायचे म्हणताय त्याला किती वेळ लागेल? हे तुम्हाला आम्हाला खात्रीशीर सांगता येणार नाही. आपण चारची मागणी केलेली आहे. अडीच FSI चे काय? आम्हाला तुमचा प्रस्ताव पहिला वाचून दाखवा.

मा.भदाणे (उपसंचालक नगररचना) :- यांनी प्रस्ताव वाचून दाखवला.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, जुनी बांधकामे नियमित करण्यासंदर्भात हा विषय आहे. इथून पुढे प्लॅन सॅन्क्शन करण्याचा विषय वेगळा आहे. ३ मी.चा रस्ता मोजणीचा, ग्राऊंड, फ्लोअरेजचा विषय मांडला आहे. माझी सूचना आहे - दि.३१ मार्च २०१२ पर्यंतची घरे नियमित करायची असेल तर सरसकट नियमित करावीत तरच शंभर टक्के खरोखर अधिकृत होतील. नाहीतर नियमाप्रमाणे ५०% बांधकामे नियमित होऊ शकणार नाहीत. अनेक वेळा भोसरीबद्दल बोललो आहे. त्याची वर्गवारी झाली पाहीजे. किती FSI वापरला. ३/४ FSI लागणारा वापरला आहे. गुंठेवारी कायद्याप्रमामे ३१ मार्च २०१२ नंतर घरे नियमित केली. अशा पद्धतीने पाठवले तरी पुन्हा हीच अडचण निर्माण होणार आहे. या संदर्भात अनेक वेळा विचार करुन अशा पद्धतीने बांधकाम करु नये. मा.प्रशांत शितोळे यांचा मुद्दा आहे. इथून पुढे बिल्डींग परमिशनच्या नियमांत बदल करण्यासंदर्भात महापालिका स्तरावर चर्चा झाली पाहीजे. सदस्यांचे म्हणणे प्रशासनाने ऐकून घेतला पाहीजे. आर्कीटेक्ट बोलवून इथून पुढे बांधकामे नियमित अधिकृत करण्याबाबत निर्णय घेतला पाहीजे.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, प्रस्ताव पाठवला आहे. मी आयुक्तांकडे तक्रार घेऊन आले होते. एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांच्याशी बोलले होते. लेआऊटमध्ये प्लॉट मंजूर आहे. तुम्ही जेव्हा बोलला. त्यांच्याकडून उत्तर मिळाले, लेआऊटमधील प्लॉट आहे. बांधकाम परवानगी न घेता जागा चार बाजूंनी सोडली असली तरी त्याच जागेवर गुंठेवारी नियमानुकूल २००३ प्रमाणे गुंठेवारीसाठी अर्ज केला. तो आपण रिजेक्ट केला होता. गुन्हा केलेल्याला तुम्ही पकडणार व खूनासारखा गुन्हा केलेल्या पूर्ण गुन्हेगाराला मोठा गुन्हा केला तरी तुम्ही सोडणार. लोकांना फुकट घरे बांधून देताय. लेआऊटमधील प्लॉट जास्त किंमतीने विकत घेत आहोत. गुंठेवारीत बसत नाही. १९७५, १९६७ असे असलेले झालेले लेआऊट आहेत. अशा लोकांचे गुंठेवारीत अर्ज पडलेले आहेत. काही काही लोकांनी मंजूर केलेले आहेत. काही नियम करत असाल तर स्वरुप द्यायचा प्रयत्न असेल तरी आपल्या अधिकाऱ्यांकडून अंमलबजावणी होत नाही. बिल्डींग परमिशन यांच्याकडे जाऊन अशा लोकांचे प्लॅन देतो. गुंठेवारी मंजूर करत नाही. सध्या प्लॅन देतो तो मंजूर करुन द्या. बांधकाम परवानगीच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले, हे बांधकाम १९७७ सालचे आहे डीमॉलिश करा. हा कुठला कायदा आहे. सर्वसामान्य दोषी ठरवणारा तुमचा कायदा गळ्यावर सुरा फिरवण्यासारखा आहे. काही सुद्धा सहानुभूतीपूर्वक मंजूर करत नाही. तुमच्या लक्षात यायला पाहीजे. लेआऊटमधील

प्लॉटमधील गुंठेवारी नियमित करा. मी तुमच्या इथे माहिती घेतली त्यांच्याकडून ही उत्तरे मिळाली आहेत. आत्ताच्या आत्ता अधिकाऱ्यांना निर्देश दिले पाहीजेत, सूचना दिल्या पाहीजेत. लेआऊटमधील प्लॉट आहेत. २०० स्क्वे.फूट जागेवर गुंठेवारी मंजूर केलेली आहे. आरक्षण आहे. काही प्रकरणे काढून दाखवते. कायदेशीर प्लॉट घेतले आहेत. त्यांची गुंठेवारी फेटाळत आहेत. लोकांना शिस्त लावून दुप्पट कर आकारणी केलेली आहे. सगळ्याच बाजूने त्यांची कोंडी करताय. बांधकाम परवानगी देताना गुंठेवारी मागताय. त्यांच्याकडे अर्ज आहे. ६५०/- रु. भरुन गुंठेवारीची प्रकरणे २००३ साली सबमिट केलेली आहेत. परिणामकारकपणे करता येईल. अधिकाऱ्यांकडून नियमावर बोट ठेवून केले जात असेल तर चुकीचे आहे. मी याठिकाणी आयुक्तांना सांगते, आत्ताच निर्णय जाहीर करावा. अधिकाऱ्यांना जे आदेश द्यावयाचे आहेत ते द्यावेत.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, भदाणे मॅडम यांना आत्ताच विचारले होते. शासनाकडे आधीच प्रस्ताव पाठवून दिलेला आहे. या विषयाच्या अनुषंगाने प्रस्ताव देऊन गुंठेवारी नियमांना मंजूरी द्यावी. महापालिका सभेसमोर शासनाने अनधिकृत बांधकामांना दंडासाठी विषय आलेला आहे. तो विषय आम्ही फेटाळून टाकला आहे. शासनाने निर्णय घेतला. जेवढा प्रॉपर्टी टॅक्स तितका दरवर्षी दंड म्हणून वसूल करणार. हा जाचक विषय आहे. शासनाने नंतर आर्टीकल पाठवले होते. सर्वसामान्यपणे २००८ पूर्वी बेकायदेशीर बांधकामे केली त्यांना काहीच दंड नाही. हा भरल्यानंतर लोकांना टॅक्स बीलात तेवढाच भरावयाचा आहे. कायदा निर्माण झाला आहे. लोकांनी भिती घेतलेली आहे. माझी विनंती आहे,साकल्याने सहानुभूतीपूर्वक मंजूर करुन १००% टॅक्स दिला आहे तो जाचक आहे, त्याच्यावर मात करणे गरजेचे आहे. हा विषय चर्चा न करता संपवावा ही विनंती करतो.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब, आमच्याकडे सगळ्यांना दुप्पट टॅक्स भरण्याच्या नोटीस आलेल्या आहेत. आमचा जीवनमरणाचा विषय आहे तो मान्य करुन पाठवावा. त्यात थोडी घरे बसत नाहीत. १९७५ ची घरे बेकायदेशीर म्हणून दुप्पट आकारणी केली आहे. ७५ ची घरे आत्ता पडायला आलेली आहेत.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, शासन निर्णय घेते त्याची अंमलबजावणी आयुक्त करीत आहेत. शासनात बसून निर्णय घ्यायला पाहीजेत. प्रस्ताव पाठवत असताना बंधनकारक आहे. त्यांची सत्ता आहे. त्यांना विश्वासात घ्यायला पाहीजे होते. सर्वसामान्य माणून TDR रेट घेऊ शकणार नाही. मंत्रालयात बैठक घ्या. मूळ प्रश्न गरीब माणसाला समजून सांगा. शासन जोपर्यंत आदेश करणार नाही तोपर्यंत आयुक्त अंमलबजावणी करणार नाही. त्यांच्या हातात काहीच नाही. आपण कुठेतरी कमी पडलो. बी.आर.टी.बाबत योजना यांनी सांगितली होती. आयुक्तांना अधिकार दिलेले होते. शासनाने निर्णय दिला, आयुक्तांना अधिकार ठेवले नाही. शासनाने परस्पर निर्णय घेतला. तिथपर्यंत कोणी पोहोचत नाही. शासनाची बाब आहे. मनपाची नाही. आपण राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून बसलो आहोत. आपण करुन मागितले, यात राजकारण नाही. शासनाचा गोंधळ आहे. व्यवस्थित ठराव केला तर शासनाकडून आदेश बदलावा लागेल. तुम्ही माहिती दिली त्यांच्या अनुषंगाने कोणीच बांधकाम परवानगी घेऊ शकणार नाही. कागदावर पुस्तक प्रसिद्ध केलेले आहे. हेच नियम आहेत. खरेतर शासन दरबारी प्रश्न सोडवला पाहीजे. निव्वळ सभागृहाचा वेळ चालला आहे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, सदस्य प्रस्ताव आहे. आमची भूमिका काय आहे. शहरातील अडचणींवर मात कशी करायची याची सदस्यांमध्ये चर्चा आहे. आयुक्त किंवा नगररचना विभागाने TDR घ्यायची आठवण  नाही आणि FSI द्या असे अधिकार भावनेने मागू शकत नाही. जे अनधिकृतपणे चालले आहे ते कायद्याच्या चौकटीत बसवून, कायद्याच्या माध्यमातून बदल करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आपण शासनाकडे गेलेलो होतो. दर बदल करायचे शासकीय मान्यतेने येणार आहे. मुख्यमंत्र्यांना समजत नाही, उपमुख्यमंत्र्यांना समजत नाही. आपण भूमिका मांडतोय हीच बरोबर आहे असे कोणी समजायचे कारण नाही. हा मनपाचा निर्णय नव्हे, संपूर्ण महाराष्ट्राचा निर्णय नव्हेतर हा नियम भारताला सुद्धा लागू शकतो. शहराला लागू  होऊ शकते यावर ऊहापोह झाला पाहीजे. याठिकाणी पूर्वीसुद्धा सांगितले की, मा.अजित पवार यांनी नमूद केले, शहराची वस्तूस्थितीच आहे. मुळात जाल तर आपली भूमिका कायद्याच्या बाहेर मांडू शकत नाही. आम्ही काहीही मागू शकतो. ते करत असताना वर्गवारी करा. ४० वर्षापूर्वीचा लेआऊट, त्याची भूमिका, त्या वर्षीचा नियम, ग्रामपंचायतीचा नियम, या शहराचा विकास कै.आण्णासाहेब मगर यांच्या कृपेमुळे अतिशय झपाट्याने झाला. ग्रामपंचायतीची नगरपालिका, त्याची महानगरपालिका होत असताना प्रत्येक संस्थेच्या नियमावली असतात, त्यात बदल होत गेले. १२ वर्षांच्या काळात पूर्वीच्याच कॅटेगरीनुसार अंमलबजावणी होणार नाही. सर्व पक्ष प्रमुखांनी आपली भूमिका पाठवलेली आहे. शासन आपले आहे. आपण त्यांना सांगू शकतो. अंतिम स्टेजला प्रकरण नाही. सर्वसाक्षीने विचार करुन सत्ता टिकवण्यासाठी काय आवश्यक आहे याचे भान सत्ताधाऱ्यांना असते. शहराची वर्गवारी करावी. नवीन समाविष्ट गावे येऊ द्या. गुंठेवारी कायद्यात दर बदल पडेल म्हणून हा अतिरीक्त FSI देणार आहोत. त्याची कशा पद्धतीने अंमलबजावणी करायची हा सुद्धा विषय आहे. हे करण्यासाठी आपली महापालिका जबाबदार आहे. मानसिकता, कायदा  व वस्तुस्थिती, वास्तविक स्वरुप याला आपल्याला सामोरे जायचे आहे. मूळ वर्गवारी अतिशय आवश्यक आहे. कारवाईचा सुद्धा दोष ठरवला आहे. या सर्व गोष्टींचा व्यवहारीक विचार करणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका या वाटचालीत सुद्धा आपली भूमिका स्पष्ट असावी यासाठी याठिकाणी विनंती करीत आहे.

मा.अजित गव्हाणे :- मा.महापौर साहेब, डबल टॅक्स लावण्याच्या नोटीसा देत आहोत. २००८ नंतरची घरे आहेत. शासन स्तरावर असा निर्णय पूर्वी झाला. आत्ता झाला नाही. २००८ साली झ ालेले आहे. पुन्हा येण्याआधी आयुक्तांनी याच्यावर अंमलबजावणी केलेली नाही. अशा पद्धतीने टॅक्स लावला तर खूप अन्यायकारक आहे. सर्वसामान्य माणसाला बोलवणार नाही. जसा हायकोर्टाचा निर्णय हा त्यांनी पाळला पाहीजे अशी तुमची धारणा आहे. शासन स्तरावर आम्ही प्रयत्न करतोय, सर्वांचाच प्रयत्न आहे. मा.आप्पा बारणे तुमची जी इच्छा आहे, हीच सगळ्यांची इच्छा आहे. सूट मिळावी हा राजकीय विषय निश्चित नाही. आपण पूर्वी काँग्रेस पक्षात असताना सत्ताधारी पक्षात होता. तुम्हाला सगळ्या गोष्टी माहित आहेत. शासन स्तरावर कशा पद्धतीने निर्णय घेतात. काही कालावधी लागतो, त्या दृष्टीकोणातून महापालिकेच्या या निर्णयाची अंमलबजावणी शहर, राज्य किंवा देशात होणार आहे. यासंदर्भात गुंठेवारी कायद्याप्रमाणे शासनाकडे विनंती केली, मंजूरी आणली तरच आपली सगळी बांधकामे अधिकृत होतील. टोटल टॅक्ससंदर्भात नोटीस सर्व ठिकाणी जबाबदार आहे. याचा सहानुभूतिपूर्वक विचार करावा. अशा पद्धतीने लोक टॅक्स भरु शकणार नाहीत. शासन स्तरावर निर्णय कोणता झाला? भविष्यात अनधिकृत बांधकामे होऊ नयेत या दृष्टीने निर्णय घेतला

आहे. तरीसुद्धा अनधिकृत बांधकामे झाली. इथून पुढे होऊ नयेत म्हणून सर्वचजण खबरदारी घेणार आहेत. टोटल टॅक्स वाढतोय. लोकांवर तरीसुद्धा अन्यायकारक आहे. यावर सहानुभूतिपूर्वक विचार करावा. या नोटीसा थांबवाव्यात.

मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) :- मा.महापौर साहेब, उपस्थित सर्व सदस्य, ठोस वक्तव्य मांडणे आवश्यक आहे. स्पष्ट होत नाही म्हणून संभ्रम निर्माण होतो आहे. फेब्रुवारी २०११ ला हायकोर्टाचा आदेश झाला होता. त्यावेळी सभागृहाने ११ मार्च २०११ ला ऊल्हास नगरच्या धर्तीवर नियम अनुकूल करावेत असा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. गेल्या वर्षी पहिल्यांदा प्रस्ताव पाठवला होता. २ ऑगस्ट २०११ ला प्रस्ताव पाठवला होता. त्यापरिस्थितीत १.४ FSI मागितला होता. गुंठेवारीचा नियम केला गेला. ३१ मार्च २०१२ च्या निर्णयाच्या अन्वये करावयाची मागणी गेल्या वर्षाच्या ऑगस्टच्या ठरावात केली होती. या वर्षी ७ ऑगस्टला प्रस्ताव पाठवला होता. प्रशासनाकडून १.४ FSI ऐवजी २.४ FSI मागितले होते. ३१ मार्च २०१२ पर्यंत झालेली बांधकामे नियमानुकूल करावीत. २०११ ऐवजी २०१२ पर्यंत एक वर्षाची मुदतवाढ केली. १.४ FSI २.४ वर गेला. एवढे रिलॅक्सेशन मागताना ते का मागितले याची पार्श्वभूमी सांगणे आवश्यक आहे. दि. ३१ मार्च २०११ ला मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली होती. पिंपरी-चिंचवडचे ३ आमदार, महापौर, विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीच्या प्रोसिडींगमध्ये आलेले आहे. ही बाब लक्षात घेता अनधिकृत बांधकामांची व्याप्ती लक्षात घेता २.५ FSI वाढवण्याची शक्यता तपासून घेण्यात येणार आहे. टाऊन प्लॅनिग समिती नेमली होती. त्याचा अंतिम अहवाल आलेला आहे. गुंठेवारी कायद्यात मुदत वाढ देता येऊ शकते का, हे सुद्धा अंतिम झालेले नाही. याच्या पलिकडे मी प्रस्ताव पाठवू शकत नाही. आधीच निर्णय झालेला आहे. सगळे त्यावेळी होते. त्याच बैठकीच्या अनुषंगाने प्रस्ताव पाठवलेला नाही. त्याचा डुप्लीकेट पाठवायची असेल तर महापालिका सभेला निर्णय घ्यावा लागेल. मी आल्यानंतर अंमलबजावणी सुरु झाली अशी वस्तुस्थिती नाही. गेल्या वर्षी १८ मार्च २०११ मध्ये ठराव झाला होता. ठराव झाला त्यावेळी फेटाळून लावला. महापालिका सभा मान्य करते. उल्हासनगरच्या धर्तीवर नियमानुकूल करते. महापालिकेचा ठराव शासन मान्यतेला गेला. शासनाने महापालिका सभेचा ठराव विखंडीत करुन मेरीट करण्याऐवजी मे मधील मूळ प्रस्तावाची अंमलबजावणी करावी असे शासनाने सांगितले होते. त्यामुळे त्याची अंमलबजावणी करणे अपरिहार्य होते. मूळ प्रस्तावात मालमत्ता कराला एकपट दंड लावला आहे. कायद्यात दुप्पट तरतूद आहे. अशी पुणे महानगरपालिकेत अंमलबजावणी चालू आहे. आपल्याकडे १०० ला १०० करण्याचा ठराव होता म्हणून तो आहे. मे च्या आठवड्यात आला असल्यामुळे तो करत आहोत. मा.शमीम पठाण सकाळी माझ्याकडे आल्या होत्या, त्यावेळी विस्ताराने चर्चा झाली नाही. यात २ मुद्दे आहेत. १९७७-७८ च्या बांधकामांबाबतीत मा.अजित पवार यांनी बैठक बोलवली होती. जानेवारी २००८ मध्ये कायदा झाला होता. २००८ आधीचे बांधकाम असेल तर प्रश्न येत नाही. कायद्याच्या विरोधात होईल. नोटीस चुकत असेल तर अर्धा टॅक्स देखील पडेल. जानेवारी २००८ आधीच्या बांधकामांना कोणत्याही पद्धतीने अशी आकारणी केली जाणार नाही. २००८ नंतरच्या बांधकामांना लागू होईल. ज्यावेळी २००३ मध्ये गुंठेवारीचे अर्ज नामंजूर केले त्यावेळी खरेतर आपल्या हातात मुदत होती व त्या मुदतीत मंजूर व्हायला पाहीजे होते, ते झाले नाही. आत्ता गुंठेवारीच्या मुदतीत वाढ मागितली आहे. ते पुन्हा ओपन करुन मंजूरी घेता येऊ शकेल.

मा.योगेश बहल :- मा.महापौर साहेब, जेवढा टॅक्स लावला जातो आहे. मूळ ठराव शासनाने विखंडीत केला असला तरी या ठरावाच्या अनुषंगाने एक उपसूचना देतो आहे. घाई होत असले तर तुम्ही आम्ही अभ्यास करुन या महिन्याच्या २० तारखेला मा.महापालिका सभेपुढे ठेवू. सर्वसामान्य माणसाला न पेलवणारे आहे. दरवर्षी टॅक्स रेट वाढवत आलेलो आहोत. संत तुकाराम नगर भागातील निवृत्त लोकांनी मला टॅक्सची पावती आणून दिली. वर्षाचा टॅक्स रु.३७,०००/- देतात. एवढीच रक्कम त्यांना दरवर्षी द्यावयाची आहे. लोक हैराण होतील. परेशान होतील. ज्यांनी रेग्युलर बांधकाम काम केलेले आहे, ते मात्र तेवढाच कर भरतील व अनधिकृत बांधकाम केलेले सुद्धा तेवढाच कर भरतील. सन २००८ चे कोणतेही बांधकाम जे २००७/२००६ मध्ये केले असेल तर ते मात्र यातून १०० टक्के सुटणार आहेत. हा भूर्दंड अन्यायकारक आहे, चूकीचा आहे. यावर ताबडतोब बैठक बोलवावी. २० तारखेच्या महापालिका सभेआधी २०० टक्के का १०० टक्के असावे याचा निर्णय घ्यावा व हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १६

दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/४/कावि/९४०/२०१२ दि.०३/०७/२०१२

सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी दिनांक २१/०६/२०१२ चे पत्रानुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २५(२)(एए) मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरुंनी विद्यापिठ क्षेत्रातील नगरपरिषदांच्या / महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्यास विद्यापीठ अधिसभेवर (सिनेट) एक वर्षासाठी चक्रक्रमाने नामनिर्देशन करावयाचे असल्याचे कळवून त्यासाठी आपल्या महापालिकेच्या सदस्यांपैकी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याची माहिती पाठविणेकामी कळविले आहे.

सबब पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याचे नामनिर्देशन करणेबाबतचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा.

मा.जितेंद्र ननवरे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

मा.मंगला कदम (सत्तारुढ पक्षनेते) :- मा.महापौर साहेब, याकरिता श्री.संदीप गुलाबराव चिंचवडे यांचे नाव देण्यात येत आहे.

मा.शमीम पठाण :- मा.महापौर साहेब,सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- १०८ विषय क्रमांक :- १६
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/४/कावि/९४०/२०१२
दि.०३/०७/२०१२

सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी दिनांक २१/०६/२०१२ चे पत्रानुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २५(२)(एए) मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरुंनी विद्यापिठ क्षेत्रातील नगरपरिषदांच्या/महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्यास विद्यापीठ अधिसभेवर (सिनेट) एक वर्षासाठी चक्रक्रमाने नामनिर्देशन करावयाचे असल्याचे कळवून त्यासाठी आपल्या महापालिकेच्या सदस्यांपैकी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याची माहिती पाठविणेकामी कळविले आहे.

सबब पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या मा.चिंचवडे संदिप गुलाबराव या सदस्याचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-१०९ विषय क्रमांक :- १७
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) दि.१८/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१/६/२०१२ व १५/६/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-११० विषय क्रमांक :- १८
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.महिला व बालकल्याण समिती

अ) दि.२३/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१३/६/२०१२ (दु.२.०० व २.१५) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-१११ विषय क्रमांक :- १९
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.शहर सुधारणा समिती

दि.१५/५/२०१२ व १६/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-११२ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- ०१.०९.२०१२ विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिती

दि.६/६/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८५ प्रतिकूल- ००

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------------

मा.महापौर :- सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१०९८/१२
दिनांक :- २०/०९/२०१२

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.